आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

६ एप्रिल २०११ | वर्ष २८ | अंक १

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक ₹१०



शेतकरी
# संघटक
स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक १ । ६ एप्रिल २०११

मूल्य : ₹ १०

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

मुखपृष्ठावरील व्यंगचित्र
**अनिल डांगे**

अंक मांडणी
**श्रीकांत झाडे, जनशक्ती वाचक चळवळ**

**वार्षिक वर्गणी : रु. २००/- फक्त.**
(द्वैवार्षिक, त्रैवार्षिक, आजीव आदी प्रकार नसल्यामुळे फक्त वार्षिक वर्गणीच स्वीकारली जाईल.)
वर्गणी **'शेतकरी संघटक'** या नावाने खालील पत्त्यावर पाठवावी.

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :**
कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक,
जनशक्ती वाचक चळवळ,
२४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१,
फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com
● हा अंक मालक मोहन बिहारीलाल परदेशी, संपादक, मुद्रक, प्रकाशक सुरेशचंद्र म्हात्रे यांनी उदय एंटरप्राईजेस, सिडको-औरंगाबाद येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, पिनाक, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

*दि. ६ एप्रिल १९८१ रोजी निपाणी तंबाखू आंदोलनात शासनाने केलेल्या गोळीबारात शहीद हुतात्म्यांना*

## *विनम्र अभिवादन!*



**जानू सूर्यवंशी** (६५) रामपूर
**आबासाहेब आण्णासाहेब इंगळे** (२४) चिखलव्हाळ
**भाऊ लक्ष्मण कोंडीकर** (४०) गळतगा
**गोविंदा लक्ष्मण कोंडीकर** (४५) गळतगा
**ज्योती येऊ गावंड** (२१) भोज
**महादेव भीमराव गावंड** (२१) अकोळ
**ज्ञानदेव मल्लू पाटील** (२०) नांगनूर
**कृष्णा दादू पाटील** (६०) शिरपेवाडी
**दिनकर दाजी चव्हाण** (४५) ममदापूर
**शंकर रामा रेंदाळे** (५०) एकसंबा
**थळू भिवा कांबळे** (५०) जत्रट
**अनंत रामा कुऱ्हाळे लिंगनूर** कापशी कोल्हापूर

पाक्षिक शेतकरी संघटकची सुरुवात या हुतात्म्यांच्या स्मृतीला अभिवादन करून करण्यात आली.

# अंतरंग

शरदऋतू । **वारकरीची जन्मकथा** । शरद जोशी । ३
डायरी अध्यक्षांची । **रामदेवबाबा आणि शेतकरी संघटना** । रवि देवांग। ५
निमित्त । **वर्धापन दिनाच्या निमित्ताने** । गंगाधर मुटे । ६
जागरण । **खचलेले शेतकरी, निर्ढावलेले अधिकारी आणि निर्लज्ज राजकारणी** । श्रीकृष्ण उमरीकर । ७
मुद्दा । **जैतापूर प्रकल्प : एक विचारमंथन** । विश्वास प्र. पिटके । ११
चर्चा । **हमाम में सब नंगे** । दत्ता जोशी । १६
आजकाल । **पॅकेजचा मलिदा कोणाच्या घशात?** ज्ञानेश्वर शेलार । १९
'भारत' की जुबानी । **तीन दिन स्कूल, चार दिन परिवार** । ॲड. दिनेश शर्मा । २१
विचार । **माफियाराजची निर्मिती** । ॲड. सुभाष खंडागळे । २५
(उ)संतवाणी । **मध्यस्थ महत्त्वाख्यान** । 'थंडा' महाराज देगलूरकर । २७
मुक्तमंच । **महागाई आणि महागाई भत्ता** । ॲड. कांचन कोतवाल । २९
**शेतकरी संघटना वृत्त** । ३१

# २८ व्या वर्षात पदार्पण करताना

शेतकरी आंदोलनाला सुरुवात झाल्याबरोबर चाकण येथून 'साप्ताहिक वारकरी'ची सुरुवात झाली. त्याची जन्मकथा सांगणारा शरद जोशींचा लेख सोबतच देत आहोत. नागपूरहून प्रा. शरद पाटील यांनी 'अन्नदाता' हे पाक्षिक आणि नंतर साप्ताहिक स्वरुपात अडीच वर्षे प्रकाशित केले. १९८१ च्या सुमारास श्रीरंग नाना मोरे आणि अमर हबीब यांनी अंबेजोगाईहून 'भूमीसेवक' हे साप्ताहिक चालवले.

शेतकरी चळवळीसाठी अल्पायुषी ठरलेल्या या नियतकालिकांनी महत्त्वाचे योगदान दिले. या प्रयोगांनंतर शेतकरी संघटना, शरद जोशी आणि शेतकरी संघटनेचे पाईक व ज्यांच्यात सरकारशाहीच्या मगरमिठीतून स्वतंत्र होण्याचे धारिष्ट्य निर्माण करण्यासाठी शेतकरी संघटकचा अवतार झाला. ६ एप्रिल १९८३ रोजी सुरू झालेल्या शेतकरी संघटकचा २८ व्या वर्षाचा हा पहिला अंक. पहिली २६ वर्षे शेतकरी संघटकचे अंक ८, ४ तर कधी निमित्ताने अधिक पृष्ठांचे पण केवळ पत्रिकेच्या स्वरूपातच निघत होते. त्यामुळे, दुर्दैवाने, त्याला शेतकरी संघटनेच्या परिघाबाहेर व बिगरशेतकरी समाजात फारशी मान्यता मिळाली नाही. परिणामी, देशाची अर्थव्यवस्था आमूलाग्र बदलवून देशाला आर्थिक विकासाच्या मार्गावर आणण्याची क्षमता असलेली शेतकरी संघटनेची विचारसरणी मर्यादित क्षेत्रातच अडकून पडली. ती अधिक विस्तारित क्षेत्रात जावी या उद्देशाने शेतकरी संघटकच्या पाचव्या वर्षी 'आठवड्याचा ग्यानबा' या नावाने 'स्टॉल सेलेबल' स्वरूपाचे पर्यायी साप्ताहिक प्रकाशित करण्यास सुरुवात झाली. पण हाही प्रयोग फार काळ तगला नाही आणि पुन्हा एकदा शेतकरी संघटक पत्रिकेच्या स्वरूपातच निघणे सुरू झाले.




**शेतकरी संघटकच्या पहिल्या अंकाचे प्रथम पृष्ठ**

कोणीतरी मदतीला धावून येईल आणि शेतकरी संघटकला सजवूनधजवून शेतकरी समाजाबरोबरच इतर, तुलनेने समृद्ध, आर्थिक समाजघटकांसमोर उभे करील या आशेत या पत्रिकेला २६ वर्षे वाट पाहवी लागली. त्याही स्वरूपात शेतकरी समाजाने शेतकरी संघटक पत्रिकेवर अगदी मनापासून प्रेम केले. शेतकरी संघटनेचे प्रणेते श्री. शरद जोशी यांचा लेख हेच या पत्रिकेचे प्रमुख आकर्षण ठरत असे. शेतकरी समाजात काही तुरळक अपवाद वगळता लिहिणारे फार थोडेच. ज्यांच्या डोक्यात काही विचार पिकत ते ते, शेतीमाल प्रक्रियेशिवाय बाजारात पाठवतात तसेच 'जांगड' स्वरूपात 'शेतकरी संघटक'कडे पाठवीत, नाही असे नाही. पण, शेतकरी संघटककडे त्यावर प्रक्रिया करण्याची काही यंत्रणा नव्हती. शेतकरी समाजाचे भद्र समाजाने आर्थिक शोषण केले तसेच वैचारिक शोषणही केले होते की काय कोणास ठाऊक!

अखेर, २६वे वर्ष संपताना एप्रिल २०१० मध्ये श्री. श्रीकांत उमरीकर यांनी शेतकरी संघटकला 'स्टॉल सेलेबल' स्वरूपात बाहेर आणण्याचे शिवधनुष्य उचलण्याची जबाबदारी अंगावर घेतली आणि गेले वर्षभर ती त्यांनी कार्यकारी संपादक म्हणून समर्थपणे पेलली. या नवीन स्वरूपाच्या शेतकरी संघटकचाही 'पत्रिके'च्या चाहत्यांनी त्याच प्रेमाने स्वीकार केला. या नव्या स्वरूपामुळे शेतकरी समाजाव्यतिरिक्त इतरही समाजात शेतकरी संघटक वाढत्या प्रमाणात पोहोचू लागला आहे. याचे सर्व श्रेय श्री. श्रीकांत उमरीकर, त्यांचे सहकारी आणि त्यांनी मिळवलेली लेखक मंडळी यांना द्यावे लागेल.

नवीन स्वरूपात शेतकरी संघटक निघण्याचे हे पहिलेच वर्ष असल्याने त्याला लगेच परीक्षेला बसवणे योग्य होणार नाही, पण आजवर हाती पडलेल्या २४ अंकांचे मूल्यमापन करून त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने योग्य त्या सूचना, त्या अंमलात आणण्यासाठी सूचनाकर्त्यांच्या योगदानाच्या शब्दांसह, स्वागतार्ह असतील. महाराष्ट्राच्या सर्वच भागांतून शेतकरी संघटकला लेखन मिळणे ही वर्तमान स्थितीत प्राथमिक गरज आहे.

एवढा मोठा अंक काढायचा म्हणजे त्याची आर्थिक बाजूही भक्कम असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने शेतकरी संघटकच्या सर्व प्रेमी हितचिंतकांनी कार्यकारी संपादकांच्या त्यासाठी आखलेल्या योजनांना सहकार्य करावे अशी अपेक्षा आहे.

शेतकरी संघटकचा सतत २६ वर्षे शिरावर वाहलेला भार आपल्या शिरावर घेऊन श्री. श्रीकांत उमरीकर आणि त्यांचे सहकारी यांनी व्यक्तिशः मला थोडी मोकळीक दिली याबद्दल त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य ठरते.

नव्या स्वरूपातील 'शेतकरी संघटक' वर्षागणिक नव्हे तर पुढील प्रत्येक अंकागणिक अधिकाधिक समृद्ध होण्याच्या दृष्टीने शेतकरी संघटकचे सर्व हितचिंतक त्यांच्या त्यांच्या परीने सहकार्य करतील असा विश्वास बाळगतो.

धन्यवाद.

**स्नेहांकित,**
**सुरेशचंद्र म्हात्रे**

# 'वारकरी'ची जन्मकथा

शेतकरी संघटना हे नाव आणि कल्पना आम्ही बरेच दिवस मनात बाळगत होतो आणि त्याविषयी बोलत होतो. आम्ही म्हणजे बाबूलाल परदेशी, शंकरराव वाघ, बाबासाहेब मांडेकर अशी चाकणच्या परिसरातील पाच-सहा माणसं. १९७८ मध्ये कांद्याचे भाव पहिल्यांदा पडले तेव्हापासून ते १९८० पर्यंत चाकणच्या बाजारावर कांद्याच्या प्रत्येक हंगामात घारीच्या नजरेने देखरेख ठेवायची. १९८० मध्ये कांद्याचे पीक तर मोठं आलं आणि यंदा पुन्हा निर्यातीला परवानगी नसल्याने भाव घसरणार हे स्पष्ट झाले. तेव्हा संघटनेला काहीतरी मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न करू लागलो. चाकण गावाच्या मध्यभागी एका खोलीवर पाटी लावली आणि त्या जागी बाजाराच्या दिवशी कार्यकर्त्यांनी तासभर तरी येऊन जावे, अशी जाहिरात केली. माझ्या आठवणीप्रमाणे पहिली बैठक झाली त २७ ऑक्टोबर १९७९ रोजी. विशेष सांगायची गोष्ट म्हणजे त्या दिवशी झालेला सगळ्यात महत्त्वाचा निर्णय म्हणजे तातडीने साप्ताहिक चालू करायचे. साप्ताहिकाचे बाळंतपण काही लहान नाही. त्याचं नाव आधी ठरवावं लागतं, ते नाव दिल्लीहून मंजूर करावून आणावं लागतं, लेख, छपाई, पैशांची व्यवस्था, अनेक सव्यापसव्य उरकावी लागतात. अनियतकालिक काढले तर पुष्कळ अडचणी दूर होतात. अनियतकालिक म्हणजे ज्याचा निघण्याचा काही निश्चित कार्यक्रम नाही असे पत्रक. कधी दोन दिवसांनी तर कधी महिनाभरही निघणार नाही. त्याचं नाव काहीही असू शकतं. वर्गणीदार वगैरेची कटकट नाही. आवश्यकतेप्रमाणे किंवा सोयीप्रमाणे जेव्हा जमेल तेव्हा पत्रकाची प्रसिद्धी करायची. आज मागे वळून पाहिले म्हणजे असे वाटते की त्यावेळी अनितकालिक काढले असते तर जास्त योग्य झाले असते. निदान जास्त पेलवले असते; पण शेतकरी संघटनेच्या ताकदीविषयी व भविष्याविषयी जमलेल्या सर्वांच्याच मनात जबरदस्त आत्मविश्वास होता. अनियतकालिक काढणे म्हणजे पोरकटपणा वाटला. त्याऐवजी छोटे का होईना नियमित चालणारे साप्ताहिक काढावे. हे संघटनेच्या प्रतिष्ठेला व स्वरूपाला जास्त साजेसे वाटले. बाजारच्या दिवशी सगळ्यांनी एकत्र जमायचे. हेच त्यावेळच्या संघटनेचे मूळ स्वरूप. त्याच दिवशी जमणाऱ्या प्रत्येकाला साप्ताहिक देता आले तर सामुदायिक वाचन व चर्चा होऊ शकेल अशीही कल्पना. गावोगाव अंक गेला पाहिजे म्हणजे चाकणच्या परिसरातील शंभर-दीडशे गावात अंक पोचला पाहिजे. तिथे नुसता अंक पोचून उपयोगी नाही, तो वाचला गेला पाहिजे. चाकणच्या पश्चिमेकडील मावळ खोऱ्यामध्ये साक्षर माणसांचा दुष्काळच, मग गावोगावी तो अंक वाचून दाखविणाऱ्या माणसांची योजना पाहिजे. अशा सगळ्या कल्पनांनी साप्ताहिक काढायचे ठरले. ऑक्टोबर संपत आलेला. दोन एक महिन्यात कांद्याचा हंगाम सुरू होणार. एवढ्या काळात सर्वकाही खटाटोप आटोपून अंक चालू करणे आणि तो गावागावात उभा करणे हे अशक्यच होते. दिल्लीहून नावाची मंजुरी यायलाच कितीतरी महिने लागतात. मग काय करावे? बाबूलाल परदेशी हा पट्टीचा वक्ता तर आहेच; पण चाकण आळंदी परिसरात बरीच वर्षे नट आणि कीर्तनकार म्हणूनही गाजत आहे. चाकणला झालेल्या 'संत तुकाराम' या नाटकाच्या प्रयोगाने खूपच उत्साह तयार केला होता. बाबूलालच्या वडिलांनीसुद्धा कीर्तनकार मुलाला साष्टांग नमस्कार घातला. देहू आळंदीच्या या परिसरात बाबूलालचा चांगला मान होता. कधीतरी पुढे मागे एक भक्तिमार्गी साप्ताहिक काढावे अशी त्यांची कल्पना होती. हे साप्ताहिक प्रामुख्याने आजीव सदस्यांनी दिलेल्या देणगींच्या व्याजातून चालेल असा आडाखा होता. या दृष्टीने 'साप्ताहिक वारकरी' या नावाला त्याने दिल्लीहून मान्यता आणून ठेवली होती. तशी मान्यता येऊन दोनतीन वर्षे होऊन गेली होती; पण साप्ताहिक चालू करायला बाबूलालला काही फुरसत नव्हती. त्याने साप्ताहिकाचे नाव आम्हाला देऊ केलं. शेतकरी संघटनेकरिता काढलेले साप्ताहिक आणि त्याचं नाव 'वारकरी' हे थोडं खटकलं आणि माझ्यासारख्या नास्तिकाला तर विशेष खटकलं; पण साप्ताहिक तातडीने चालू करण्याची इतकी निकड होती की काही काळ का होईना याच नावाखाली साप्ताहिक काढायचं ठरलं. निर्णय झाला. ३ नोव्हेंबर १९७९ रोजी पहिला अंक निघाला. २७ ऑक्टोबरला साप्ताहिक काढायचा विचार मनात आल्यापासून सात दिवसांच्या आत पहिला अंक प्रकाशित होतो हे अगदी मराठी पत्रकारितेतसुद्धा मोठे दुर्मिळ असले पाहिजे. अंक निघायचा डमी फुलसाईज या आकाराचा चारपानी. बाबूलाल परदेशींचा छापखाना. त्यांच्या छपाई यंत्राच्या सोयीप्रमाणे आकार वगैरे. पैशांची अडचण पहिल्यापासून असल्याने चाकणच्या बाजारपेठेतील आडते, तेल गिरण्या अगदी किराणामालाचे दुकानदार यांच्यासुद्धा जाहिराती घेतल्यावाचून गत्यंतर नव्हते; पण या 'साप्ताहिक वारकरी'ची भूमिका फार काटेकोरपणे ठरविण्यात आली होती. पहिल्या अंकापासून ते शेतकरी संघटनेचे मुखपत्र आहे हे अगदी स्पष्ट करण्यात आले. मुद्रक प्रकाशक आणि संपादक शरद जोशी आणि कार्यकारी संपादक बाबूलाल परदेशी. पहिल्या अंकाचा प्रकाशन समारंभ करायचा ठरला. आज त्या प्रसंगाची आठवण आली तरी करमणूक झाल्याखेरीज राहत नाही. चाकण बाजारात एका ठिकाणी लहानसा मांडव घातला. कार्यकर्त्यांच्या पैकी कुणाच्या तरी ओळखीने एक लाऊड स्पीकर लावलापण उद्घाटन समारंभाच्या वेळी संघटनेच्या सगळ्या कार्यकर्त्यांनी संघटनेचे असे काही चिन्ह लावावे, म्हणजे नंतर कांद्याचा बाजार चालू झाला की संघटनेचे कार्यकर्ते वेगळे दिसून यावेत अशी सोयही होऊन जाईल. कल्पना तर निघाली. एका बाजूला अंक तयार होत होता. दुसऱ्या बाजूला जाहिराती गोळा करणे चालले होते आणि आम्ही शेतकरी संघटनेच्या चिन्हाचा काही नकाशा, आराखडा न बनवता चोवीस तासांत शंभर दोनशे बिल्ले मिळवायला निघालो. बाबूलाल परदेशीचे सगळे संपर्क जुन्या समाजवाद्यातले. चाकणच्या मामा शिंद्यांपासून ते पुण्याच्या डॉ. रमेशचंद्र ते मोहन धारियापर्यंत. डॉ. रमेशचंद्र समाजवादी पक्षातले मोठे संघटक मानले जायचे. त्यांच्याकडे आम्ही विचारायला गेलो बिल्ले कसे व कोठे तयार करायचे. डॉ. साहेब भेटलेच नाहीत. मला वाटते त्यांच्या धाकट्या भावाचा प्लॅस्टिक मोल्डिंगचा छोटासा उद्योगधंदा होता. तो बाहेर पडता पडता भेटला. त्याला आमचं काम समजावून सांगितल्यावर, तो म्हणाला की प्लॅस्टिकचे बिल्ले तो दोन तीन दिवसांत बनवून देऊ शकेल. बिल्ला कसा असावा? त्यावर शेतकरी संघटना हे शब्द असावेत आणि रंग फक्त तांबडा आणि पांढरा असावा एवढंच काय ते आमच्या डोक्यात स्पष्ट होतं. अक्षरांची बांधणी किंवा मांडणी कुणाकडून तरी करून घेऊन मंजूर नामंजूर करायला वेळच नव्हता. आम्ही हे काम रमेशभाईंच्या भावाकडं

सोपवलं व निघालो. त्या वेळी तयार झालेल्या प्लॅस्टिकच्या बिल्ल्याचे काही नमुने आजही उपलब्ध आहेत; पण शेतकरी संघटनेचे ते तांबडे गोलाकार प्रतीक आज जगभर प्रसिद्ध झाले आहे आणि लक्षावधींना स्फूर्ती देत आहे. संघटनेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला कोण येणार? खासदार-आमदार तर सोडाच अगदी पंचायत समितीचा सभापतीसुद्धा या कार्यक्रमाला यायला तयार झाले नसते. शेवटी आंबेठाण जवळच्या एका गावातील पंचायत समितीच्या एका सदस्याच्या हस्ते उद्घाटनाचा कार्यक्रम झाला. दुसरे कुणी आले नसते हेही खरेच; पण त्याबरोबर पंचायत समितीचा हा मेंबर भामनेरच्या सडकेच्या आंदोलनात उपयोगी पडेल अशी थोडीफार आशा असावी. बाबूलाल परदेशीच्या कल्पना जास्त व्यवहारी, हे पुढारी निदान शंभर रुपये देऊन आजीव वर्गणीदार होतील असा त्यांचा आडाखा. पुढाऱ्यांनी ते कबूलही केले आणि पन्नास रुपये रोख दिले. उरलेले पन्नास रुपये अजून द्यायचे आहेत. पहिला अंक तर प्रसिद्ध झाला. प्रसिद्धीच्या वेळापर्यंत अंक कसाबसा छापून झाला. बाबूलाल सिद्धहस्त लेखक आहे. अगदी नवे अगदी मूलगामी बोलणारे लिहिणारे मला जे लोक पाच दहा वर्षांत भेटले त्यांच्यात त्याचा अगदी वर क्रमांक लागेल. एका बाजूला जुळवणाऱ्याला हजर करायचे, त्याला एक पाच दहा ओळींचा मजकूर देऊन कामाला लावायचे, तेवढा मजकूर जुळवून होईपर्यंत आणीख पंधरा वीस ओळी लिहून द्यायच्या असे त्याने अनेकवेळा केले आहे. पण त्याचा छापखाना हा व्यंकटेश माडगुळकरांच्या ग्रामीण कथांत शोभून दिसण्यासारखा. सगळे जुळारी हे अर्धवेळ शेती करणारे आणि त्यापेक्षा जास्त वेळ इतर अनेक भानगडीत अडकलेले. त्यांना बाबापुता करून शोधून बोलावून आणावे लागे तरी ते सारखे निसटून जात. तारीख आणि वेळ यांची जाणीव बाबूलालच्या छापखान्यांत फारशी नाही. लग्नाची तारीख उद्यावर येऊन पडली, आता तरी लग्नपत्रिका द्या म्हणून ग्राहकच त्यांच्याकडे काकुळतीला येऊन बसलेले दिसायचे. चाकणमधला एकुलता एक छापखाना म्हणून त्यांच्या सोयीने लग्नाच्या तारखा मागेपुढे कराव्या लागत. गुरुवार सकाळपर्यंत संपादक म्हणून मी मजकूर हजर करायचा असं ठरलं होतं. सगळ्या कामाच्या धांदलीत बुधवारी रात्रभर बसून सत्तावीस अठ्ठावीस पानं मजकूर लिहून काढायचा आणि उजाडता उजाडता बाबूलालच्या घर कम छापखान्यासमोर जाऊन उभा राहायचो. बाबूलालची आणखी एक सवय म्हणजे मारुतीच्या देवळात रात्री तीन साडेतीनपर्यंत गप्पा मारायच्या आणि नंतर सकाळी दहावाजेपर्यंत ताणून द्यायची. त्यांच्या बायकोलाही माझ्या येण्याची कटकट वाटत असावी. ती बाबूलालला गदगदा उठवायची, ''अहो तुमचा सासरा आलाय बघा.'' मग दुपारपर्यंत वेळ जुळारी शोधण्यात जायचा. कधी जुळारी मिळायचे कधी मिळायचे नाहीत.

दुसऱ्या दिवशी सकाळी काम हमखास सुरू होईल असे आश्वासन बाबूलाल द्यायचा आणि एकदा काम चालू झालं की काय हो, दोन तीन तासात अंक तयार असं सांगून माझी चिंता दूर करायचा प्रयत्न करायचा. शुक्रवारी सकाळी पुन्हा मी हजर आणि पुन्हा परिस्थिती तीच. शनिवारी दुपारपर्यंत का होईना अंक कसाबसा तयार करावा ही माझी धावपळ असायची. बाबूलाल घड्याळ काय पण कॅलेंडरकडेसुद्धा लक्ष देणे म्हणजे विलायतेतून आलेल्या लोकांचे फॅड समजायचा. साप्ताहिक वारकरीचा प्रत्येक अंक म्हणजे जुळारी, छापखाना, बाबूलाल आणि वेळ यांच्याशी घेतलेली निकराची झुंज व्हायची. छपाई कामाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रचंड संख्येने मुद्रण दोष. मला स्वतःला मीच लिहिलेला मजकूर छापलेला तपासता येत नाही. लिहिलेली वाक्य मनात इतकी पक्की बसलेली असतात की मुद्रणातच्या चुका लक्षातच येत नाहीत आणि बाबूलालला कोणत्याच चुका चुका वाटत नाहीत असा सगळा आनंद. भावी काळातील राजवाडे वारकरीचे अंक घेऊन बसतील तेव्हा मुद्रणदोष ओलांडता ओलांडता वाचताना त्यांच्या डोक्याला मुंग्या आल्याखेरीज राहणार नाहीत. त्यावेळी लिहिलेल्या लेखांपैकी अनेक लेख हे केवळ स्थानिक महत्त्वाचे; पण त्याबरोबर 'इंदिरा इंडिया झाली भारताचे वाली कोण', 'इंदिरा गांधींची पहिली गाडी चुकली', 'विचारवंतांचे बुद्धिदारिद्र्य', 'एकोणपन्नास कोटीची कर्जमाफी' इत्यादी आजही अनेकांना आवडणारे लेख त्यावेळी प्रसिद्ध झाले. साप्ताहिक वारकरीने संघटनेच्या कामात काय हातभार लावला व काय भूमिका बजावली याबद्दल वेगळे सविस्तरपणे लिहायला पाहिजे. साप्ताहिक वारकरी नंतर शेतकरी संघटक त्यानंतर ग्यानबा हा प्रवाससुद्धा मोठा सूचक आहे. साप्ताहिक वारकरी संघटनेचे मुखपत्र होते. शेतकरी संघटकच्या पहिल्या अंकात 'शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव' मिळू लागले तर या देशाचे दारिद्र्य नष्ट होण्यास वेळ लागणार नाही या विचारांशी फक्त बांधिलकी सांगितली. ग्यानबा त्याहीपेक्षा आणखी स्वायत्त आणि स्वतंत्र राहावा असा आग्रह आहे.

पहिल्या महिन्यात दोन महिन्यातच साप्ताहिकाच्या आठवडी बाळंतपणाचा मोठा त्रास वाटायला लागला आणि एवढे करून कुणी वाचतं की नाही ही शंका कायमच. २३ जानेवारी १९८० रोजी भामनेरच्या मोर्चाकरिता मी वांद्र्याला मुक्कामाला जाऊन पोचलो. झोपायच्या आधी तिथली बरीच तरुण मंडळी कुतूहलाने गप्पा मारायला जमली होती. त्यावेळी 'शेतकऱ्यांची संघटना अडचणी आणि मार्ग' ही लेखमाला वारकरीमध्ये प्रसिद्ध झाली होती. यात संघटनेच्या विचाराचा सर्व तथ्यांश येऊन गेला होता; पण ती लेखमाला कोणी वाचते आहे अशी मलाही आशा नव्हती. वांद्र्याचा भोसले नावाचा एक कार्यकर्ता आहे. त्याने बोलता बोलता एकदम वाक्य फेकले. 'ज्या समाजाची प्रगती खुंटली आहे त्याची स्थिती साचलेल्या डबक्याप्रमाणे होते.' मी एकदम चमकलो. या लेखमालेतले हे वाक्य मी चटकन ओळखले व त्याला विचारले, 'हे वाक्य तू कुठे वाचलेस?' तो म्हणाला 'साहेब हे तुमच्या लेखातले वाक्य आहे.' 'तुम्ही हे लेख वाचता?', 'म्हणजे काय? आम्ही गावात सार्वजनिक वाचन करतो आणि माझी तर वाक्येच्या वाक्ये पाठ आहेत.' असे सांगून त्याने कितीतरी वाक्ये म्हणून दाखवली. मला खूप बरं वाटलं. इतक्या उपद्व्यापाने फेकलेले बियाणे, मावळातील सगळ्या डोंगरमाथ्यावर एका ठिकाणी तरी रुजत असेल तरी सगळ्या कष्टांचे चीज झाले.

(पूर्वप्रकाशन : साप्ताहिक आठवड्याचा ग्यानबा, १ मार्च १९८८)

**शरद जोशी**
'अंगारमळा', अंबेठाण, ता. खेड, जि. पुणे.
sharadjoshi.mah@gmail.com

■■

# रामदेव बाबा आणि शेतकरी संघटना

**महात्मा गांधींना गुरूस्थानी मानणारे जयप्रकाश नारायण असो की अण्णा हजारे यांनीही भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवला, आंदोलनं केली. त्यांच्या मर्यादा काळाने स्पष्ट केल्या. आता रामदेवबाबा काळ्या पैशाच्या संदर्भात आवाज उठवत आहेत. त्यांचा जयप्रकाश नारायण किंवा अण्णा हजारे व्हायला वेळ लागणार नाही. आपल्याकडे राजापेक्षा साधुसंतांची अधिक पूजा होते. ते जनतेला तारू शकताता किंवा मारूही शकतात. रामदेवबाबा यांच्याकडे असलेला लोकांचा ओढा आणि त्यांची सामाजिक प्रश्नांबाबतची तळमळ लक्षात घेता शेतकरी संघटनेने मैत्रीचा हात त्यांच्यापुढे करण्याचा निर्णय घेतला.**



**रवि देवांग**

महात्मा गांधींनी देशाच्या राजकीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. देशातील जनतेला स्वातंत्र्य उत्सुक केले. देश समजून घेण्यासाठी आपले राजकीय गुरू गोपालकृष्ण गोखले यांचा सल्ला मानून आगगाडीने तिसऱ्या वर्गातून प्रवास केला. नव्या पिढीला स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासाची तोंडओळख नाही; परंतु जे काम भल्या भल्या राजकीय धुरीणांना जमले नाही ते रिचर्ड ॲटनबरो यांचा गांधी किंवा मुन्नाभाईची गांधीगिरी पाहिल्यावर तरुण पिढीला गांधींची ओळख करून द्यायला उपयोगी ठरले. नाही म्हणायला नारायणभाई देसाई यांची गांधी कथा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांन खूपच भावते.

भ्रष्टाचाराचा उगम सत्तेच्या केंद्रीकरणात आहे. सत्ता विखुरलेली असावी. जितकी अधिक सत्ता केंद्रीभूत तितका भ्रष्टाचार अधिक. सत्ता माणसाला भ्रष्ट करते. सर्वंकश सत्ता सत्यानाश करते. ही गोष्ट महात्मा गांधींनी हेरली होती. ते अराज्यवादी होते. शेतकरी संघटनेनं सरकारशाहीच्या विरोधात स्पष्ट भूमिका घेतली. महात्मा गांधींना गुरूस्थानी मानणारे जयप्रकाश नारायण असो की अण्णा हजारे यांनीही भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवला, आंदोलनं केली. त्यांच्या मर्यादा काळाने स्पष्ट केल्या. आता रामदेवबाबा काळ्या पैशाच्या संदर्भात आवाज उठवत आहेत. त्यांचा जयप्रकाश नारायण किंवा अण्णा हजारे व्हायला वेळ लागणार नाही. आपल्याकडे राजापेक्षा साधुसंतांची अधिक पूजा होते. ते जनतेला तारू शकताता किंवा मारूही शकतात. रामदेवबाबा यांच्याकडे असलेला लोकांचा ओढा आणि त्यांची सामाजिक प्रश्नांबाबतची तळमळ लक्षात घेता शेतकरी संघटनेने मैत्रीचा हात त्यांच्यापुढे करण्याचा निर्णय घेतला.

मध्यंतरी पारसच्या आंदोलनानिमित्त अमरावतीला मुक्कामी होतो. दुसऱ्या दिवशी २००० जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा रामदेवबाबांच्या उपस्थितीत पार पडला. त्याचे मुख्य प्रायोजक स्थानिक युवा आमदार राणा हे होते. हे राणा जमीन विकासक म्हणून प्रसिद्ध आहेत. आजचा जमीन विकासक उद्याचा लॅण्ड माफिया होतो. असा अनुभव आहे. अमरावतीतील राणासारखे युवा आमदार रामदेव बाबांचे प्रयोजक हे उद्याचे 'डॉन' असतील तर या आध्यात्मिक राजकीय चळवळीचे काय होईल. लोक आशेने भाबडेपणाने बाबांकडे पाहतात. रामदेवबाबांजवळ नक्की आर्थिक कार्यक्रम काय? त्यांनी योगा प्रमाणपत्र क्षेत्रात अभूतपूर्व कार्य केले आहे. रामदेवा बाबांची माणसं निवडून आल्यावर त्यांची विषयपत्रिका काय असेल? स्वतंत्र भारत पक्षाचा जाहिरनामा आणि शेतकरी संघटनेचे तत्त्वज्ञान रामदेवबाबांच्या महाराष्ट्रातील प्रमुख कार्यकर्त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न आम्ही केला. वामनराव चटप, राम नेवले, सरोजताई काशीकर व मी आम्ही त्यांच्याशी संवाद साधला. ते भारावून गेले. दोन दिवसांचे प्रशिक्षण करण्याचे ठरले.

रामदेव बाबांनी २४ मार्च रोजी नागपूरला ८ दिवसांच्या मुदतीत लाखभर माणसे गोळा करून दाखवली. त्यांच्या व्यासपीठावर राम नेवले, दिनेश शर्मा, जगदीश नाना बोंडे होते. संघटनेने खूपजणांचा अनुभव घेतला. रामदेवबाबांच्या एका आध्यात्मिक वादळाला शेतकरी संघटना सामाजिक राजकीय दिशा देवू शकते. त्यातून व्यवस्था परिवर्तनाची लढाई बळकट होवू शकते. या वादळापुढे भले भले वाहून जातील. यातून संघटनेचे ८-१० खासदार व ३०-४० आमदार सहज निवडून येऊ शकतात. हे बायप्रॉडक्ट मोलॅसिस असेल. व्यवस्था परिवर्तनाची गोड साखर खायची असेल तर रामदेव बाबांना जवळ करण्याचा धोका पत्करायला हवा. शेवटी क्रांतिकारकाला गमावण्यासारखे काहीच नसते. मराठी रियासत वाचविण्याचा शेवटचा अयशस्वी प्रयत्न बापू गोखलेंनी केलाच ना! ही लढाई रामदेवबाबांच्या साथीने लढून पाहू. धोका झालाच तर रामदेव बाबांच्या हातात कमंडलू असेल. निदान खंजीर तर नसेल!

**- रवि देवांग**
अध्यक्ष, शेतकरी संघटना
मो. ९४२२२९६३५८.
ravi.metta@gmail.com

■■

# वर्धापनदिनाच्या निमित्ताने



गंगाधर मुटे

ही गोष्ट आहे १९८६-८७ च्या सुमारातली. सुरेश चोपडे सकाळी ६ च्या सुमारास माझ्या वर्धेतील खोलीवर आला आणि आल्याआल्याच अगदी दारावरूनच हुकूम सोडला.

'ए आवर रे पटकन, आपल्याला तातडीने निघायचे आहे.' मीसुद्धा कुठे, कशाला, कशाने वगैरे कोणताही उपप्रश्न न विचारताच तयारी केली आणि बाइकवर बसलो. तो येतानाच रवीभाऊ काशीकर यांच्याकडूनच बाइक घेऊन आला होता. रस्त्याने निघालो आणि मग सांगायला लागला. मुरलीचा (मुरलीधर खैरनार) फोन होता. आठवड्याचा ग्यानबा अंक प्रिंटिंगला गेलाय; पण कागदाला पैसे नाहीत म्हणून छपाई थांबली आहे. आपल्याला आजच्या आज किमान शंभर तरी नवीन वर्गणीदार करून दुपारपर्यंत डीडी पाठवायचा आहे आणि मग सुरू झाली युद्धपातळीवर वर्गणीदार नोंदविण्याची मोहीम. तो काळच वेगळा होता. शेतकरी समाज शेतकऱ्यांची संघटना निर्माण झाल्यामुळे भारावला होता. संघटनेचे कार्यकर्ते एका ध्येयाने झपाटले होते. काहीतर चक्क वेडे झाले होते. परभणी अधिवेशनावरून परतलेल्यांना परभणी पागल अशी उपाधीच बहाल झाली होती. मग आम्ही मोर्चा वळवला नेमक्या अशाच घरांकडे. त्यातील बहुतांश आधीच वर्गणीदार होते आणि तरीही प्रत्येकाने पावत्या फाडल्यात. पैसे दिलेत. यामागे आठवड्याचा ग्यानबा चालला पाहिजे ही भावना होतीच पण त्याहीपेक्षा शरद जोशींच्या माणसांना नाही म्हणायचे नाही हीच प्रबळ भावना होती. आम्ही दुपारपर्यंत उद्दिष्ट पूर्ण केले आणि डीडी काढून नाशिकच्या दिशेने रवाना केला.

शेतकऱ्यांमध्ये कार्य करणे किंवा शेतकऱ्यांसाठी साप्ताहिक चालविणे किती कठीण असते याची जाणीव चळवळीबाहेरच्या जनतेमध्ये असतेच असे नाही. शेतकरी संघटनेचा विचार अधिक प्रभावीपणे आणि बिगर शेतकरी, शहरी माणसांपर्यंत पोचला पाहिजे या उद्देशाने नाशिक येथून आठवड्याचा ग्यानबा हे साप्ताहिक सुरू करण्यात आले होते; पण तो प्रयोग काही फारसा यशस्वी झाला नाही आणि साप्ताहिक ८-९ महिन्यांतच बंद पडले. पुन्हा शेतकरी संघटकची धुरा म्हात्रेसरांच्या खांद्यावर आली.

शेतकरी संघटनेसारख्या व्यापक जनाधार असलेल्या आणि इतिहासातल्या सर्वांत मोठ्या शेतकरी आंदोलनाच्या आंबेठाण येथील मध्यवर्ती कार्यालयाचा संपूर्ण कार्यभार एकट्या प्रा. सुरेशचंद्र म्हात्रेसरांनीच एकहाती सांभाळावा, असे विधिलिखितच असावे, असे वाटते. कारण सरांमागचा कामाचा व्याप कमी करण्याचे सर्वच प्रयोग असफल ठरलेत. प्रशिक्षण शिबिरे असोत की शेतकरी संघटक, कार्यालयीन पत्रव्यवहार असो की आणखी काही, सर्व सांभाळायचे काम म्हात्रेसरांकडेच. शरद जोशींना पर्याय बनू पाहणारे संघटनेत खूप झालेत, शरद जोशींपेक्षा आपणच काकणभर सरस आहोत, अशी दिवास्वप्नेही अनेकांना पडलीत; पण म्हात्रेसरांना पर्याय सोडाच पण निदान मददगार तरी व्हावे, या वाटेला चुकूनदेखील कोणी गेले नाही. सरांवरचा प्रशिक्षण शिबिरांचा भार कमी करण्यासाठी चंद्रकांत वानखेडे आंबेठाणला होते; पण काही महिनेच. त्यानंतर अमर हबीब, ब.ल. तामस्कर, कालिदास आपेट आणि स्वतः मीसुद्धा आंबेठाणला होतो; पण वर्षभरच. म्हणजे गेल्या तीस वर्षांमध्ये केवळ वर्ष-दीड वर्षाचा अल्पकाळ सोडला तर मध्यवर्ती कार्यालय आणि शेतकरी संघटक या दोन्ही जबाबदाऱ्या म्हात्रेसर एकटेच समर्थपणे सांभाळत होते.

शेतकरी संघटक औरंगाबादवरून प्रकाशित व्हायला लागल्यापासून सरांवरील भार कमी व्हायला नक्कीच मदत झाली असावी. कार्यकारी संपादक श्रीकांत उमरीकर यांच्या अथक प्रयत्नाने संघटकच्या स्वरूपातही आमूलाग्र बदल झालेला आहे. अंक देखणा आणि वाचनीय झाल्याने वर्गणीदार संख्याही वाढायला लागली आहे; पण शेतकरी आंदोलनाचा विचार अधिक व्यापकपणे रुजविण्यासाठी एवढे पुरेसे नाही. शेतकरी संघटक प्रत्येक गावात, प्रत्येक घरात पोहोचायला हवा. महाराष्ट्रातील सर्व बुकस्टॉलवर दिसायला हवा. हे उद्दीष्ट सोपे नसले तरी कठीण नाही कारण शेतकरी संघटना किंवा शेतकरी संघटकसारखे पाक्षिक चालवणे किती कठीण असते, हे चळवळीत काम करणाऱ्यांनादेखील पक्के ठाऊक आहे. म्हणूनच शेतकरी संघटनेला वेडेपीर मिळालेत. घरचं खाऊन लष्कराच्या भाकरी भाजणारे सैनिक मिळालेत आणि पदरचे पैसे खर्च करून शेतकरी संघटनेची आपल्या आईसमान जोपासना करणारे कार्यकर्तेही मिळालेत.

६ एप्रिलला शेतकरी संघटकला २७ वर्षे पूर्ण होत आहे. जाहिराती न घेता निव्वळ वर्गणीदारांच्या बळावर एवढा प्रदीर्घकाळ वाटचाल करणे, वाटते तेवढे सोपे नाही. शिवाय ज्या पाक्षिकाचा वर्गणीदार बहुतांश प्रमाणावर शेतकरी आहे, ज्याचे लिहिण्यावाचण्याशी हाडवैर आहे, अशा वर्गणीदारांना घेऊन, त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करून त्यांना निदान शरद जोशींचे लेख वाचायला लावण्याइतपत त्यांच्यात वाचनाची रुची निर्माण केली, ही शेतकरी संघटकची फार मोठी उपलब्धी मानावी लागेल. शेतकरी संघटक वेळेवर आला नाही आणि शरद जोशींचा लेख वाचायला मिळाला नाहीतर लोक कसे कसावीस होतात, हे मी अनेकदा अनुभवलं आहे. शरद जोशींना आणि शेतकरी संघटनेच्या विचारांना शेतकऱ्यांच्या माजघरातील देव्हाऱ्यापर्यंत पोचविण्याचं ऐतिहासिक कार्य शेतकरी संघटकने आजवर चोखपणे बजावलं आहे, हे सत्य आहे, निर्विवाद आहे आणि यापुढेही ते अधिक जोमाने चालत राहील याची खात्री आहे.

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
मो. ९७३०५८२००४

■■

# खचलेले शेतकरी, निर्ढावलेले अधिकारी आणि निर्लज्ज राजकारणी

**श्रीकृष्ण उमरीकर**

धामणगाव, अमरावती जिल्ह्यातले एक छोटे गाव. ३० जून २००६ रोजी सगळ्या देशाचे लक्ष त्या गावाकडे लागले होते. त्यातल्या त्यात कापूस उत्पादक शेतकरी मोठ्या आशेने तिथून काय बातमी येते म्हणून तिकडे डोळे लावून बसले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे बोकेसुध्दा तिकडेच बघत होते. जर काँग्रेसच्या पंतप्रधानांनी कर्जबाजारी होऊन एकामागे एक आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी मोठी मदत देऊ केलीच तर विदर्भात आधीच आपल्याला स्थान नसताना या मदतीनंतर तिथे बस्तान बसवणे कठीण जाईल असा विचार करत चिंतातूर होऊन विचारात पडले होते. ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यांचे कुटुंबीय जर काही मदत मिळालीच तर आपल्या उपाशी लेकरांना दोन घास खायला मळतील या आशेने धामण गावातून येणाऱ्या बातमीकडे बघत होते.

धामणगावाकडे विदर्भातल्या कृषी विभागात कार्यरत जी काही भ्रष्ट बांडगुळे आहेत तीही लक्ष देऊन होती. जर पंतप्रधानांनी एखादे पॅकेज देऊ केलेच तर...

लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यावर एका पंतप्रधानाला जाग आली. ते महोदय मग 'स्वतः परिस्थिती जाणून घ्यायची' म्हणून विदर्भात गेले. त्यांनी जून ३०, २००६ रोजी धामणगावास भेट दिली. त्यांनी काय 'पाहिले' कोणास माहीत; पण जे पाहिले त्यावरून त्यांनी विदर्भातल्या सहा जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक पॅकेज जाहीर केले. आपले पंतप्रधान खरे तर एक व्यावसायिक अर्थतज्ज्ञ आहेत. कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न नेमका काय आहे हे त्यांना कळायला हवे होते. तो प्रश्न काय आहे? त्याचे खरे उत्तर कोणते? हे त्यांना कळालेच नाही किंवा कळाले पण 'वळले' नाही ही गोष्ट मनमोहनसिंगच जाणो; पण त्यांनी जे काही पाहिले आणि त्यांना त्याचे जे काही आकलन झाले त्यावरून त्यांनी आपल्या 'पॅकेज'मध्ये पुढील सवलती जाहीर केल्या.

१. शेतकऱ्यांच्या कर्जावरील ७१२ कोटी व्याजाची माफ
२. १३०० कोटी रुपयांच्या कर्जाची पुनर्रचना करून ते फेडण्यासाठी ३-५ वर्षांचा अवधी.
३. शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एका तज्ज्ञाच्या समतीची स्थापना.
४. चालू खरिप हंगामासाठी १२७५ कोटी रुपयांचे कर्ज देण्याची व्यवस्था.
५. सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी २१७७ कोटी रुपयांचा निधी.
६. १८० कोटी रुपयांचे बियाणे आणि २४० कोटी रुपये जलसंधारणासाठी.
७. सहा जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्येक ५० लाख रुपये आपदग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्याकरिता.

ही मदत म्हणजे काही स्वतःच्या खिशाला



चाट मारून दिलेली देणगी नव्हती, तर कित्येक दशकांपासून शेतकऱ्यास लुटून जमा केलेल्या लाखो कोटी रुपयांतले काही हजार कोटी त्यांना परत करण्याचा एक प्रयत्न होता केवळ. वार्ताहरांच्या प्रश्नांना उत्तर देताना त्यांनी हे कबूल केले की 'कापसाचे भाव शेतकऱ्याचे नुकसान करणारे आहेत' (त्यांचा शब्दः ॉपिशीर्शीपिशीरींर्ळीश). म्हणजे कापसाच्या खरेदीमध्ये शेतकरी लुटला जातो याची कबुलीच त्यांनी दिली. सर्वांच्या समक्ष. 'सरकारच्या धोरणात जर 'गरज असली तर' आम्ही बदल करू; पण त्याला 'थोडा' वेळ लागेल, असे आश्वासनही त्यांनी दिले. (ते एकेकाळचे विद्वान अर्थतज्ज्ञ जरी असले तरी काँग्रेसमध्ये राहून त्यांचे रुपांतर एका निर्लज्ज, निर्ढावलेल्या, आपली खुर्ची टिकवण्यासाठी असंगाशी संग करणाऱ्या राजकारण्यात झालेले आहे.) मनमोहन सिंग यांच्यासारख्या विद्वान माणसाबद्दल असे शब्द वापरताना आम्हाला खेद झाला असता, जर शा विद्वानाने आपल्या पॅकेजची अंमलबजावणी नीट होते का नाही याकडे लक्ष दिले असते. या विद्वानाला नावे ठेवताना आमची जीभ कचरली असती, जर त्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्ये मागचे खरे कारण कापसावर लादण्यात आलेली सरकारी बंधने आहेत हे ओळखून कापसाची शेती बंधनमुक्त करून त्याला एका निर्यातक्षम उद्योग मानून कापसाच्या निर्यातीस प्रोत्साहन देणारे धोरण जर आखले असते. या विद्वानाबद्दल वाईट बोलायला आम्ही धजलो नसतो, जर त्यांनी आपले सरकार स्वार्थापोटी शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेत नाही हे ओळखून राजीनामा दिला असता; पण त्यांनी यातले काहीच नाही केले. शेतकऱ्यांच्या रक्तावर पोसलेल्या काँग्रेसी जळवेच्या परंपरेत शोभणाया घोषणा त्यांनी केल्या आणि शेतकऱ्यांच्या हिताचा नुसता 'आव' आणून ते दिल्लीला परत गेले आणि

विदर्भाला विसरून गेले. पॅकेजची घोषणा करताना त्यांनी जो शेतकऱ्यांची व्यथा पाहून कळवळणारा चेहरा केला होता तो चेहरा नसून नुसता मुखवटा होता. त्याच्यामागे निर्ढावलेला काँग्रेसी राजकारणाचाच चेहरा होता म्हणून या विद्वान पंतप्रधान साहेबांना दुषणे देत असताना आम्हाला यत्किंचितही खेद होत नाही.

याच दौऱ्यात त्यांनी राज्याच्या मुख्यमंत्र्यांची प्रशंसा केली होती. 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी राज्य सरकार समाधानकारकरीत्या काम करत आहे' असे प्रशस्तीपत्रही त्यांनी 'आदर्श' अशोकरावांना दिले होते. अशा योजना राबवताना घोटाळे होऊ शकतात असे त्यांच्या निदर्नास आणले असता त्यांनी 'माझे कार्यालय यात जातीने लक्ष घालेल. मुख्य सचिवांना मी आदेश दिले आहेत की या पॅकेजची अंमलबजावणी करत असताना त्यात लालफितशाही घुसू नये. म्हणून त्यांना संबंधित आधकाऱ्यांशी चर्चा करून मार्ग काढण्यास सांगितले आहे. ही परिस्थिती युध्दसदृष्य असून तीवर तातडीचे उपाय योजने जरुरी आहे.

**सावकारांनी थकीत कर्जाच्या बदल्यात शेतकऱ्यांच्या जमिनी घशात घालू नयेत म्हणून सहकार उपनिबंधकांनी आदेश दिले. त्याविरुध्द सावकार उच्च न्यायलयात दाद मागायला गेले असता उच्च न्यायालयाने सहकार उपनिबंधकांच्या आदेशाला स्थगिती दिली. त्याविरुध्द राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात न जाता आळीमळी गुपचिळी असे धोरण अवलंबिले.**

अर्थात त्यांच्या या सवलतींमुळे विदर्भातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांची भरभराट भले न होवो पण त्यांच्या आत्महत्या थांबतील अशी अपेक्षा बाळगणे गैर नव्हते; पण तसे काहीच झाले नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या चालूच राहिल्या. २००६ मध्ये १६५८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यातल्या केवळ ६७२ सरकारी मदतीसाठी 'पात्र' समजण्यात आल्या. २००७ मध्ये १४०४ (२९४ 'पात्र'), २००८ मध्ये १३५६ (३४७ 'पात्र'), २००९ मध्ये ११५६ (२७४ 'पात्र'). शेतकऱ्यांची हालत जास्तीच वाईट होत गेली.

पंतप्रधानांनी केलेली मदत वाया गेली, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यात त्यांना यश आले नाही याची मुख्य कारणे दोन आहेत. एक म्हणजे त्यांनी योग्य उपाय केले नाहित जसे कापसाच्या ोतीवरील, विक्री वरील सरकारी बंधने काढून टाकणे आणी दुसरे म्हणजे मदत योजनांच्या अंमल बजावणीत झालेला भ्रष्टाचार, ज्यामुळे जी काही तुटपुंजी मदत दिल्या गेली ती सरकारी व्यवस्थेमधील भ्रष्ट बांडगुळे खाऊन गेली. शेतकऱ्याच्या पदरी आली केवळ आत्महत्या करण्याची परिस्थिती. ही धक्कादायक परिस्थिती समोर आली ती एका जनहितार्थ याचिकेच्या सुनावणी दरम्यान. श्रीमती वंदना शेंडे या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या विधवा पत्नीस जिल्हा प्रशासनाने रु. १०,०००/- (केवळ!) एक धनादेश दिला होता. तो न वटताच वापस आला. 'हे पाहून आम्हाला धक्का बसला' अशी टिप्पणी मुंबई उच्च न्यायलयाच्या नागपूर खंडपीठाच्या न्यायमुर्तीनी व्यक्त केली. त्याच सोबत 'समाज तथा न्याय व्यवस्थेसाठी ही बाब क्लेशकारक' असल्याचे नमूद करत हा प्रकार गंभीर असल्याचे म्हटले. त्यावर आपली गेलेली अब्रू झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न करत जिल्हा प्रशासनाने स्वत:च श्रीमती शेंडे यांच्या खात्यात दुसरा 'वटणारा' धनादेश जमा केला. यासारख्या दुसऱ्या प्रकरणात उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे पालन शासन करत आहे का? असा प्रश्नही न्यायलयाने विचारला. सोबत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मदतीची माहिती संबधीत वेबसाईटवर अद्ययावत करण्यात येते का नाही? असेही स्पष्ट करण्यास सरकारी वकिलास सांगितले.

शेतकऱ्यांची परवड इथेच थांबली नाही. शेतकऱ्यांसाठी म्हणून जी कीटकनाशके पुरविण्यात आली त्यांची 'एक्स्पायरी डेट' उलटलेली होती असे दिसून आले. एका तहसिलदाराने जळगाव जामोद येथे धाड घातल्यावर ही बाब समोर आली. 'मी तरी काय करू ही कीटकनाशके आहे तशीच शेतकऱ्यांना वाटा असे 'वरिष्ठांचे' आदेश होते,' असे कृषी अधिकाऱ्याने सांगितले!' ही बाब एका वाहिनीने उजेडात आनली असता- 'संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना या प्रकरणाची चौकशी करण्यास सांगण्यात येईल' असे सरकारी उत्तर अतिरिक्त आयुक्तांनी दिले.

ज्या शेतकऱ्यांनी राष्ट्रियकृत बँकांकडून कर्ज घेतले होते, त्यांनाच व्याज माफी मिळणार होती. ज्यांनी सावकाराकडून घेतले होते त्यांना आत्महत्याच करावी लागली. वा रे पॅकेज वा रे त्याची अंमलबजावणी!

गेल्या वर्षी एप्रिल अखेरीस आपले 'आदर्श' मुख्यमंत्री दिल्लीला गेले होते. जनपथवरील 'दरबरात' जाऊन त्यांनी देवीचे 'दर्शन' घेतले असावे. त्यानंतर ते नियोजन आयोगाच्या उपाध्यक्षाला भेटले. २००६ साली मनमोहन सिंग यांनी दिलेले ३७५० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यास कसे अपुरे पडत आहेत याचा पाढा त्यांनी वाचला आणि जास्तिच्या रुपये ७,००० कोटींची मागणी केली. त्याच वेळेस एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने वर्तमानपत्राच्या प्रतिनिधींना असे सांगितले होते की 'नियोजन आयोगाने पंतप्रधानांच्या पॅकेजच्या अंमलबजवणीमध्ये काही त्रूटी असल्याचे आमच्या निदर्शनात आणून दिले आहे. आम्ही त्यांचे 'समाधान' केले आहे. त्यांनी त्रयस्थ संस्थेकडून अंमलबजावणीची तपासणी करून घेण्यास सांगितले आहे. ती आम्ही करून घेऊ.' याचा अर्थ असा की पॅकेजच्या अंमलबजावणीमध्ये गडबड होत आहे हे सर्वांना माहीत होते. जे मिळाले ते पुरे नव्हते आणि अजून मिळावे यासाठी जास्तिचे पैसे मागायला आपले 'आदर्श' मुख्यमंत्री दिल्लीला गेले होते. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे अंमलबजावणीत भ्रष्टाचार होत आहे हे लक्षात येऊनसुध्दा कोणी ओरड केली नाही. शेतकऱ्याची काही चिंता कोणास असती तर या 'आदर्श' मुख्यमंत्र्याला तेव्हाच राजीनामा द्यायला भाग पाडणे गरजेचे होते; पण ज्या प्रकारे सरकारी अधिकाऱ्यांचा पॅकेजच्या पैशांच्या 'वाटपबद्दलचा युक्तीवाद' ऐकून योजना आयोगाचे 'समाधान' झाले तसेच समाधान विरोधी पक्षांचे आणि इतरांचेही झाले असावे. शेवटी ३७५० करोड ही रक्कम कमी नाही. त्यात पुन्हा समोर ७००० करोड रुपयांचे गाजर दिसत होते. भ्रष्टाचाराने लप्त लोकप्रतिनिधी-सरकारी अधिकारी त्यामुळे लाळ गाळत येणाऱ्या पॅकेजची वाट पाहत बसले असतील तर त्यात नवल ते काय? आणि म्हणूनच कोणी आवाज उठवला नाही.

यालाही एक अपवाद होता तो म्हणजे कॅगचा. कंप्ट्रोलर अँड ऑडिटर जनरल म्हणजे कॅग. या एका सरकारी खात्याचे नाव अजून

फारसे बदनाम झालेले नाही. त्याकडे कोणी फारसे लक्षही देत नाही. कारण कॅग चे काम उत्तरीय तपासणीसारखे असते. घोटाळ्याचे पैसे परदेशात बेनामी खात्यात जमा झाल्यावर कॅगचा अहवाल येतो की घोटाळा झाला म्हणून. जर सरकारला वाटलेच तर सरकार एखाद्या समिती चौकशीचे नाटक करते. मग तो अहवाल कारवाईविना पडून राहतो. जर कधी विरोधी पक्षांना वाटलेच (म्हणजे त्यांना त्यांचा वाटा मिळाला नाही तर) तर ते आवाज उठवतात. मग एखाद्या छोट्या मोठ्या अधिकाऱ्याचा बळी दिला जातो आणि पुन्हा सारे कसे शांत-शांत होते.

पण या कॅगने महाराष्ट्रात पंतप्रधानांच्या पॅकेजच्या अंमलबजावणीमध्ये जी अनियमितता दिसून आली त्याविषयी पुढील निरीक्षणे नोंदवली आहेत. ३१ मार्च २००७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कॅगने जून २००७ पर्यंत पूर्ण करून आपला अहवाल सादर केला होता.

१. जून २००६ मध्ये महसूल खात्याने विदर्भातल्या ६ जिल्ह्यातील एकूण १७.६४ लाख शेतकऱ्यांपैकी १३.४८ लाख शेतकरी कर्जबाजारी होऊन हालाखिच्या परिस्थितीमध्ये असल्याचे नमूद केले होते. ही माहिती इतर संबंधित विभागांना पुरविण्यात आली नव्हती.
२. पॅकेजमधील काही योजनांत तांत्रिक त्रूटी होत्या. दिलेली माहिती शंकास्पद होती.
३. पॅकेजमध्ये शेतीवर दुरगामी सुधारणा करणाऱ्या योजनांवर केलेला खर्च अत्यल्प होता. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना फारसा फायदा झाला नाही.
४. पैसे मिळण्यास उशीर झाल्यामुळे किंवा प्रत्यक्षात उतरवता न येणाऱ्या योजना सादर केल्यामुळे पॅकेजची अंमलबजावणी योग्यरीत्या झाली नाही.
५. सरकारतर्फे या पॅकेजचा शेतकऱ्यांना खरेच काही उपयोग होतो आहे का याचा आढावा कधीच घेतल्या गेला नाही.
६. बँकांनी जरी ९.२९ लाख शेतकऱ्यांना कर्ज माफी दिली तरी त्यातील ४८% पेक्षा जास्त शेतकऱ्यांना पुन्हा नवे कर्ज दिल्या गेले नाही.
७. अवैध सावकारी करणाऱ्या सावकारांविरुध्द कोणतीही कार्यवाही केल्या गेली नाही. त्याच बरोबर केलेल्या सर्वेक्षणात असे दिसून आले की ७५% शेतकऱ्यांना या पॅकेजची माहितीच नव्हती. ४४% शेतकऱ्यांनी सांगितले की बँकांनी आधीचे कर्ज फेडण्यासाठी दबाव आणला. ६७% शेतकऱ्यांनी सांगितले, की बँकांनी तारण मागितले, तर ८% शेतकऱ्यांनी सांगितले की बँकांनी 'प्रोसेसंग फी' मागितली.
८. जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना ज्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली त्यांच्या लागवडीखालचे एकूण क्षेत्रफळ आणि उपग्रहाद्वारे मोजलेले एकूण क्षेत्रफळ यात तफावत आढळून आली. त्यावरून असे दिसून आले की ९ कोटी पेक्षा जास्त रक्कम नुकसान भरपाईच्या नावावर दिल्या गेली. (खरे तर ही आर्थिक मदत देताना तहसिलदार कार्यालयात उपलब्ध संगणकीकृत ७/१२ नोंदींचा उपयोग करण्यात यायला हवा. तो न करता तलाठ्यांनी दिलेली प्रमाणपत्रे आधार म्हणून घेण्यात आली.)
९. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यास 'तातडीची' मदत देण्यास १० ते ३२३ दिवसाचा विलंब झाल्याचे आढळून आले.
१०. विशिष्ट अशा १०५ बचत गटांना नियम डावलून जास्तिची मदत देण्यात आली.
११. नाबार्डने तांत्रिकदृष्ट्या अयोग्य असलेले लघू सिंचन प्रकल्प राज्य सरकारने दुसऱ्या खात्याकडून राबवून घेतले. त्यामुळे त्यावर केलेला खर्च वाया गेला.
१२. सरकारचा अंदाज चुकल्यामुळे बियाणांची तूट ६३% होती.
१३. राज्य सरकारने पाणलोट क्षेत्र विकासासाठी दिलेल्या ९७ कोटी रुपयांपैक केवळ १७ कोटी रुपये वापरण्यात आले.
१४. पॅकेजचे पैसे कसे वापरले या संबंधी विवासार्ह माहिती पुरविण्यात आली नाही.

कॅगच्या या अहवालाच्या दुसऱ्या प्रकरणात सहाव्या पानावर मोठी महत्वाची नोंद करण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे योजना आयोगाच्या सत्याोधन समतीने मार्च २००६ मध्ये असे सुचविले होते की ोतीमालाची आधारभूत किंमत ठरवताना संबंधित प्रदेशातील चढउतार ध्यानात घ्यावेत. ती किंमत केवळ अंदाजे काढलेली असू नये. तरीही केंद्र शासनाने २००३ ते २००६ या काळात जाहीर केलेली चार मुख्य पिकांची आधारभूत किंमत राज्य शासनाच्या समितीने सुचविलेल्या किंमतीपेक्षा २९ ते ३८ टक्क्यांनी कमी होती. २००६-०७ या हंगामासाठी ते ३१-४० टक्क्यांनी कमी होती. नियोजन आयोगाच्या सत्यशोधन समितीच्या सूचनांचे पालन करण्यात आले असते, तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी झाल्या असत्या. दुर्दैवाने पंतप्रधानांच्या पॅकेजमध्ये याचा समावेश केल्या गेला नाही.

सहकारी बँकांनी केलेल्या व्याज आकारणीवर कॅगने ताशेरे ओढले आहेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी १४% ऐवजी १७% दराने व्याजाची आकारणी केली. ज्यामुळे ४ लाखावर शेतकऱ्यांच्या एकूण ५१४.६ कोटी रुपयांच्या कर्जावर चुकीचे व्याज लावल्या गेले. पंतप्रधानांच्या पॅकेजमधील व्याज माफीसाठी दंडाचे व्याज गृहीत धरण्यात यावे असा निर्वाळा मुख्य सचिव सहकार यांनी दिला असता नतद्रष्ट राज्य सरकारने दंड व्याज माफ केले जाणार नाही असा पवित्रा घेतला. कॅगने केंद्र आणि राज्य शासनाने हा घोळ संपवावा अशी सूचना केली आहे.

या निमित्ताने विदर्भातल्या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात कॅगने बँकांचे जे परीक्षण केले त्यात पुढील निरीक्षणे नोंदवली आहेत. सहकारी बँकांनी मुद्दलापेक्षा जास्त व्याजाची आकारणी करू नये असा नियम असताना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या केवळ ७ शाखांनी ३.१९ कोटी रुपयांच्या कर्जावर ५.१३ कोटीचे व्याज आकारले आहे जे नियमाविरुध्द आहे. अकरा लाखांनी (ज्यात काही राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखाही आहेत) शेअर्स, कार, जीपसाठी घेतलेल्या कर्जावरील व्याज माफ केले.

कॅगने पणन महासंघालाही सोडले नाही. पणन महसंघाने १९८१-१९९२ च्या दरम्यान कापूस खरेदीमधून २१६.९१ कोटी रुपये कापून घेतले होते. 'कॅपिटल क्रिएशन' या नावाखाली. ते परत करताना पंतप्रधानांच्या पॅकेजमधून परत केले गेले तेही केवळ या सहा जिल्ह्यांत. प्रत्यक्षात ही कपात साऱ्या राज्यातून केल्या गेली होती. एवढेच नाही तर राज्य सरकारने दिलेल्या पैशांपैकी काही रक्कम पणन महासंघाने हडप केली. ही चोरी सरकारच्या नाकासमोरून केल्या गेली. सुतगिरण्यांनी शेतकऱ्यांकडून केलेली कपात पणन महसंघाकडे जमा केली नसल्याचेही

कॅगने नमूद केले.

सावकारांनी थकीत कर्जाच्या बदल्यात शेतकऱ्यांच्या जमिनी घशात घालू नयेत म्हणून सहकार उपनिबंधकांनी आदेश दिले. त्याविरुध्द सावकार उच्च न्यायलयात दाद मागायला गेले असता उच्च न्यायालयाने सहकार उपनिबंधकांच्या आदेशाला स्थगिती दिली. त्याविरुध्द राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात न जाता आळीमळी गुपचिळी असे धोरण अवलंबिले.

पंतप्रधानांच्या योजनेला महाराष्ट्रात मिळालेले 'यश' पाहून इतर राज्यांनाही तसेच 'यश' मिळवावे वाटले तर त्यात नवल ते कसले? म्हणून केंद्र शासनाने २००८ मध्ये १७००० कोटींचे एक नवे पॅकेज आंध्र, कर्नाटक, केरळ आणि महाराष्ट्रासाठी जाहीर केले.

जून २००७ मध्ये देशातील सरकारी कार्यालयांचे लेखा परीक्षण करणाऱ्या सर्वोच्च संस्थेने पंतप्रधानांच्या पॅकेजच्या अंमलबजावणीमध्ये घोटाळे झाल्याचे उघडकीस आणूनदेखील सरकारी कारभारात कोणताही बदल न करता पुन्हा नवे पॅकेज जाहीर करायचे म्हणजे सरकारी अधिकारी आणि राज्य पातळीवरील नेते यांना चरायला मोकळे कूरण करून देणेच आहे.

आत्महत्या करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आलेली पाहूनही राज्यातल्या अधिकाऱ्यांचे-नेत्यांचे मन द्रवले नाही. त्या थांबाव्यात म्हणून केंद्राने जी मदत देऊ केली त्यातही त्यांनी भ्रष्टाचार केलाच. याचा सुगावा मीडियाला लागला. मीडियानेही कधी नव्हे तर ती बातमी समोर आणली. त्याचे झाले असे की काही नेत्यांना पंतप्रधान पॅकेजमधून आर्थिक मदत मिळाल्याचा सुगावा काही वार्ताहारांना लागला. सगळेच वार्ताहार विकाऊ नसतात. मग त्यांनी 'मांडवली' न करता ती बातमी छापली. हे घोटाळे आवरायला हवे असे वाटून कधी नाही ते सरकारने एक समिती स्थापन करून त्यांना चौकशी अहवाल सादर करण्यास सांगितले. समितिने तो सरकारला सादर केला. त्यात ४०५ अधिकारी-कर्मचारी दोषी आढळल्याचे नमूद केले होते. त्यावर सरकार झोपी गेले. या संदर्भात देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला असता विखे पाटलांना उत्तर देणे आणि ५० अधिकायांना निलंबित करणे भाग पडले. उरलेल्या ३५५ ची चौकशी चालू असल्याचे त्यांनी सांगितले.

या सर्व प्रकरणाचा बारकाईने अभ्यास करता पुढील गोष्टी ठळकपणे नजरेत भरतात.

१. 'कापसाचे बाजरभाव कमी आहेत गरज पडल्यास त्यात आम्ही लक्ष घालू; पण त्यास थोडा वेळ लागू शकतो,' असे आश्वासन मनमोहन सिंगांनी दिले होते. या घटनेला एव्हाना पाच वर्षे पूर्ण होत आलीत. त्यांचा 'थोडा वेळ' अजून संपलाच नाही का? अजून किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यावर सरकारचे कापसाबद्दलचे धोरण बदलणार आहे?

२. 'शेतकऱ्यांची अवस्था पाहून मी व्यथित झालो आहे. त्यांना मदत देण्याचे काम युध्द पातळीवरून करावे लागेल. त्यात लाल फितशाही येता कामा नये. माझे कार्यालय त्यात जातीने लक्ष घालेल' असे त्यांनी म्हटले होते. प्रत्यक्षात पॅकेजची अंमलबजावणी अत्यंत ढिसाळपणे करण्यात आली. ती तातडीने झाली नाही. मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत पुरविण्यास सरकारला अक्षम्य विलंब झाल्याचे कॅगने निदर्शनात आणून दिले आहे. हा अहवाल जून २००७ मध्ये आला असताना जातीने लक्ष देणारे पंतप्रधान आणि त्यांचे कार्यालय काय झोपले होते का? हा अहवाल केंद्रातीलच एका जबाबदार संस्थेने तयार केला होता. याची कल्पना पंतप्रधान कार्यालयाला नव्हती का? एवढ्या गंभीर प्रकरणात जर पंतप्रधान पदावरील व्यक्ती एवढ्या बेजबाबदारपणे वागत असेल तर या सरकारला राज्य करण्याचा अधिकार कसा असेल?

३. पहिल्या पॅकेजच्या अंमलबजावणीचे धिंडवडे कॅगने काढले असता अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेत कोणतेही मूलभूत बदल न करता पुन्हा ४-५ राज्यांसाठी हजारो कोटी रुपये 'दान' करण्याचे धारिष्ट्य पी. चिदंबरम यांनी का दाखवले? त्या पैशांचा अपहार होणार नाही असा भाबडा विश्वास मनात ठेवण्यासारखे ते निरागस आहेत का? का तो होणार हे माहीत असून त्यास त्यांची मूक संमती होती?

४. राज्य सरकारला गोपाल रेड्डी समितीचा अहवाल कधी प्राप्त झाला? सरकारने दोषी कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यास एवढा वेळ का लावला?

५. बँकांनी शेती कर्जाच्या व्याज आकारणीत नियम डावलले आहेत हे लक्षात येऊनही त्या विरुध्द कारवाई का करण्यात आली नाही? औरंगाबादच्या व्यापाऱ्यांना महागड्या गाड्या घेण्यासाठी ७-८% व्याज आणि शेतकऱ्यास १२-१७% असा दुजा भाव कशासाठी? या पॅकेजचा गैरफायदा घेत ज्यांनी वाहनकर्जे माफ करून घेतली, त्यावरील व्याज माफ करून घेतले अशा देशद्रोही लोकांवर आणि ते करणाऱ्या बँकांच्या अधिकाऱ्यांवर सरकार कोणती कार्यवाही करणार आहे? असल्यास कधी?

थोडक्यात सांगायचे झाले तर राज्य सरकार असो वा केंद्र सरकार-पुढारी, कर्मचारी राज्यातले असो वा केंद्रातले त्यांना जनतेची काळजी मुळीच नाही. शक्य असेल तेथून भ्रष्टाचाराच्या मार्गाने पैसे काढणे हाच त्यांचा व्यवसाय आहे. ज्या व्यवसायात उत्पन्न आहे त्यातच माणूस मोठी गुंतवणूक करण्यास धजावतो म्हणूनच निवडणुकांचा खर्च करोडे रुपयांत पोहोचला आहे.

आपल्या आजूबाजूला बघितले तर हे स्पष्ट होते की एक-एक व्यवस्था कोलमडून पडत आहे. प्रत्येक पक्षाचे. खात्याचे, संस्थेचे प्रकरणे बाहेर पडत आहेत. सरकारने लादलेल्या बंधनांमुळे कर्जबाजारी होऊन शेतकरी आत्महत्या करतो. त्याच्या कुटुंबीयांना मदत देण्याऐवजी ही भ्रष्ट व्यवस्था त्या रकमेचा अपहार करते. यापेक्षा मोठे अधःपतन दुसरे कोणते?

सत्ता उपभोगत असणाऱ्या कोणत्याच पक्षाला देशात-राज्यात राज्य करण्याचा नैतिक अधिकार उरलेला नाही. मतपेटीतून जर जनतेने या भ्रष्ट सरकारला हे सांगितले नाही तर देशाचा विनाश अटळ आहे.

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानल पेठ, परभणी-४३१४०१.
मो. ९४२२६४६२८३
umrikar@gmail.com

■■

# जैतापूर प्रकल्प : एक विचारमंथन

अणुऊर्जा क्षेत्रात भारत देश सर्वतोपरी सक्षम असूनही आजपर्यंत भारतीय ऊर्जाक्षेत्रात अणुऊर्जेचे योगदान फक्त जेमतेम ३ % एवढे नगण्य आहे. ऊर्जेची कमतरता भारतास भेडसावत आहे. याचा विचार करून सरकारने अणुऊर्जेवर प्रचंड भर देण्याचे ठरवले आहे.

मात्र आपल्या देशात अणुइंधनाचे साठे अपुरे असल्याचे कारण सरकार देत आहे. तसेच भारत हा अण्वस्त्र प्रसारबंदी कराराचा ( NPT - Nuclear Prolification Treaty) सदस्य नसल्यामुळे जागतिक अणुइंधन पुरवठादार देश आपल्या अणुभट्टयांसाठी अणुइंधन देत नाहीत. या कारणामुळे आजमितीस भारतात फक्त ४६५० MW इतकीच अणुऊर्जा निर्मिती होते. ती पण पूर्ण क्षमतेने नाही कारण सर्व अणुभट्ट्या या १०० % क्षमतेने चालतील एवढा इंधन पुरवठाच होत नाही.

भारताकडे आपल्या स्वतःच्या तंत्रज्ञानाने विकिसित केलेल्या अणुभट्ट्या आहेतच. तरीही भारत सरकारने फ्रान्सच्या सरकारी मालकीच्या सार्वजनिक क्षेत्रातील 'अरिवा' (AREVA) या कंपनी बरोबर अणुभट्टयांचे तंत्रज्ञान व अणुइंधन पुरवठयाचा करार केला आहे. याकरारानुसार अरिवाने विकसित केलेल्या 'अद्ययावत' Evolutionary Pressurised Reactor किंवा European Pressurised Reactor (EPR) या तंत्रज्ञानाच्या प्रत्येकी १६५० MW क्षमतेच्या अशा ६ अणुभट्ट्या म्हणजेच ९९०० MW क्षमतेचा अणुऊर्जा प्रकल्प महाराष्ट्राच्या सहयाद्री पर्वतेतील नयनरम्य पश्चिम घाटावरील रत्नागिरी जिल्हयातील जैतापूर या ठिकाणी उभारला जाणार आहे. यासाठी एकूण ९६८ हेक्टर जागेत हा प्रकल्प माडबन, निवळी, मिठगावणे, वटिलवादा व कारेल या ५ गावात बांधला जाणार आहे.

ग्रामस्थांचा याल तीव्र विरोध आहे. सरकारचा या कामी तीव्र रेटा आहे. ग्रमस्थांच्या विरोधास न जुमानता अथवा त्यांच्या शंकांचे निरसन न करता सरकारने पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामस्थांनी आंदोलन तीव्र केलेले आहे.

आपल्यासारखा सामान्य माणूस या सर्व गोष्टींमुळे भ्रमिष्ट झाला आहे. सरकारी निवेदने व वृत्तपत्रांतून मिळत असलेल्या महितीत एकवाक्यता नाही. मिळत असलेली माहिती पूर्ण नाही. घाईघाईत मोठे निर्णय घेतले जात आहे. एकंदरीत काहीतरी पाणी मुरते आहे. नक्की काय चालले आहे ते कळत नाही. त्यामुळेच त्या सर्व गोष्टी सर्वकषपणे जनसामान्यापर्यंत विश्लेषणासहित प्रसारित करण्यासाठी हा एक प्रयत्न मी केलेला आहे. मी स्वतः अणुऊर्जे च्या विरोधात अजिबात नाही; पण जनतेला अजिबात विश्वासात न घेता दडपशाहीने सरकार ज्या पदधतीने अणुप्रकल्प धडाक्याने बांधण्याचा विचार करीत आहे ते बघितले तर आज छोटे असणारे विषय हे भविष्यात महाभयंकर होणार आहे हे मला दिसत आहे. म्हणून जैतापूरचा संदर्भ घेऊन मी यातील प्रत्येक बार्बीचा पाठपुरावा करून माझ्यापरिने जेवढे शक्य आहे तेथपर्यंत सत्य शोधण्याचा प्रयत्न केला आहे. वाचकांनी पण येथेच न थांबता आपापल्या परिने हा विषय पुढे नेऊन अजून सत्य शोधावे. आता हा सर्व विषय आपण मुळातूनच नीट समजावून घेऊ.



विश्वास प्र. पिटके

अणुऊर्जा प्रकल्प - जागतिक पटलावरील घडामोडी

१९ जानेवारी २०११ या दिवसापर्यंत जर आकडेवारी गोळा केली तर असे समजते की जगातील एकूण ३० देशात वेगवेगळया क्षमतेचे ४४२ अणुऊर्जा प्रकल्प सुरू आहेत. त्या सर्वांची मिळून एकूण क्षमता ३,७४,९५८ MW आहे. या शिवाय १६ देशात मिळून एकूण ६५ नवे अणुऊर्जा प्रकल्प बांधले जात आहेत व त्यांची एकूण क्षमता ६२८६२ MW इतकी आहे. तक्ता क्र. १ मध्ये याची माहिती दिलेली आहे. एकूण उभारलेल्या ४४२ पैकी ३६४ अणुभट्टयांचे आयुष्य हे २० वर्षे ते ४४ वषे इतके झालेले आहे. म्हणजेच सरासरी या ३६४ अणुभट्ट्या ३० वर्षे तरी वापरात आहेत. फ्रान्समध्ये एकूण विद्युत ऊर्जेपैकी ८० % विद्युत ऊर्जा फक्त अणुप्रकल्पाद्धारेच निर्माण केली जाते व तीही आजमितीस एकही म्हणावा तसा अपघात न होता. त्यामुळेच फ्रान्स सरकार या बळावर आपल्याकडील अणुतंत्रज्ञान इतर देशास विकू इच्छिते. असे असतानादेखील युरोप व अमेरिकेमध्ये अणुप्रकल्पांना जनतेचा तीव्र विरोध आहे. तक्ता क्र. १ जर नीट समजावून घेतला तर हे लक्षात येते की भारतासारखे विकसनशील देश व चीन, पाकिस्तानसारखे युध्दखोर देश व काही छोटे देशच फक्त अणुभट्ट्यांसाठी पुढे येत आहेत.

आजमितीस अमेरिकेत फक्त १ अणुभट्टीचे काम चालू आहे व ते पण ११६५ MW क्षमतेचेच. रशियात ११ अणुभट्ट्या एकूण ९१५३ MW क्षमतेच्या उभारल्या जात आहेत. युरोपमध्ये नगण्य काम चालू आहे.

अमेरिकेत जनता अणुऊर्जेच्या पूर्ण विरोधात आहे. अमेरिकेत १९७७ नंतर अणुप्रकल्पाचे बांधकाम संपूर्णतः थांबवण्यात आलेले आहे. १९७९ साली अमेरिकेतील पेनसिल्व्हानिया राज्यातील थ्री माईल आयलँड येथील अणुभट्टीत झालेल्या

अपघातामुळे अमेरिकन जनतेचे डोळे उघडले. अणुइंधनाच्या सळया वितळून झालेला हा अपघातात अमेरिकेने संपूर्णतः दाबून टाकला पण जनतेला मात्र सर्व काही कळले व म्हणूनच अमेरिकेत आज अणुऊर्जे चा वाटा फक्त २० % आहे हे नवल नाही. २६ एप्रिल १९८६ च्या चेर्नोबिल अपघातामुळे रशियात १,००,००० चौरस कि.मी. चा भाग हा पुढील २०,००० वर्षांसाठी मनुष्य व वन्य जीवनास कायमचा निकामी झालेला आहे. हा प्रकल्प ९०० MW क्षमतेचा होता. रशियातील सेमेई या अणुचाचण्याच्या ठिकाणचे लोकजीवन तर किरणोत्सारामुळे अत्यंत हिडीस व कुरूप झाले आहे.

| Country | Nuclear Plants In operation as on 19 Jan 11 | | Under construction | |
|---|---|---|---|---|
| | Number | Electr. Net output MW | Number | Electr. Net output MW |
| Argentia | 2 | 935 | 1 | 692 |
| Armenia | 1 | 375 | - | - |
| Belgium | 7 | 5,926 | - | - |
| Brazil | 2 | 1,884 | 1 | 1,245 |
| Bulgaria | 2 | 1,906 | 2 | 1,906 |
| Canada | 18 | 12,569 | - | - |
| China | | | | |
| • Mainland | 13 | 10,048 | 27 | 27,230 |
| • Taiwan | 6 | 4,980 | 2 | 2,600 |
| Czech Republic | 6 | 3,722 | - | - |
| Finland | 4 | 2,716 | 1 | 1,600 |
| France | 58 | 63,130 | 1 | 1,600 |
| Germany | 17 | 20,490 | - | - |
| Hungary | 4 | 1,889 | - | - |
| India | 20 | 4,391 | 5 | 3,564 |
| Iran | - | - | 1 | 915 |
| Japan | 54 | 46,823 | 2 | 2,650 |
| Korea, Republic | 21 | 18,665 | 5 | 5,560 |
| Mexico | 2 | 1,300 | - | - |
| Netherland | 1 | 487 | - | - |
| Pakistan | 2 | 425 | 1 | 300 |
| Romania | 2 | 1,300 | - | - |
| Russian Federation | 32 | 22,693 | 11 | 9153 |
| Slovakian republic | 4 | 1,792 | 2 | 782 |
| Slovakian | 1 | 666 | - | - |
| South Africa | 2 | 1,800 | - | - |
| Spain | 8 | 7,514 | - | - |
| Sweden | 10 | 9,303 | - | - |
| Switzerland | 5 | 3,238 | - | - |
| Taiwan | 6 | 4,980 | 2 | 2,600 |
| Ukraine | 15 | 13,107 | 2 | 1,900 |
| United Kingdom | 19 | 10,137 | - | - |
| USA | 104 | 100,747 | 1 | 1,165 |
| Total | 442 | 374,958 | 65 | 62,862 |

जर्मनीमध्ये तर अणुभट्ट्या एक एक करून ठराविक कालावधीत बंद करण्याचे काम चालू आहे. कोणत्याही कारणाखाली जर्मन जनता त्यांच्या देशातील अणुभट्ट्यांना वाढीव मुदत देऊ इच्छित नाही व सरकारने त्यामुळेच पवनऊर्जा, बायोगॅस, सौर ऊर्जेवर भर दिलेला आहे. खुद्द युरोपमध्येसुध्दा शेवटचा अणुप्रकल्प १९७८ सालीच बांधला गेला व त्यानंतर काम बंद आहे. युरेनियमने समृध्द अशा ऑस्ट्रेलियाने तर आजपर्यंत एकही अणुप्रकल्प बांधलेला नाही. आज तेथे अणुऊर्जे चा वाटा शून्य आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे हे सर्व देश अद्ययावत तंत्रज्ञानाने प्रगत असे संपूर्णपणे विकसित देश आहेत. त्यामुळेच विकासासाठी अणुऊर्जाही अनिवार्य आहे असा समज संपूर्ण खोटा आहे.

या सर्व ठिकाणी अणुऊर्जेला विरोध आहे त्याचे कारण म्हणजे केवळ इतिहासात झालेले अपघात नसून व्यवस्थित चालणाऱ्या अणुभट्ट्या व इतर आण्विक संयत्रातून होणारा किरणोत्सार हे आहे. युरेनियमच्या खाणी, समृध्दीकरण प्रकल्प, अणुभट्टी व आण्विक कचरा यापासून जवळपास ३० ते ३५ कि.मी. च्या त्रिज्येत कायमचा किरणात्सार चालू असतो व तो मनुष्य व वन्यजीवनास घातकच असतो. आण्विक कचऱ्यापासून बनवलेल्या घातक बॉंबचा वापर अमेरिकेने इराकी जनतेवर केला त्याचे दृश्य परिणाम तेथे दिसतच आहेत. अणुभट्ट्यातून आलेला आण्विक कचरा तर नष्ट करण्याचे तंत्रज्ञान मनुष्यास अजूनही अवगत नाही व असा कचरा जेथे दफन केला जातो वा सांभाळून ठेवला जातो. त्याच्या भोवतालची जागा पुढील कमीतकमी १००० वर्षे वस्तीस अयोग्य असते.

भारतात ओरिसातील जादुगडा येथील युरेनियम खाणीच्या भोवताली याचे दुष्परिणाम दिसतात. राजस्थानातील रावतभाटा प्रकल्पानजीकही परिस्थिती वाईट आहे.

वरील सर्व गोष्टींमुळे जगभरात अणुऊर्जा मागे पडलेली आहे. नैसर्गिक वायु व नुकताच सापडलेल्या शेल गॅसमुळे ऊर्जानिर्मितीचे साधे, सोपे, स्वच्छ व स्वस्त इंधन जगभरात विशेषतः अमेरिका व युरोपमध्ये उपलब्ध होत आहे. पवनऊर्जा, बायोगॅस, बायोमास, सौरऊर्जा, जलऊर्जा या सारखे स्वच्छ व प्रदूषणरहित ऊर्जानिर्मितीचे प्रस्थ वाढत चालले आहे. त्यामुळे विकसित देशात अणुऊर्जा प्रकल्प बांधणे नाममात्रच राहिले आहे.

साहजिकच असे सर्व देश इतरत्र अणुभट्ट्या बांधण्यास उत्सुक आहेत व ज्या देशात दडपशाही आहे व जनमतास किंमत नाही असे देश हे त्यांचे ग्राहक आहेत. आज युरोपातील व अमेरिकेतील अणुतंत्रज्ञान उदयोग हा खासगी क्षेत्रात फार मोठया प्रमाणात एकवटलेला आहे व हे क्षेत्र धंदा नसल्यामुळे अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. म्हणूनच आपल्या आपल्या सरकारला भरीस घालून भारतासारख्या देशात अणुभट्ट्या उभारणीचे काम सुरू आहे. युरोपातील कंपन्या आशिया, आफ्रिका, मध्य पूर्व व दक्षिण अमेरिकेतील देशांना अणुतंत्रज्ञान विकण्यासाठी वाटेल ते प्रयत्न करीत आहे.

सध्या अणुऊर्जा ही 'पर्यावरणपूर्वक' ऊर्जा व 'स्वच्छ' ऊर्जा आहे असा प्रचार केला जातो. याचे कारण म्हणजे यामधून CO२ निर्माण होत नाही. ही शुध्द फसवेगिरी आहे. कारण आज प्रदूषण हे CO२ च्या संदर्भात मोजले जाते व संपूर्ण 'ग्लोबल वॉर्मिंग' हे 'हरितवायू' (Green House Gasses) च्या निर्मितीमुळे होते हे मानले जाते. असा कोणताही हरितवायू अणुप्रकल्पातून निर्माण होत नाही. या कारणास्तव अणुऊर्जेचे पुरस्कर्ते या ऊर्जेस प्रदूषणरहित व पर्यावरणपूरक मानतात; पण सर्वांत महत्त्वाचा मुद्दा हा कोणाच्याच लक्षात येत नाही व तो म्हणजे 'किरणोत्सार.' आज अणुऊर्जेने निर्माण झालेला किरणोत्सार हा कोणत्याही हरितवायूपेक्षा भयंकर आहे. त्यामुळे फक्त नष्टचक्रच उत्पन्न होते. निदान हरितवायू नष्ट किंवा कमी तरी करता येतात; पण किरणोत्सार नष्ट कसा करणार ? साहजिकच जर जगभर अणुऊर्जा प्रकल्प सुरू झाले तर कदाचित सर्व हरित वायू नष्ट होऊन आजच्या प्रदूषणाच्या व्याख्येनुसार प्रदूषण नष्ट होईल पण 'किरणोत्सार' हे कधीही नष्ट न होणारे भूत कायमचे बोकांडी बसेल.

अणुतंत्रज्ञान विकणाऱ्या कंपन्यांनी नवी खेळी केलेली आहे. त्यांच्या स्वतःच्या देशात तसेच अमेरिकेत ज्या तंत्रज्ञानास बंदी घातली आहे असे अणुतंत्रज्ञान तिसऱ्या जगातील देशात विकण्यास सुरुवात केली आहे. इतकेच नव्हे तर आहे त्याच तंत्रज्ञानात थोडीफार भर घालून आपण 4th Generation तंत्रज्ञान विकसित केल्याचा दावा केला आहे. प्रत्यक्षात असे हे नवेच निर्माण केलेले ४जी तंत्रज्ञान अजून कोठेही निर्धोक असे सिध्द झालेले नाही. या तंत्रज्ञानावर आधारित अणुभट्ट्या अजूनही अर्धवट अवस्थेत आहेत पण त्याआधीच अशा कंपन्यांनी आपापल्या सरकारच्या मागे लागून इतर देशात असे अर्धवट व प्रायोगिक अवस्थेतील ४जी अणुभट्ट्यांचे करार करण्याचे काम धडाक्यात चालू केले आहे.

फ्रान्सच्या अरिवा कंपनीबरोबर एकूण ९९०० MW क्षमतेच्या EPR तंत्रज्ञानावर आधारित भारताचा अणुप्रकल्पांचा करार हे याचेच फलित आहे.

EPR तंत्रज्ञान म्हणजे नक्की काय ?

सध्या अस्तित्वात असणारे अणुतंत्रज्ञान हे खालीलप्रमाणे

१) Pressurized Water Reactor (PWR)

२) Boiling Water Reactor (BWR)

३) Pressurized Heavy Water Reactor (PHWR)

४) Light Water Reactor (LWR)

५) Fast Breeder Reactor (FBR)

वरील तंत्रज्ञान हे २nd Generation किंवा ३rd Generation प्रकारातले मानले जाते.

फ्रान्सच्या अरिवा कंपनीने जर्मनीच्या सिमेन्स बरोबर हातमिळवणी करून वेस्टिंग हाऊस या कंपनीचे तंत्रज्ञान काही फेरफार करून EPR या नावाने बाजारात आणले आहे. हा मुद्दा फार महत्त्वाचा आहे.१० ते १२ मार्च २०११ला झालेल्या जपानमधील भूकंप व त्यानंतर आलेल्या त्सुनामीमुळे तेथील अणुभट्ट्यांचे किती नुकसान झालेले आहे हे आपण वर्तमानपत्रातून वाचतच आहोत. रशियाने तर जपानी अणुभट्ट्या या सदोष आहेत असे जाहीर केले आहे. वाचकांच्या निदर्शनास मी हे आणून देऊ इच्छितो की, अरिवाचे EPR तंत्रज्ञान हे ज्या मूळ वेस्टिंग हाऊस कंपनीचे आहे तीच जपानच्या तोशिबा कंपनीच्या मालकीची आहे. EPR तंत्रज्ञान हे 3G+ किंवा 4G आहे असे अरिवाचे म्हणणे आहे. प्रत्यक्षात हे तंत्रज्ञान अजूनही अविकसित आहे. म्हणूनच त्यात Evolutionary हा शब्द आहे.

या तंत्रज्ञानावर आधारित पहिली अणुभट्टी फिनलँडमध्ये ओल्कील्युटो (Olkiluto) येथे काही वर्षापूर्वी बांधण्यास सुरुवात झाली. त्याच काळात फ्रान्समध्ये फ्लॅमनविल (Flamanville) येथे व इंग्लंडमध्येही अरिवातर्फे EPR तंत्रज्ञानावर आधारित अणुभट्ट्या उभारणी काम सुरू झाले. यामधून खालील गोष्टी जगासमोर आल्या.

१. फिनलँडमध्ये सिमेन्स बरोबर काम सुरू करण्यापूर्वी अणुभट्ट्यांचे कोणतेही अभियांत्रिकी आरेखन व प्रकल्पाचे आयोजन (Project Design and project planning) न करताच प्रकल्पाचे काम अरिवाने हाती घेतले होते. त्यामुळे 'करून बघा व नाही जमले तर वेगळा प्रयत्न करा' अशा प्रायोगिक तत्त्वावर काम चालले होते. त्यामुळे शेवटी कंटाळून सिमेन्सने आपले अंग या प्रकल्पातून काढून घेतले. आता तेथे अरिवा कंपनीबरोबर फिनलँडच्या सरकारची कायदेशीर लढाई चालू आहे. प्रकल्प रेंगाळला आहे. त्यामुळे भांडवली खर्च ५० टक्क्याने वाढला आहे.

२. अरिवाने अणुभट्ट्यांचे जे अभियांत्रिकी आरेखन (Engineering Design) केले आहे ते अत्यंत सदोष आहे. याचे कारण म्हणजे कागदावर केलेले आरेखन हे जर आजमितीस आपल्याला अवगत असणाऱ्या तंत्रज्ञान व साधनांच्या मर्यादेच्या कक्षेत येत नसेल तर काम करणारा माणूस काहीही करून दाखवू शकत नाही. क्षणभर असा विचार करा की आज एखाद्या कंपनीला मुंबईपासून पुण्यापर्यंत २५० कि.मी. लांबीची पाण्याची पाईप लाईन टाकण्याचे काम दिले व जर त्या कंपनीने २५० कि.मी. लांबीचा एकच पाईप बनवून द्या असा आग्रह धरला तर जगातली कोणती कंपनी असा पाईप बनवू शकेल? आजही सर्वत्र लांबलचक पाईप लाईन्स या छोट्या छोट्या पाईप्सच्या तुकड्यांना व्यवस्थित वेल्डींग करूनच टाकल्या जातात. मग असे अशक्य आरेखन केलेच कसे जाते? अरिवाने केलेला आराखडा हा प्रत्यक्षात उतरवणे इतके कठीण आहे, की इंग्लंडच्या HSE, फ्रान्सच्या ASN आणि फिनलँडच्या STUK या अणुसुरक्षा नियामक मंडळाने अरिवाच्या EPR अणुभट्ट्या संपूर्णपणे असुरक्षित म्हणून घोषित केल्या आहेत.

३. STUK ने तर एकूण ३००० त्रुटी या प्रकल्पात दाखवून त्या दुरुस्त करण्यास सांगितल्या आहेत. अरिवाला अपेक्षित असणारे पायाभरणीचे काम व क्लिष्ट वेल्डिंगचे काम हे मनुष्यास आज सहजगत्या अवगत असणाऱ्या साधनांनी होऊ शकत नाही. असे आरेखन केलेच कसे जाते?

४. वरील कारणांमुळेच अमेरिकेतसुध्दा EPR तंत्रज्ञानास मान्यता मिळालेली नाही. यामुळे अरिवाचे सर्व प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहे. त्यामुळे त्यांच्या प्रकल्पबांधणीचा खर्च पण प्रचंड वाढला आहे.

५. आज भारतीय बनावटीच्या PHWR तंत्रज्ञानावर आधारित अणुभट्टीच्या उभारणीचा खर्च ८ ते ९ कोटी रु. प्रती MW येतो. EPR अणुभट्टीचा खर्च २१ कोटी रु. प्रती MW असा आहे. प्रत्यक्षात यामध्येसुद्धा अजुन बऱ्याच गोष्टींचा हळूहळू समावेश होणार आहे. कारण अरिवालासुध्दा अजून सर्व तंत्रज्ञान आत्मसात झालेले नाही. या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे की संपूर्णपणे सुरक्षित व बांधता येईल असे EPR तंत्रज्ञान ज्यावेळी विकसित होईल त्यावेळेस याच अणुभट्टीची किंमत रू. ५६ कोटी प्रती MW एवढी होणार आहे. ६. भारतीय अणुभट्ट्या पैकी १७ अणुभट्ट्या २२० MW क्षमतेच्या आहेत व २ अणुभट्ट्या ५४० MW क्षमतेच्या आहेत. आता कोठे आपण ७०० MW क्षमता विकसित करण्याच्या प्रयत्नात आहोत. भारताचे सुदधा अणुप्रकल्प हे सुरक्षित नाहीत व तेथेही बरेच अपघात होतात. कर्नाटकातील कैगा अणुभट्टी तर चक्क कोसळून पडलेली होती. जनता जागरुक नसल्यामुळे भारतीय सरकार अशा बाबतीत कोणतीही माहिति जाहीर करत नाही. असे असताना १६५० MW क्षमतेची १, अशा ६ अणुभट्ट्या आपण कशा सांभाळणार आहोत?

७. पाश्चात्य देशात मुद्दामच मोठ्या क्षमतेच्या अणुभट्ट्या निर्माण करण्याची लाट आहे. याचे कारण म्हणजे २०० MW च्या ८ अणुभट्ट्या बांधण्याऐवजी १६५० MW क्षमतेची एकच अणुभट्टी बांधली तर उभारणीचा प्रती MW खर्च कमी होतो हे दाखवता येते. येथेच सगळा घोटाळा झाला आहे. कारण या प्रकारात ८ अणुभट्ट्यांचे अणुइंधन एकाच मोठ्या भट्टीत जाळले गेल्यामुळे प्रचंड प्रमाणात न्युट्रॉनची निर्मिती होते. त्यामानाने फार कमी जागेत प्रचंड न्युट्रॉन

निर्मिती झाल्यामुळे किरणोत्सार प्रचंड प्रमाणात एकवटला जातो (High Neutron Density). त्यामुळे अणुइंधनच्या ज्वलनाची कार्यक्षमता वाढते. त्यामुळे अणुकचरा निर्मिती ही सामान्य अणुभट्टीपेक्षा १५ टक्के वजनाने कमी होते. मात्र हा कचरा इतका जहाल व भयानक किरणोत्सारी असतो की भीक नको पण कुत्रा आवर अशी परिस्थिती निर्माण होते. सर्वसाधारण अणू कचऱ्यापेक्षा ७ पट जास्त किरणोत्सार यामध्ये असतो. अशा कचऱ्याचा धोका हा हजारो वर्षे राहणार आहे.

८. सर्वात कहर म्हणजे, कोणत्याही प्रकल्पात त्याची operating system ही प्रकल्पाचे नियमित काम करण्याची जबाबदारी पार पाडत असते. जर काही कारणामुळे operating system मध्ये गडबड झाली तर अपघात होतो. अपघात होऊ नये यासाठी Security system असते. operating system जर कार्य करेनाशी झाली तर तात्काळ Security system कार्यान्वित होते व अपघात न होण्याची काळजी घेतली जाते. या दोन्ही systems चा एकमेकांशी अजिबात संबंध असता कामा नये. अरिवा EPR तंत्रज्ञानात इंजिनियर्सना लाज वाटावी अशी एक गंभीर व अक्षम्य घोडचूक आहे. अरिवाने EPR तंत्रज्ञानात operating system व security system या एकमेकांना जोडलेल्या आहेत. त्यामुळे अणुभट्टीचे नियमित काम करणारी operating system जर खराब झाली तर त्याचबरोबर Security system सुध्दा बंद पडते. म्हणजे अपघात हा अटळ आहे. सामान्य माणसाच्या भाषेत सांगायचे झाले तर आपल्या घराचे कुलूप आपण दररोज स्वतःच्या किल्लीने उघडतो. ही किल्ली म्हणजे आपली दररोजची operating system. जर आपली ही किल्ली हरवली तर घोटाळा होऊ नये म्हणून एक स्वतंत्र किल्ली आपण शेजाऱ्याकडे ठेवतो. ही दुसरी किल्ली म्हणजे आपली Security system. जरी आपली नेहमीची किल्ली हरवली तरी आपण शेजाऱ्याकडे दिलेल्या किल्लीने घर उघडू शकतो. जर ही दुसरी किल्ली पण आपण आपल्या मूळ किल्लीच्या चेनलाच लावली तर काय होईल? पहिल्या किल्लीबरोबर दुसरी पण किल्ली हरवली जाईल. याच गंभीर कारणास्तव सर्व प्रगत देशात अरिवा EPR तंत्रज्ञान लोंबकळत पडले आहे.

९. पैसे वाचवण्यासाठी अरिवाने निकृष्ट दर्जाचा कच्चा माल वापरून निकृष्ट दर्जाचे कंत्राटदार नेमल्यामुळे त्याच्या फिनलँडमधील प्रकल्पात कित्येक त्रुटी आहेत.

१०. EPR तंत्रज्ञानाबद्दल खुद्द ग्रीनपीस या जागतिक दर्जाच्या पर्यावरणासाठी जागरूक असणाऱ्या संस्थेने अहवाल दिलेला आहे. त्यात स्पष्ट नमूद केले आहे की :

१) EPR अणुभट्टी ही जगातील सर्वात मोठी व प्लुटोनियम युरेनियम ऑक्साईड (MOX) सारखे जास्तीत जास्त किरणोत्सारी इंधन वापरणारी आहे. यातून अणुकचरा जरी नेहमीपेक्षा १५% कमी निघणार असेल तरी तो ७ पट जहाल असणार आहे.

२) फिनलँड व फ्रान्सच्या अरिवाच्या अणुप्रकल्पात खालील दोष आहेत.

(अ) अणुभट्टी थंड ठेवणारी यंत्रणा अत्यंत निकृष्ट दर्जाचे पाईप्स वापरून बनवलेली आहे. यातून गळती होऊ शकते.

(ब) वापरून झालेले इंधन ठेवण्याच्या टाक्या या बाहेरून बसलेल्या जोरदार धक्क्याने फुटू शकतात व गळती होऊ शकते.

(क) पायाभरणीच्या कामात वापरलेले सिमेंट व काँक्रिट निकृष्ट आहे व त्यांना तडे गेलेले आहेत. लोखंडाचे वेल्डिंगसुध्दा व्यवस्थित नाही.

(ड) अणुभट्टीचा गाभा व तिचे आवरण यात वापरलेला ८०% कच्चा माल निकृष्ट आहे.

(ई) उच्च दाब संयंत्र व वाफ निर्मिती केंद्रात वापरलेले ८०% पदार्थ हे दर्जेदार नाहीत.

(फ) अणुभट्टीचे आतील अस्तर तर सामान्य पध्दतीने वाटेल तेथे भोके पाडून हाताने वेल्ड केले आहेत. याकामी स्थानिक लोकांची, ज्यांना या कामाचा कसलाही अनुभव नाही, अशांची मदत घेतली आहे. यामुळे अणुइंधनाची गळती होऊ शकते.

अणुऊर्जा अपघात जोखीम विधेयकानुसार आज आपल्या देशात जर परदेशी कंपनीने प्रकल्प उभारला तर अशी परदेशी कंपनी कोणत्याही नुकसान भरपाईस जबाबदार नाही. आपण त्यांना भारतात अथवा इतरत्र कोर्टात खेचू शकत नाही. आता जनमताच्या रेट्याने त्यांच्यावर रु.१५०० कोटी नुकसान भरपाईचे बंधन घातले आहे; पण हे प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत नगण्य आहे. अणुभट्टीसाठी १० टक्केसुदधा खर्च करून सुरक्षा व्यवस्था वाढवण्यापेक्षा रु. १५०० कोटी नुकसान भरपाई देणे जास्त स्वस्त आहे. कारण एका अणुभट्टीचाच भांडवली खर्च कमीत कमी रु. ३४६५० कोटी आहे. अजून हे विधेयक मंजूर झालेले नाही आणि म्हणूनच फ्रान्स सरकार अडून बसलेले आहे. अमेरिकेत अशा कंपनीस US $ १००० कोटी पर्यंत नुकसान भरपाई द्यावी लागते व त्यापेक्षा जास्त नुकसान झाले तर भरपाई अमेरिकन सरकारतर्फे केली जाते. भारत सरकार हे करणार आहे काय? भोपाळ वायुग्रस्तांना किती नुकसान भरपाई मिळाली?

असे सर्व असतानाही याच तंत्रज्ञानाच्या प्रत्येकी १६५० MW क्षमतेच्या एकूण ६ अशा ९९०० MW क्षमतेच्या अणुभट्ट्या जैतापूरला येणार आहेत. तेही भारताच्या Nuclear power corporation of India Ltd. (NPCIL) कडे स्वदेशी अणुतंत्रज्ञाची पूर्ण क्षमता असताना. याचे कारण खालीलप्रमाणे :

भारत व अणुऊर्जा

सरकारच्या सांगण्यानुसार भारतात युरेनियमचा तुटवडा आहे. याचे कारण आपल्याकडे युरेनियमचे प्रमाण अत्यंत अल्प असणारे खनिज आहे. भारत हा अण्वस्त्रसज्ज देश असूनही अण्वस्त्रप्रसारबंदी कराराचा सदस्य नाही. आपली कोणतीही अणुभट्टी ही आंतरराष्ट्रीय समुदायाच्या नजरेखाली येत नाही. त्यामुळे जागतिक समुदायाकडुन आपल्याला अणुइंधन मिळत नाही. साहजिकच आपल्या आहे त्याच अणुभट्ट्या पूर्णक्षमतेने चालत नाहीत.

आजमितीस भारतात एकूण १७०४६९ MW एवढी विद्युत ऊर्जेची स्थापित क्षमता आहे. यातील ६४ टक्के औष्णिक विद्युत, २३ टक्के जलविद्युत, १० टक्के अपारंपरिक उर्जा व फक्त ३ टक्के अणुऊर्जा आहे. खरे तर अणुतंत्रज्ञान भारतात खूप आधी आले असताना; पण फार नंतर आलेल्या अपारंपरिक ऊर्जेने बाजी मारली आहे.

असे असताना देखील भारताने २०२० पर्यंत एकूण २०००० MW व २०३२ पर्यंत एकूण ६४००० MW इतके अणुप्रकल्पांचे उद्दीष्ट ठेवले आहे. इतरत्र अणुऊर्जा उद्योग डबघाईस आलेला आहे. भारतासारखी प्रचंड मोठी बाजारपेठ समोर आहे. त्यामुळे भारत जरी NPT चा सदस्य नसला तरीपण ती वस्तुस्थिती चक्क काणाडोळा करून अमेरिकेने केवळ अरपल्या अणुतंत्रज्ञान विकणाऱ्या कंपन्यांच्या

रेट्यमुळे खास भारतासाठी विशेष सवलतीचा 'हाईड ॲक्ट' मंजूर करून घेतला व आहे त्याच स्थितीत भारतास नुसतेच अणुतंत्रज्ञानच नव्हे तर अणुइंधनसुध्दा तहहयात पुरविणे कबूल केले. आता जर अमेरिकेने इतके पुढचे पाऊल टाकले तर त्यांची लाज राखण्यासाठी आपण पण काहितरी केले पाहिजे. या नादात विद्यमान सरकारने फ्रेचांबरोबर करार केला. हे खरे जैतापूर प्रकल्पाचे कारण आहे. भारत इतरत्र स्वतःच्या PHWR अणुभट्ट्याच उभारणार आहे. मात्र सध्यातरी जैतापूरला EPR अणुभट्ट्याच उभारल्या जाणार आहेत.

आता आपण खरोखरीच अशी परिस्थिती आहे का ते बघू. सर्वप्रथम अणुइंधनाचा तुटवडा हा मुद्दा अभ्यासला पाहिजे. भारतात खरोखरीच युरेनियमचा तुटवडा आहे का? युरेनियमचा भारतात अजिबात तुटवडा नाही. खरेतर जादूगोडा येथील खाणीतील खनिजामध्ये युरेनियमचे प्रमाण ०.०६७ ते ०.०७ टक्के इतकेच आहे. व्यावसायिकदृष्ट्या कमीत कमी ०.१ ते ०.२ टक्के इतके प्रमाण युरेनियमचे असावे लागते. पण दुर्दैवाने आपले खनिज निकृष्ट आहे. कॅनडातील खनिजामध्ये युरेनियमचे प्रमाण २० टक्के आहे. १९६८ साली Uranium Corporation of India (UCIL) च्या अंतर्गत जादूगोडा येते १००० टन खनिज दररोज प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्प बांधला. त्यातून दरवर्षी २०० टन युरेनियम आपण मिळवू लागलो. २००५ मध्ये आपण हीच क्षमता ३००० टन खनिजावर प्रक्रिया करून (०.६७ टक्के युरेनियम व ३०० दिवस प्रति वर्ष) ६०० टन युरेनियम दरवर्षी मिळवण्यापर्यंत आणलेली आहे. त्यानंतर सदा, राखा, मुसाबेनी व मेघालया येथे खनिज मिळाले. मेघालयातील खनिज तर युरेनियमने अत्यंत समृध्द आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की आज ४६५० MW इतक्या आपल्या सर्व अणुप्रकल्पासाठी ४७८ टन युरेनियम दरवर्षी वापरले जाते. अण्वस्त्रांसाठी दरवर्षी ३२ टन युरेनियम लागते. म्हणजेच भारताला दरवर्षी ५१० टन युरेनियम अण्वस्त्रसज्ज होण्यासाठी व विद्युतनिर्मितीसाठी लागते. आपण जरी २०,००० MW क्षमता २०२० पर्यंत निर्माण केली व अण्वस्त्रेही तयार केली तरी त्यासाठी आपल्याला दरवर्षी २१९३ टन युरेनियम लागणार आहे.

याउलट वरील सर्व खाणीतल्या तथाकथित निकृष्ट दर्जाच्या खनिजाच्या ज्ञात साठ्यापासूनसुध्दा आपल्याकडे एकूण ८०,००० ते १,१२,००० टन युरेनियम मिळवण्याची क्षमता आहे. याचाच अर्थ असा की भारत देश २०,००० MW क्षमतेच्या विद्युत प्रकल्पांना २१९३ टन दरवर्षी पुरविण्यासाठी कमीत कमी पुढील ४० ते ५० वर्षे स्वयंपूर्ण आहे. NPCIL च्या कार्यकारी संचालकांनी पण असे जाहीर केले आहे की १०००० MW क्षमतेपर्यंत आपल्याला अणुइंधनासाठी कोणावरही अवलंबून राहण्याची गरज नाही.

खुद्द सध्याचे विद्यमान मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण हे जेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याआधी दिल्लीत शास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख होते त्यावेळेस त्यांनी स्वतः राज्यसभेला दिलेल्या उत्तरात जाहीर केले होते, की भारतात सध्या १,४७,८९८ ते १,१५,००० टन युरेनियमचे ज्ञात साठे आहेत.

खरेतर भारतभर युरेनियमचे साठे शोधण्याचे काम युध्दपातळीवर हाती घेतले तर भारतातच आपल्याला कित्येक वर्ष पुरून उरेल इतके युरेनियम आहे व तेही निकृष्ट दर्जाचे खनिज असताना. मग तुटवडा कसला आहे?

वस्तुस्थिती अशी आहे की आंतरराष्ट्रीय अणुसमूहाच्या दबावामुळे भारत सरकार UCIL ला पंचवार्षिक योजनांतर्गत वित्त पुरवठा करीत नाही. त्यामुळे UCIL नव्या खाणी विकसित करू शकत नाही. नवे साठे शोधण्याचे काम हाती घेत नाही. खुद्द UCIL चे कर्मचारीही नव्या ठिकाणी काम करण्यास उत्सुक नाहीत, कारण खाणकाम हे किरणोत्सारी असल्यामुळे धोक्याचे आहे. बऱ्याच ठिकाणी नक्षलवाद्यांचे कारण सांगुन खाणकाम हाती घेतले जात नाही. मेघालयमध्ये भारतीय लोकांना परदेशी समजून दूर ठेवले जाते. याशिवाय आदिवासींना हाताशी धरून पाश्चिमात्य देशांकडून गुपचुप होणाऱ्या वित्तपुरवठयाचा वापर करून स्थानिक NGO आदिवासींना धोका व पर्यावरणाची हानी होत असल्याचा मुद्दा काढून खाणकामास विरोध करतात.

ज्या ठिकाणी दोन वेळचे जेवण व वीज, पाणी आणि साधे शिक्षण मिळण्याची भ्रांत आहे अशा दुर्गम प्रदेशात आकडेवारीसहित व्यवस्थित तयार केलेले रिपोर्ट घेऊन आदिवासी कसे येतात? त्यांना अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिया या देशातील संस्थांनीच मदत का केलेली असते? अमेरिकन संस्था या भारतातील युरेनियम खाणकामास विरोध करणाऱ्या लोकांसच का मदत करतात? या सर्वांची उत्तरे म्हणजे, या सर्व देशांना भारत युरेनियमच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला पाहिजे असे वाटत नाही. परिणामी भारताला परदेशी युरेनियमवर अवलंबून ठेवायचे व अणुतंत्रज्ञान घेतले तरच युरेनियम मिळेल अशी अट घालून अणूभट्ट्या पण विकायच्या असा हा डाव आहे. एकदा त्या अणुभट्ट्या भारताला विकल्या की त्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आंतरराष्ट्रीय अणु समुदायाच्या नजरेखाली येणारच. अशी ही खेळी आहे. भारताने ही खेळी वेळीच मोडून काढली पाहिजे.

महत्त्वाचे म्हणजे वरील सर्व कारणांमुळे भारतीय खाणीतून निघणारे युरेनियम हे आंतरराष्ट्रीय बाजारातून मिळणाऱ्या युरेनियमपेक्षा ५ पट महाग आहे. पण असे जरी असले तरी त्यामुळे आपल्या विद्युत निर्मितीचा खर्च हा फक्त ७ टक्के च वाढतो. याचे कारण म्हणजे खरा खर्च हा अणुभट्टीच्या उभारणीचा भांडवली खर्च असतो. युरेनियम या अणुइंधनाच्या किंमतीवर विद्युत निर्मितीचा खर्च हा त्यामानाने अत्यल्प अवलंबून असतो. असे असून पण 'केवळ कमी किमतीत युरेनियम स्वस्त आयात करता येते' असे वरवरचे कारण दाखवून आपले सरकार स्वतःची युरेनियम निर्मिती थांबवत आहे. आपल्याकडे दिसत असणारा युरेनियमचा तुटवडा का केवळ तात्पुरता आहे व फसवा आहे. तसेच तो मुद्दाम निर्माण केला आहे. युरेनियम अजिबातच नसण्यापेक्षा ५ पट किमतीचे का होईना पण स्वतःचे युरेनियम वापरणे हेच शहाणपण आहे. याशिवाय एकूण जागतिक साठयाच्या २५ टक्के थोरियम हे एकटया भारतातच आहे. याचा आपण अजून अणूइंधन म्हणून विचारच केलेला नाही.

*(मासिक महाराष्ट्राचे उद्योगविश्व, मार्च २०११ मधून साभार)*

**क्रमशः**

**विश्वास प्र. पिटके**
मो. ९०११०९२७८१, ९८५०९९५९६८
vishwas.pitke@gmail.com

■■

# हमाम मे सब नंगे...

दत्ता जोशी
media.care.abd@gmail.com




इजिप्तमध्ये आंदोलनादरम्य

विधिमंडळ आणि संसद सध्या कामकाजापेक्षा गोंधळासाठी अधिक चर्चेत आहेत. विशेष म्हणजे या गोंधळाच्या कारणाचा देशाच्या किंवा राज्याच्या भल्याशी दूरदूरपर्यंत संबंध नाही. परस्पर कुरघोडीसाठी देशाला वेठीला धरण्याचे हे प्रयत्न सुरू असताना सामान्य नागरिक मात्र हळूहळू या विषयाबद्दल उदासीन होत चालल्याचे चित्र आहे. हा सारा घटनाक्रम देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने धक्कादायक आहे.

३१ मार्च रोजी महाराष्ट्र विधानसभेत भाजपाच्या एकनाथ खडसे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसवर जोरदार हल्ला चढविला. 'टू जी स्कॅम' प्रकरणी शाहीद बलवा यांच्या विमानातून त्यांच्या सोबत शरद पवार यांनी प्रवास केल्याचा तपशील त्यांनी सभागृहासमोर मांडला. खरे तर शरद पवार यांच्यावर असे आरोप काही नवीन नाहीत. याआधी मुंबई बॉम्बस्फोट खटल्यातील आरोपींसमवेत त्यांनी विमान प्रवास केल्याचा पुराव्यांनिशी केलेल्या आरोपाचे पुढे काय झाले? तर मुद्दा हा, की शरद पवार, प्रफुल्ल पटेल यांच्यावर तारखांच्या तपशीलानिशी नाथाभाऊंनी हल्ला चढविला आणि राष्ट्रवादीचे आक्रमक आमदार जितेंद्र आव्हाड यांनी नितीन गडकरी व उद्धव ठाकरे यांनीही बलवा यांची विमाने वापरल्याचा जोरदार प्रत्यारोप केला. ही कुरघोडी सुरू असतानाच भाजपाने आपल्या नेत्यांच्या या विमानप्रवासाची बाब मान्य केली पण त्या विमानांचे भाडे पक्षाने भरले होते अशी मखलाशी केली. उद्धव ठाकरे यांना या विषयाला काहीच किंमत द्यावीशी वाटली नाही. शिवसेनेने या प्रकरणी पूर्णतः मौन पत्करले आहे.




टू जी स्कॅम प्रकरणातच मुंबई प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष कृपाशंकर सिंग यांच्या मुलावरही बलवा यांच्यातर्फे काही कोटींच्या निधीची कृपा झाल्याचा आरोप झाला. केंद्रातील आणि राज्यांतील अनेक नेत्यांची नावे यामध्ये येत आहेत. एवढेच नव्हे तर यामध्ये सर्वपक्षीय समानता दिसते आहे. दिवंगत प्रमोद महाजनांपासून कृपाशंकरसिंगांपर्यंतची नावे पाहता एक बाब नक्की दिसते आहे - हमाम मे सब नंगे हैं। आणि खरे तर नागरिकांनाही आता अशा प्रकरणांचे काहीच वाटेनासे झाले आहे. एकेकाळी साठ कोटींच्या लाचेवरून केंद्र सरकार उलथविणारी आणि पंतप्रधानांना १० कोटींची लाच दिल्याच्या आरोपावरून त्यांची खुर्ची डळमळीत करणारी स्थिती आता लक्षावधींच्या घोटाळ्यांनतरही स्थितप्रज्ञावस्थेत राहते आहे ही बाब नागरिकांची राजकारणाविषयीची उदासीनता दाखविते आहे की हा सुप्त ज्वालामुखी खदखदतो हे अजूनही लक्षात येत नाही.

या सर्व बाबींतून एक गोष्ट निश्चितपणे समोर येत आहे, की राजकारणी ही एक स्वतंत्र जमात असून त्यांचा धर्म पैसा आहे. त्यांना देशाशी काहीही देणेघेणे नाही. महापालिकेपासून संसदेपर्यंत प्रत्येक कोपरा या देशातील राजकारण्यांनी विक्रीला काढलेला आहे. ही स्थिती खूपच निराशाजनक आहे. केंद्रीय माहिती आयुक्तांच्या नियुक्तीवरून गदारोळ उठल्यानंतर प्रत्यक्ष पंतप्रधान लाजीरवाणी सारवासारव करतात हे चित्र तर लोकशाहीसाठी खूपच लांच्छनास्पद आहे. एका साध्या रेल्वे अपघातानंतर आपला रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा देणाऱ्या शास्त्रीजींची गोष्ट आजच्या काळात तर हे राजकारणी कदाचित थट्टेवारीच नेतील. ज्यांचे हात आकंठ भ्रष्टाचारात बुडालेले आहेत ते देशाला भ्रष्टाचार मुक्त करण्याचे आवाहन करतात या सारखा दांभिकपणा तर पृथ्वीतलावर कोठेच नसेल !

हे सारे निराशाजनक चित्र आज सर्वांच्या डोळ्यासमोर स्पष्टपणे येते आहे त्याचे कारण आज जागृत झालेली माध्यमांची शक्ती. इथे मला पारंपरिक मुद्रित किंवा दृक्श्राव्य माध्यमे अपेक्षित नाहीत. ती तर कधीच राजकारणाची आणि पैशाची गुलाम झाली आहेत. चॅनेलच्या बाजारात पेव फुटल्याप्रमाणे वाढलेल्या न्यूज चॅनेल्सचा अभिनिवेश पाहता तेथे



ान झळकलेले बॅनर

**मीडियाची ताकद अपार आहे असे उच्चरवाने सांगितले जात असतानाच मीडियाही विकला जात असल्याच्या चर्चा जोरजोराने सुरू झाल्या आणि काही उदाहरणांवरून त्यावर विश्वासही बसू लागला. लोकशाहीचे तीनही स्तंभ या न त्या कारणाने आधीच बदनाम झालेले असताना या चौथ्या स्तंभावरील अविश्वास चिंता निर्माण करणारा आहे. या पार्श्वभूमीवर 'मुक्त माध्यमे' हा नवा पर्याय 'पाचवा स्तंभ' ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. 'इंटरनेट' हा तो पाचवा स्तंभ. 'विकिलिक्स'च्या माध्यमातून हादरलेले अमेरिकी आणि भारतीय सरकार हे या स्तंभाच्या प्रभावाचे एक उदाहरण तर इजिप्तमधील महाक्रांती आणि सत्ताबदल हे दुसरे उदाहरण. चारही स्तंभ 'हमाम मे नंगे' ठरल्यामुळे थेट जनतेच्याच हाती सूत्रे असलेले हे माध्यम भविष्यात अधिक प्रभावी ठरण्याची प्रसादचिन्हे दिसत आहेत...**

काही राष्ट्रहितकारक घडेल अशी शक्यता वाटू लागली होती. पण टू जी स्कॅम प्रकरणात बरखा दत्ता यांचे नाव आले तेव्हाच अशा अमंगल युतीची पावती मिळाली. अशाच बरखा दत्त विविध रुपांमध्ये प्रत्येक चॅनेलवर व माध्यमांमध्ये कार्यरत आहेत. इथे मला निरा राडिया यांना दोष द्यायचा नाही. मी टाटांनाही दोष देणार नाही. कारण राडिया यांच्यासारख्या मध्यस्थांच्याच मदतीने उद्योगांचे डोलारे उभे राहत असतात. पाश्चात्य देशांमध्ये ही कामे अधिकृतरित्या करणाऱ्या एजन्सीज असतात. भारताची स्थिती सध्या 'सनातनी सासरा मेल्यानंतर अचानक साडीचोळी सोडून स्कर्ट वापरणाऱ्या अर्ध-आधुनिक तरुणासारखी' झाली आहे. दंडावर पूर्वीचे ब्लाऊजचे गोरे व्रण स्पष्ट दिसतात पण कोपरापासून खालचा हात काळा असतो ! स्कर्ट परिधान केलेला असतो पण निऱ्या सावरण्याची धडपड सुरूच असते. उंच टाचेच्या चपला घालण्याची हौस असते पण कधीही कोसळून पडण्याची भीतीही. अशा सुनेला जसे नव्या रुपात रुळण्यासाठी काही काळ जाऊ द्यावा लागतो, तसाच राडिया यांच्यासारख्या मध्यस्थांच्या हस्तक्षेपाची सवय होण्यासाठीही लागतो. फक्त या निर्णयप्रक्रियेमध्ये देशाचे नुकसान होणार नाही, याची काळजी घ्यावी लागते.

अशा स्थितीत जेव्हा बरखा दत्त यांचे नाव समोर येते तेव्हा त्यांचा चॅनेलही काही काळ त्यांना दडवून ठेवतो. वातावरण थोडे शांत होताच त्या पुन्हा टीव्हीवर पूर्वीच्याच धिटाईने झळकू लागतात. ही धिटाई कुठून येते? सत्तेचा हा माज त्यांच्यापर्यंत कसा पाझरतो ? हे प्रश्न वर वर पाहता अनुत्तरीत आहेत. पण शांत चित्ताने विचार केला, तर मागील सहा महिन्यांत मीडियाने उघडकीस आणलेल्या सर्वच प्रकरणांत हळूहळू ती सर्वच प्रकरणे कशी निष्प्रभ होतील अशा हालचाली सुरू आहेत. राजांच्या अत्यंत विश्वासू सहाय्यकाचा बळी गेला. ती आत्महत्या की खून या प्रश्नाचे उत्तर कधीच मिळणार नाही. कलमाडींसारख्या नेत्यानेही आपल्या जिवाला धोका असल्याचे विधान केले होते. खुद्द राजा किंवा बलवा यांचेही भविष्य आजघडीला सांगणे अवघड आहे. आपली लोकशाही ही अशी विकृत होत चालली आहे. या साऱ्या हालचाली सत्तेचा आशीर्वाद असल्याशिवाय शक्य आहेत का? साधी नगरसेवकाची चौकशी करायची तर पोलिस खाते टरकते. सीबीआय झाले म्हणून काय झाले? ती ही माणसेच आहेत ना? नाही तर अगदी मुहुर्त ठरवून काही प्रकरणे सीबीआयकडून समोर कशी आणली जातात? तसेच काही प्रकरणी ते मूग गिळून गप्प कसे बसतात? साराच मामला अविश्वासाचा आहे.

हा परस्पर मिटवामिटवीचा मामला वृत्तपत्रांवर न्यूजप्रिंटच्या कोट्याचे नियंत्रण असेपर्यंत आणि भारतात दूरदर्शनसारखे एकच इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यम असेपर्यंत सुरळीतपणे चालत असे. माध्यमांवरील नियंत्रणे उठली, मुद्रित माध्यमांची संख्या आणि त्यातील ताजेपणा वाढला त्याच बरोबर न्यूज चॅनेलचीही संख्या वाढू लागली तसा सत्तेच्या गुप्ततेचा किल्ला ढासळण्यास सुरवात झाली. पण भ्रष्टाचाराच्या कीडीने या माध्यमांनाही पोखरले. त्याचे उघडे नागडे दर्शन जगासमोर दररोज होते आहे. उदाहरणच द्यायचे तर बलवा - पवार विषयीची बातमी टाईम्स ऑफ इंडियाने पहिल्या पानावर छापली आहे. लोकमतने ही बातमी छापताना पवारांबरोबरच नितीन गडकरी - उद्धव ठाकरे यांचा उल्लेख ठळकपणे येईल अशी काळजी घेतली आहे. सकाळ आणि सामना या वृत्तपत्रांनी मात्र या बातमीलाच स्थान दिले नाही. टीव्हीवर मात्र कालचा दिवसभर या विषयाचीच चलती होती. संसद आणि प्रसारमाध्यमांचे हे रंग दिसतानाच आता न्यायपालिका आणि कार्यपालिकासुद्धा संशयाच्या भोवऱ्यात सापडलेली अनेक उदाहरणे

आपण पाहिली.

या पार्श्वभूमीवर नव्याने रिंगणात उतरलेली जनतेची वैयक्तिक प्रसारमाध्यमे हळू हळू आपला प्रभाव दाखविण्यास सुरवात करीत आहेत. इंटरनेट हे ते प्रभावी माध्यम. नुकत्याच इजिप्तमध्ये झालेल्या अभूतपूर्व क्रांतीने या माध्यमाची ताकद जगासमोर प्रकट झाली. सर्वसाधारणपणे इस्लामी देशांना तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मागासलेले देश असे म्हणण्याची प्रथा आहे. इजिप्त हा सुद्धा इस्लामबहुल देश आहे. अशा देशात एक 'वेल घोनिम' नावाचा तरुण 'फेसबुक'च्या सहाय्याने जनतेला भावपूर्ण आवाहन करतो काय आणि त्याला प्रतिसाद देत लक्षावधी नागरिक रस्त्यावर उतरतात काय, हा सारा चमत्कारच होता. बरे, त्यांना कोणीही नेता नव्हता. तरीही हा रेटा इतका भक्कम होता की अध्यक्षांचे निष्ठावंत सैन्यदलही हतबल झाले. इजिप्तमध्ये झालेल्या राज्यक्रांतीचे सारे विश्व साक्षीदार ठरले. तेथील बंडाळीची लागण शेजारच्याच लिबियात झाली. कर्नल मोहम्मद गद्दाफींची सत्ता उलथविण्याचे प्रयत्न सध्या तेथे चालू आहेत. विशेष म्हणजे इजिप्तमधील सत्ताबदल अमेरिकेच्या मनात नसतानाही झाला ! अन्यथा जोवर अमेरिका मनावर घेत नाही तोवर एखाद्या देशात सत्ताबदल होत नाही, हा विशेषतः या इस्लामी देशांतील इतिहास आहे. अमेरिकेची मात्रा इजिप्तमध्ये चालली नाही आणि होस्नी मुबारक यांना पायउतार व्हावे लागले.



(सौजन्य : दै. हिंदू, व्यंगचित्रकार- केशव)

अमेरिकेला आजवर कोणत्याही शत्रुदेशाने जेवढे छळलेले नाही, त्याहून अधिक छळ सध्या 'विकिलिक्स'ने मांडला आहे. अमेरिकेने गोपनीयतेच्या नावाखाली लपविलेली आणि जगभरातील दहशतवादाचा नायनाट करण्याच्या नावाखाली केलेली अमानुष दडपशाही विकिलिक्सने इंटरनेटच्या चव्हाट्यावर मांडण्यास सुरवात केली तेव्हा अमेरिकी महासत्तेचे आसन डळमळले. त्यांनी कितीही इन्कारांचा जोर लावला तरी पुराव्यांनिशी मांडलेले सत्य लोकांनी स्वीकारलेले होते. हाच प्रयोग त्यांनी जगभरातील अनेक देशांवर केला. भारतही त्या पैकीच एक. इथले राजकारण सत्याऐवजी मुखवट्यांवरच जास्त चालते. इथे सत्ता टिकविण्यासाठी कोट्यवधींचे खेळ होतात आणि त्याच पक्षाच्या अध्यक्षा देशाला भ्रष्टाचारमुक्त करण्याचे आवाहन करतात. रामजन्मभूमीच्या मुद्द्यावर एखादा पक्ष केंद्रातील सत्ता मिळवितो आणि त्याच पक्षाचा मान्यवर नेता रामजन्मभूमीचे आंदोलन हा मतदारांना संमोहित करून मते मिळविण्याचे एक नाटक असल्याचे सांगतो. हा सारा राजकीय भंपकपणा चालू असताना हेच नेते मात्र साधनशुचितेच्या गप्पा मारतात. अशा स्थितीत 'फेसबुक', 'ट्विटर' अशा सोशल नेटवर्किंग वेबसाईटवरील आणि टाईम्स ऑफ इंडिया सारख्या दैनिकांच्या वेबसाईटवरील वाचकांच्या 'कॉमेंट्स' वाचल्या तर एखाद्या संवेदनशील पंतप्रधानाने एक तर राजकीय संन्यास घेतला असता किंवा आत्महत्या केली असती. स्विस बँकेतील ठेवींबाबतही हीच बाब होती. केंद्रात कोणी मंत्री व्हावे या साठीचे अमेरिकी प्राधान्यक्रमही हिलरी क्लिंटन यांनी घालून दिलेले होते. त्याच विषयावर त्यांनी आक्षेप नोंदविले, हे ही विकिलिक्सने पुराव्यांनिशी समोर आणले.

या साऱ्या आरोप - प्रत्यारोपांत न जाता या सर्वांच्या मुळाशी जाऊन पाहिले, तर एक बाब सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे - जवळजवळ ९५ टक्के वाचकांनी 'विकिलिक्स'वर पूर्णतः विश्वास व्यक्तकेलेला दिसतो. राजकीय नेत्यांनी - मग ते कोणत्याही पक्षाचे असोत - त्यांच्या खुलाशाला कोणीही भीक घातलेली नाही. 'अमेरिकी केबल्स'च्या हेरगिरीवर आणि त्या आधारावरील 'विकिलिक्स'च्या हेरगिरीवर कोणीही अविश्वास दाखवीत नाही, हे चित्र भारतीय अथवा अमेरीकी या दोन्ही देशांतील राजकारण्यांसाठी नक्कीच चिंता करण्याजोगे आहे. हा विश्वास ठेवण्यामागे किंवा वाढीस लागण्यामागेही एक कारण आहे. नगरसेवक, आमदार खासदारपदी निवड झाल्यानंतर अल्पावधीतच त्यांच्या प्रॉपर्टी ज्या वेगाने वाढतात ते समाज उघड्या डोळ्यांनी पाहतो आणि आपले तोंड बंद ठेवतो. एखाद्यावर 'उत्पन्नाच्या तुलनेत अधिक मालमत्ता जमविल्याच्या आरोपावरून' कारवाई सुरू होते तेव्हा सामान्य माणसाच्या मनात एकच विचार येतो - एक तर रितसर 'तोडीपाणी' झालेले नाही किंवा संबंधिताने 'वरच्या' व्यक्तीला दुखावलेले आहे. अशा समाजासमोर जेव्हा दिल्लीच्या दरबारातील करोडोंच्या देवाणघेवाणीच्या बातम्या येतात तेव्हा तो शांतपणे त्यावर विश्वास ठेवतो.

तो सध्या थेट प्रतिक्रिया देत नाही ही बाब चिंतेची आहे खरी, पण बिहार आणि गुजरातमध्ये जनतेने दिलेला कौल पाहिला तर जनमानसातील सूप्त लाटेचा अंदाज बांधणे थोडे सोपे होऊ लागते. माहितीचा अधिकार किंवा सरकारी 'नरेगा' योजना प्रशासनातील पारदर्शीपणासाठी पुरेशा नाहीत उलट त्यांचा गैरवापरच वाढला असल्याच्या असंख्य तक्रारी आहेत. काय घडते आहे, याचे अंदाज बांधण्याइतपत सामान्य माणूस आता परिपक्व होताना दिसतो आहे. 'हमाम मे सब नंगे' या म्हणीचे प्रत्यंतर त्याला मागची काही दशके येते आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या लोकशाहीच्या चारही स्तंभांवरील त्यांचा विश्वास डळमळीत होत असताना त्यांच्या मतांचे खरेखुरे प्रतिबिंब उमटविणारा पाचवा स्तंभ आज मजबुतपणे विकसित होतो आहे. माहिती तंत्रज्ञानाचा आविष्कार शुद्ध लोकशाहीला आणि पारदर्शकतेला पूरक ठरणाऱ्या अशा लोक-माध्यमांच्या स्वरुपात विकसित होताना पाहणे ही अतिशय आनंददायी बाब आहे. भावी परिवर्तनाची बिजे याच स्तंभाच्या आधाराने रुजताना दिसत आहेत.

**दत्ता जोशी**
मो. ९२२५३०९०१०

■■

# पॅकेजचा मलिदा कोणाच्या घशात?

**शेतीमालाला भाव मिळाला तर अशा शे-सव्वाशे भाकड योजना, पंतप्रधानांचे पॅकेज, मुख्यमंत्र्यांचे पॅकेज त्यानंतर त्यात भ्रष्टाचार आणि साडेचारशे सरकारी कर्मचाऱ्यांचे घाऊक निलंबन असे होणार नाही. हातात पैसा आल्यानंतर आपणही चांगल्या घरात राहावे. सोयीसुविधा कराव्यात एवढेच नव्हे, तर आपल्या गाईबैल आणि बकऱ्यांनाही थोडा ठीकठाक गोठा बांधावा, एवढी अक्कल शेतकऱ्यांना आहे. त्यांच्या नावाने आलेला पैसा जर सरकारी कर्मचारीच लाटत असतील, तर अशा कितीही निलंबनाच्या कारवाया झाल्या, तरी त्यातून निष्पन्न काहीच होणार नाही.**



**ज्ञानेश्वर शेलार**

विदर्भातील सहा जिल्ह्यांसाठी केंद्र सरकारने दिलेल्या पॅकेजमध्ये ४०५ अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस आल्यावर व त्यावर विधानसभेत विरोधी पक्षाच्या आमदारांनी मागणी केल्यानंतर कृषिमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ५० अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. तसेच ४०५ सरकारी कर्मचारी निलंबित केल्याचा आदेश काढला. ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली त्यांच्या साहाय्यासाठी जुलै २००६ मध्ये केंद्र सरकारने ७५० कोटी रुपयांचे, तर राज्य सरकारने ऑक्टोबर २००६ मध्ये १०७५ कोटी रुपयांचे मुख्यमंत्री पॅकेज जाहीर केले होते. यात हा घोटाळा झाला आहे. घोटाळा झाल्याची ओरड झाल्यानंतर राज्यशासनाने डॉ. गोपाळ रेड्डी समिती नेमली. या समितीच्या चौकशीत भ्रष्टाचार झाल्याचे स्पष्ट झाले. मात्र नंतर कुठलीही कारवाई झाली नाही. आत्महत्यांचे सत्रही सुरूच होते. मोठा कालावधी गेल्यानंतर व पुन्हा ओरड झाल्यानंतर शासनाने अशा प्रकारचे ४०५ अधिकारी निलंबित करण्याची कदाचित देशातील पहिलीच घाऊक कारवाई असावी.

या निलंबनाच्या कारवाईनंतर शासन व विशेषतः कृषिमंत्री किती धडाडीने निर्णय घेत आहेत, अशी भावना होणे साहजिक आहे.

घोटाळ्यांची संख्या वाढते आहे व मोठमोठे घोटाळे उघडकीस येत आहेत आणि योग्य नाही, असे वाटण्याऐवजी कारवाईचे कौतुकच जास्त होत आहे. हा सर्वसामान्यांच्या विचार करण्याच्या व त्याला राजकारण्यांनी कशाप्रकारे खेळवत ठेवायचे याचा संबंध यातून दिसून येतो. कदाचित पुढील काही असे मोठे घोटाळे झाल्यास अशाच प्रकारच्या घाऊक कारवाईंचे पेव फुटतील. समित्या नेमल्या जातील. त्यांच्या चौकशीनंतर तातडीने अशा घाऊक कारवाया केल्या जातील. लोकही खुश होतील. भ्रष्टाचाराला शासन कसे उखडून टाकण्याचा प्रयत्न करीत आहे, अशी भावना होणे साहजिक आहे. यातील मोठे मर्म असे आहे, की असा भ्रष्टाचार होणे व त्यावर बराच काळ कोणतीही कारवाई न करणे असे प्रकार इतके दिवस चालू होते. शासनाची तत्परता दाखवण्यासाठी आता त्यावर ताबडतोब समिती व लगेच कार्यवाही अशी सुरुवात होईल; पण या कार्यवाहीनंतर खरोखरच या शेतकऱ्यांच्या मढ्यावरील लोणी खाणाऱ्या कर्मचाऱ्यांवर काही कार्यवाही होणार आहे, की थोडे दिवस निलंबन, कोर्ट कचेऱ्या, पुन्हा चौकशा, पुन्हा एखादी समिती आणि लोक विसरून गेले, की पुन्हा कर्मचारी आपापल्या पदावर तेही निलंबनाच्या काळातील वेतन घेऊन, पुढच्या भ्रष्टाचाराला मोकळे-असे तर होणार नाही ना!

सरकारी योजनांतील भ्रष्टाचाराच्या बातम्या दररोज येत आहेत. त्याचे कारण योजनाच इतक्या उदंड झाल्या आहेत, की कोणत्या योजनेत काय चालते, याचा कदाचित शासनालाही विसर पडलेला असतो. एका तालुका कृषी अधिकाऱ्याने या विषयी बोलताना शेतकऱ्यांसाठी शासनाच्या जवळजवळ १०० योजना आहेत- त्यापैकी ४० योजना अधिकारी व कर्मचारी यांना माहीत असतात. ५-६ योजना शेतकऱ्यांना माहीत असतात व त्यातील एखाद्या योजनेचा कोणातरी एखाद्या शेतकऱ्याला फायदा होत असतो. या योजनांची विभागणी मोठी गुंतागुंतीची असते. त्यातील काही योजना पंचायत समितीच्या अखत्यारित, काही जिल्हा परिषदेच्या तर बाकीच्या शेतीविषयक विविध खात्यांच्या अखत्यारित येतात. अशाप्रकारे विविध स्तरावर आणि १००च्या आसपास योजना त्यामुळे अंमलबजावणीच्या नावाने सतत सावळा गोंधळ चालू असतो. मुख्यमंत्री व पंतप्रधान यांनी जाहीर केलेल्या पॅकेजमध्येही आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना थोडीफार मदत, त्यानंतर बी-बियाणे, अवजारे अशा प्रकारची मदत, असे स्वरूप होते. मुळात या शेतकऱ्यांनी

ज्या कारणासाठी आत्महत्या केली. ते म्हणजे त्यांच्यावर असलेले ५-२५ हजारांचे कर्ज लाखात गेले आणि ते फेडणे शक्य झाले नाही. बँकांकडून होणारा कर्जपुरवठा बंद झालेला. खासगी सावकाराकडून चढ्या व्याजाने घेतलेली खासगी कर्जे, अतिवृष्टी किंवा दुष्काळामुळे झालेली नापिकी यातून आलेला कर्जबाजारीपणा हे मुख्य कारण होते. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जफेडीसंदर्भात कुठलीही कारवाई झालेली नाही. त्यांच्या डोक्यावरील कर्जाचा भार त्यांच्या वारसांच्या डोक्यावर आला. फक्त तात्पुरती मदत म्हणून अवजारे बियाणे देण्यात आली. त्यामुळे प्रश्न अधिकच गंभीर झाला. याचेच उदाहरण म्हणजे ज्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पत्नीला राहुल गांधी भेटले व त्यांच्या वलयांकीत व्यक्तिमत्त्वामुळे ही महिलाही देशभर गाजली. तिच्या जावयानेही कर्जबाजारीपणामुळे नंतर आत्महत्या केली.

हा योजनांचा सुकाळ इतका वाढलेला आहे, की काही दिवसांपूर्वी दिल्लीतील केंद्र सरकारने आयोजित केलेल्या एका बैठकीमध्ये कर्मचाऱ्याने या योजनांना सतत इंदिरा गांधी, राजीव गांधी, संजय गांधी किंवा नेहरू, जवाहर अशी नावे दिली जातात, त्यामुळे कोणती योजना असा त्यांचा गोंधळ उडतो, तरी यापुढे गांधी घराण्याची नावे देण्याचे कमी करावे अशी मागणी केली होती. अर्थात ही मागणी घराणेशाहीला मान्य होणार नाही. जेवढ्या योजना जास्त आणि घराण्याचे नाव वाढवायचे तर कुठलीही मूळ उपाययोजना न करता योजनांवर योजना जाहीर करायच्या आणि त्यांना अशाप्रकारची एकाच छापाची नावे द्यायची. केंद्रशासनाच्या अशा योजनांपैकी जवळजवळ ५० योजनांना गांधी आणि नेहरू यांची नावे दिलेली आहेत. लोकांनाच आता कळेनासे झाले, की कोणती योजना कशासाठी. त्यातून घडतो आहे फक्त राजकीय प्रचार!

असा योजनांचा गोंधळ होत असेल, तर काय करावे याचे उत्तर स्वतंत्र भारत पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात दिलेले आहे. सरकारची काटछाट करणे आवश्यक आहे (Pruning Of the State). सरकारची काटछाट करणे तर दूरच राहिले. निदान ज्या भाराभर योजना राबवल्या जातात. नवनवीन योजना काढल्या जातात, त्या



तरी राज्यशासनाने व केंद्रशासनाने कमी करणे आवश्यक आहे. प्रत्येक विभागासाठी फार तर २-३ योजना असाव्यात आणि त्या प्रभावीपणे अमलात आणाव्यात तरच शेतीसाठी दिल्या जाणाऱ्या योजनांचा फायदा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल.

मध्यंतरीच्या काळात सरकारी खर्च कमी करून तो किमान २० ते २२ टक्क्यांपर्यंत आणावा अशा मागणीने जोर धरला होता. हा खर्च गेल्या पंचवार्षिकमध्ये ५० टक्क्यांपर्यंत आणण्याचा प्रयत्नही झाला; परंतु पुन्हा हा खर्च जवळजवळ ७५ टक्क्यांपर्यंत गेलेला आहे. विकास कामांसाठी कराच्या रूपाने जमा झालेल्या पैशांतील फक्त २५% रक्कम वापरली जाते. निव्वळ सरकार चालवणे यावरच ७५% रक्कम खर्च होत आहे. नुकतेच सोनिया गांधींनी पुन्हा हा खर्च कमी करावा यासाठी हाक दिली आहे. त्याची अंमलबजावणी होणार नाही याबद्दल खात्री बाळगावी. खर्च कमी करण्याची घोषणा एकीकडे करायची, तर दुसरीकडे ७०% लोकांना अन्नसुरक्षा द्यायची. हे त्यांच्या कोणत्या अर्थशास्त्रात बसते. हे बघण्यासाठी त्यांना कदाचित गेल्या ६० वर्षांत काँग्रेस ज्या राजकीय विचारसरणीवर चाललेली आहे, त्या नेहरू नीतीची काही पुस्तके तरी चाळून बघावी लागतील. तशी गरज नाही कारण त्यांनी पक्षाचे सर्वेसर्वा होण्याअगोदर काही दिवस याचा बारकाईने अभ्यास करून नंतरच कारभार हातात घेतलेला आहे. लोकांना असे वाटावे, की पक्षाचे प्रमुख हे चांगले काम करायला उत्सुक आहेत. खालचे लोकच सगळे घोटाळे करीत आहेत. पंतप्रधानांनी तर वारंवार अशाप्रकारे झालेल्या घोटाळ्यांची आपल्याला माहिती नव्हती अशी कबुली दिली आहे. एकाच वेळी एक घोषणा करायची व तिच्या विरोधात कृती करायची, हे सर्रास चालू आहे.

खेड्यांसाठी व शेतीसाठी इतक्या योजना आहेत, की त्यातील काही ठळक योजनांचा उदाहरणार्थ स्वच्छता अभियान, पाणीपुरवठा, मध्यान्ह भोजन, महिला सबलीकरण आणि अगदी शौचास जाऊन आल्यानंतर हात धुण्याची योजना. या सर्व योजनांचा फलित काय? यासाठी ग्रामीण भागामध्ये फेरफटका मारला असता, एक वेगळे चित्र या वर्षी दिसून आले. माझा ज्या गावांशी नेहमी संबंध येतो, त्या फुलंब्री व सिल्लोड या मका आणि कापूस पट्ट्यात फिरत असताना कोणत्याही गावापासून चार-पाच किलोमीटर्सच्या अंतरावर प्रवास केल्यानंतर शेतात चार-पाच स्लॅबच्या घरांचे मोठे बांधकाम चालू असलेले दिसून येते. शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर त्यांनी दिलेले उत्तर मोठे अर्थशास्त्राचा अर्थ सांगणारे आहे. या भागात या वर्षी चांगला पाऊस व हवामान तसेच बीटी कॉटन यामुळे कापसाचे भरघोस उत्पन्न आले. फेडरेशन बंद पडल्यामुळे सरासरी ४ ते ४५०० हजार भाव मिळाला. याच पैशांतून शेतकरी चांगली पक्की घरे, शहरामध्ये चार रुमचा फ्लॅट असावा, असे बांधकाम अर्थात खोल्या प्रशस्त, संडास-बाथरूम यांच्या सोयी, शेजारच्या विहिरीवरून पाण्याची व्यवस्था. शेजारीच गोठ्यासाठी पत्र्याची शेड, अशी बांधकाम चालू आहेत. शेतीमालाला भाव मिळाला तर अशा शे-सव्वाशे भाकड योजना, पंतप्रधानांचे पॅकेज, मुख्यमंत्र्यांचे पॅकेज त्यानंतर त्यात भ्रष्टाचार आणि साडेचारशे सरकारी कर्मचाऱ्यांचे घाऊक निलंबन असे होणार नाही. हातात पैसा आल्यानंतर आपणही चांगल्या घरात राहावे. सोयीसुविधा कराव्यात एवढेच नव्हे, तर आपल्या गाईबैल आणि बकऱ्यांनाही थोडा ठीकठाक गोठा बांधावा, एवढी अक्कल शेतकऱ्यांना आहे. त्यांच्या नावाने आलेला पैसा जर सरकारी कर्मचारीच लाटत असतील, तर अशा कितीही निलंबनाच्या कारवाया झाल्या, तरी त्यातून निष्पन्न काहीच होणार नाही. सरकारने शेतकऱ्यांच्या खिशातून हात काढून घेतला, तर असा बिकट प्रसंग सरकारवर पुन्हा येणार नाही.

**ज्ञानेश्वर शेलार**
औरंगाबाद.
मो. ९२२६७९७०१८

■■

# तीन दिन स्कूल, चार दिन परिवार

**मैं दो दिन पहले जी. नारायणस्वामी द्वारा लिखीत स्वंतत्र पार्टी के प्रणेता चक्रवर्ती राजगोपालाचारी की जीवनी पढ़ रहा था, मेरे इन तमाम प्रश्नों के उत्तर मुझे राजाजी देने लगे. जब हमारे देश के पहले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू की लायसेंस कोटा परमिट राज वाली नीतियाँ देश को तबाह कर रही थी, राजाजी ही वह महान सपूत थे जिन्होने देश के शहीदों के सपनों के स्वंतत्र भारत को बचाए रखने की और भारतीय प्रतिभा का संरक्षण करने की अंतिम ईमानदार कोशीशें की थी.**



अ‍ॅड. दिनेश शर्मा

शेअरखान अमरावती शाखा के प्रमुख के रूप में कार्य करते हुए मुझे पिछले सप्ताह एक बेहद दारूण अनुभव से गुजरना पड़ा. मेरे एक सेवानिवृत निवेशक की पत्नि का फोन आया कि वे अपने निवेश में हुए घाटे से काफी खिन्न है और इस बारे में चर्चा करने के लिये मुझसे मिलना चाहती है. मैं अपने एक सहयोगी अधिकारी के साथ उस दंपत्ति से मिलने पहुँचा. इन दिनों में बाजार की मंदी के कारण कई निवेशक तनाव और अवसाद के शिकार हो चुके हैं. शाखा प्रमुख के रूप में उनसे मिलना और उनके तनाव दूर करना, मेरी व्यवसायिक जिम्मेदारियों में से एक है. जब मैं और मेरा सहयोगी उनके नये खरीदे घर में पहुँचे, उन्होंने हम दोनो का बेहद आत्मीयता से स्वागत किया. पति, भारत की प्रमुख तेल उत्पादक कंपनी ओएनजीसी में कार्यरत रह चुका थे और पत्नि ने अपने सफल पति के जीवन का पूरा आनंद लिया था. वे क्लबों में जाती, अपनी कालोनी के सांस्कृतिक कार्यक्रमों का सूत्र संचालन करती और एक बेहद सुकून से भरी उस जीवनशैली का आनंद लेती जिसमें बदलते भारत की सारी तस्वीरें शामिल हुआ करती. उनके दोनो बच्चें उच्च शिक्षा विभूषित होने के लिये देश के बड़े शहरों में चले गये और बाद में विदेश में नौकरी के लिये निकल गये. पति जब सेवानिवृत हुए, वे लोग अमरावती आकर रहने लगे. आज बच्चे उनसे हर सप्ताह फोन पर बातचीत कर लेते हैं.

जब मैं उनसे मिला, उनके जीवन के अकेलेपन ने मुझे मायूस कर दिया. पत्नि बताने लगी कि दो दिन पहले जब उनके पति के सीने में दर्द उठा तो उन्हें दवाखाने पहुँचने में काफी यातनाएँ हुई. आधी रात को उनके साथ भागदौड़ करने वाला कोई नहीं था. पति दर्द से बेहाल था और वे स्वयं उस तनाव को अकेले जीने के लिये मजबूर थी. अपना अकेलापन और वेदनाएँ बताते बताते उनकी आँखे भीगने लगी. पति उन पर थोड़ा नाराज हुए कि क्यों वह इसतरह बाहर वालों के सामने कमजोर पड़ रही है. हमारी बातचीत उनके अकेलेपन से होते होते उनके निवेश पर आयी और समाप्त हो गई. उनसे विदा लेकर लौटते हुए मैं अपने सहयोगी से बस इतना ही कह सका कि इस परिवार का बड़ा दुख अपने वित्तिय निवेश के घाटे से भी अधिक पारिवारिक स्नेह के निवेश में हुए घाटे का है.

हम एक रिश्तें के कारण जन्म लेते है, और फिर रिश्तों को जन्म देते है. वे हमारा और हम उनका निर्माण करते है. उनके कारण हम संस्कार सीखते है, संस्कृति को समझते है तथा प्रेम और मित्रता करना सीख जाते है. वे हमारे भाव विश्व का निर्माण करते है और हमें जीवन के सबसे कीमती मूल्यों से रूबरू कराते है. कल यदि हम सबकुछ पा लेते है किंतु रिश्तों से वंचित हो जाते है तो हम से बड़ा दरिद्र और दिवालिया और कौन होगा? मांऊट एवरेस्ट के शिखर पर आपको यदि करोडों रूपयों का खजाना भी मिल जाए तो आप वहाँ रहना पसंद नहीं करेंगे. क्योंकि हम सफल और समृद्ध भी होना इसीलिये चाहते है कि रिश्तें जीये जा सके. हम अपना अंहकार और अस्तित्व अपने ही आसपास के लोगो की नजरों में तोलते रहते है. हम नाराज भी उन्हीं पर होते है जिन से प्रेम करते है. रिश्तें हमारी जिंदगी का सबसे बड़ा या यूँ कहिये एकमात्र निवेश है, जिसका लुटना कोई कभी बर्दाश्त नहीं कर सकेगा.

एकतरफ आधुनिक विचारों और नये ज्ञानविज्ञान के कारण हमारी भौतिक समृद्धि बढ़ती जा रही है, वहीं दूसरी ओर हमारी व्यावसायिक मजबूरियों के चलते हमारे भावनिक विश्व उजड़ते जा रहे है. विश्व के समूचे इतिहास में इससे बड़ा विस्थापन शायद ही कभी हुआ हो. हम जैविक रूप से तो जिंदा है किंतु बौद्धिक और भावनिक रूप से तिल तिल कर मर रहे है. हम भौतिक रूप

से संपन्न किंतु भीतर से छिन्न भिन्न होते चले जा रहे है. नतीजतन जहाँ पहले के बुजुर्ग बड़े ही दमदार और विनोदी हुआ करते थे, हमारे आज के वृध्द बेहद अकेले, उदास और खिन्न दिखाई देते है.

हम जिंदगी के नाम पर क्या जी रहे है? जिंदगी की इस विराट यात्रा के अंत में हम कैसे और किसे अलविदा कहेंगे? या हमारी सारी यात्रा एक निपट एकांत विरान मोड़ पर समाप्त हो जाएगी? न कोई हमें अलविदा कहने आयेगा न हम किसी से विदा लेंगे. बस, किसी अनजान शहर में हुई दुर्घटना की तरह, गरिमाहीन तरीके से, हम इस दुनिया को छोड़ देंगे. क्या है इस पागलपन की जड़? कहाँ है इस भयानक वास्तविकता से मुक्ति का उपाय? क्या मनुष्यता सदा से इतनी ही तात्कालिक और गमगीन रही है कि उसके आँसू पोछने वाला भी कोई मिला नहीं? सच कहूँ तो उस दंपत्ति से मिलने के पश्चात मैं सारी रात नहीं सो पाया. मेरे मन के हर कोने में प्रश्न और प्रतिप्रश्न उभरते रहे. धीमे धीमे इस प्रश्न के प्रति मेरी समझ सुलझती गई, इस विषवृक्ष की जडें दिखाई देने लगी.

इस पागलपन की शुरूआत होती है हमारे बचपन से. किसी भव्य सपने की मृगतृष्णा के पिछे अनजाने में माँ बाप अपने बच्चों को बेहद कम उम्र में स्कूल भेज देते है. वह बच्चा, जो रिश्तों को, परिवार को और आसपड़ौस को जीने के लिये जन्मा है, उनसे मजबूत और समृध्द होने के लिये धरती पर आया था, उसे विस्थापित करके स्कूल की किताबी दुनिया का नागरिक बना दिया जाता है. वहाँ भी उसे अपने मित्रों या शिक्षकों के जीवंत अनुभवों से जिंदगी सिखाने के बजाय किताबी ज्ञान और एकस्तरीय परिक्षा पद्धति का गुलाम बना दिया जाता है. पहली बार हम उसके व्यक्तित्व का अपमान करके उसे बताते है कि वह किनसे मुकाबले में अच्छा है और किनसे कमजोर है. वह जन्मा तो था अपनी जिंदगी जीने के लिये, किंतु हम उसे तोलते है दूसरों की स्केल पर. वह अकेले में कितना काबिल है इस बात से समाज को कोई लेना देना ही नहीं है. वह दूसरो के सामने कहाँ खड़ा है, इसी बात का पता लगाने में सभी शिक्षकों को सालों लग जाते है.

चलो मान लेते है कि वह अपनी कक्षा में सबसे नाकाबिल है! तो क्या इस समूचे रचनातंत्र में उसकी कहीं कोई आवश्यकता नहीं होगी? क्या वह उन जानवरों से भी बदतर है जिनसे हम शताब्दियों से काम लेते आ रहे है? ऐसे ही किसी कमजोर क्षण में उस मासूम बच्चे का अपने आप से रिश्ता टूट जाता है. वह जो है, उससे उसका रिश्ता टूट जाता है और वह जो नहीं है, वह बनने की यात्रा आरंभ कर देता है. स्कूली शिक्षा, ट्यूशन कक्षाओं और परिक्षा परिणामों की इस भगदड़ में वह धीमे धीमे अपने सभी रिश्तों से दूर होने लगता है, अपने मुहल्ले और गाँव से दूर होने लगता है. और तो और वह अपने दौर की सच्चाईयों से दूर भागने लगता है. उसके भीतर का एक एक कोश मार मार कर उसे एक मशीन में तब्दील कर दिया जाता है. नतीजतन वह शिक्षा में जितना आगे निकलता चला जाता है, उसकी संवेदनाएँ उतनी ही कुंद्र या संकुचित होने लगती है. उसका भावनिक विश्व बिखरने लगता है. उसकी जड़े कट जाती है और नैतिक मूल्य बनने के पूर्व ही ध्वस्त हो जाते है. जिसतरह गन्ने को निचोड़ निचोड़ कर उसका रस निकालकर उसे फैंक दिया जाता है, उसीतरह उसके नियोक्ता उसकी जवानी, स्वास्थय, सपनों और समय का शोषण करके उसे निचोड़ लेते है.

हो सकता है कि ऐसे युवा कारपोरेट दुनिया की जरूरत हो, किंतु किसी भी नजरिये से वे अपने परिवारों या देश के किसी काम के नहीं होते हैं. ये युवा समाज के अनगिनत प्रवाहों को अपने स्टडीरूम की खिड़कियों से देखते रहते है, किंतु कभी उनका हिस्सा नहीं बनते. चार दोस्तों से बड़ा उनका संसार नहीं होता हैं. एक बड़े वेतन की नौकरी से महान कोई सपना उनके पास फटकता भी नहीं है. दूसरों के दुख से उनका कोई जुड़ाव नहीं होता है. वे हमारी दुनिया में होकर भी, उसमें नहीं होने के बराबर होते है. दूसरी ओर उनके परिवार भी उनकी अनुपस्थिति में उजड़ने लगते है. उन पर निवेश परिवार का होता है, पर उस निवेश का कोई भी फायदा उस परिवार को नहीं मिलता है. सबसे दारूण सत्य तो यह है कि छोटा परिवार सुखी परिवार के नारे के कारण अन्य विकल्प भी मौजूद नहीं है.

लाखों परिवारों के इस महानतम त्याग, या कहिये आत्मघाती शोषण के बल पर विश्व के विकसीत देश हर रोज समृध्द होते चले जा रहे है. दादा और दादीयाँ तो बीते जमाने की बात है, भुआ और माँसीयाँ हमारे घरों से लुप्त हो चुकी है, काका और मामा की डाँट फटकार से हमारे आँगन के रिश्ते कभी के टूट चुके है. सगे भाई बहनों में जानलेवा प्रतियोगिता हो रही है. पतिपत्नि के रिश्तों में कभी नहीं थे इतने तनाव आज मौजूद है, यह आप किसी भी मनोचिकित्सक या वकील के आफिस में जाकर देख सकते है. कानून बना बनाकर हम उन रिश्तों की व्याख्या या सीमायें तय कर रहे है, जो केवल परस्पर प्रेम या भावनिक एकता की बुनियाद पर ही पनप सकते है. लोग किसी भी रिश्तें में शामिल होना ही नहीं चाहते हैं. वे बगैर उत्तरदायित्व के साथ में रहने को तैयार है. देश के महानगरों में सबसे पढ़े लिखे और उच्च उत्पन्न आय वर्ग में अपने जीवनसाथी को आत्महत्या के लिये प्रेरीत करके या प्रत्यक्ष हत्या द्वारा रास्ते से हटाने की कई घटनायें सामने आ चुकी है. ओ साथी रे, तेरे बिना भी क्या जीना से आगे बढ़कर हम तू नहीं, और सही वाले दौर में पहुँच चुके है.

यह विकास है या मानविय गरिमा का कत्लेआम है? यह हमारी आधुनिकता का ज़श्न है या रिश्तों की शवयात्रा का शोक गीत? कलिंग के महायुद्ध में इधर उधर पड़े कटे हुये रक्तरंजित मानव शरीर देखकर सम्राट अशोक शोक में डूब गया था और उसकी आँखे खुल गई थी. उसने अपने शेष जीवन को महान सत्य की खोज के लिये समर्पित कर दिया था. अपने आपको संभालने के लिये अपने आसपास के रिश्तोंनातों के और कितने बलिदान हम देखना चाहते है? संस्कृति के इस यक्ष प्रश्न का क्या कोई उत्तर है?

अहो भाग्य मेरे! मैं दो दिन पहले जी. नारायणस्वामी द्वारा लिखीत स्वंतत्र पार्टी के प्रणेता चक्रवर्ती राजगोपालाचारी की जीवनी पढ़ रहा था, मेरे इन तमाम प्रश्नों के उत्तर मुझे राजाजी देने लगे. जब हमारे देश के पहले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू की लायसेंस कोटा परमिट राज वाली नीतियाँ देश को तबाह कर रही थी, राजाजी ही वह महान सपूत थे जिन्होने देश के शहीदों के सपनों के स्वंतत्र भारत को बचाए रखने की और भारतीय प्रतिभा का संरक्षण करने की अंतिम ईमानदार कोशीशें की थी. जब राजगोपाालाचारी मद्रास राज्य के मुख्यमंत्री बने तो १९५३ में उन्होंने आजाद भारत के इतिहास का सबसे महान शिक्षा सुधार विधेयक मद्रास विधानसभा में प्रस्तुत किया, जिसमें सप्ताह में केवल तीन दिनों की स्कूली शिक्षा का प्रावधान रखा था, इस तरीके से

वे जहाँ एक सप्ताह में विद्यार्थियों के दो समूहो को शिक्षा देने का सपना देख रहे थे तो वहीं बच्चों को उनके परिवारों के करीब रखने की भी योजना बना रहे थे. वे मानते थे कि घर, घर तो होते ही है, साथ ही व्यापार के स्कूल भी होते है और अभिभावक, अभिभावक तो होते ही है, शिक्षक भी होते है. उनका सपना था कि इस तरह बच्चे अपने परिवार के उद्योग व्यापार को भी समझ लेंगे और नयी तालीम द्वारा स्वयं को आधुनिक भी बनाते चले जायेंगे. महान अर्थशास्त्री और बाद में देश के राष्ट्रपति बने डॉ. जाकिर हुसैन ने इस योजना की प्रशंसा की थी. आचार्य कृपलानी जैसे महान गांधीवादी विचारक ने इसे बच्चों की शिक्षा का सबसे वैज्ञानिक तरीका माना था. द्रमुक पक्ष के जातीयवादी तेवर के कारण वह प्रस्ताव मद्रास विधानसभा में पास नहीं हुआ किंतु आज भी देश के कई शिक्षाशास्त्री मानने है कि यदि यह प्रस्ताव स्वीकार कर लिया जाता तो दक्षिण भारत के पास ग्रामीण परंपरागत उद्योगों के लिये उपयुक्त एक विशाल प्रशिक्षित श्रमिकवर्ग तैयार होता. ऐसे बच्चे केवल किताबी ज्ञान से ही समृद्ध नहीं होते बल्कि व्यावसायिक रूप से भी पारंगत होते. और सब से बड़ी बात वे निर्णय लेने की प्रक्रिया में भी शामिल होते.

बरसों के बाद देश की शिक्षा नीति पर उतने ही गंभीर सवाल शेतकरी संघटन के प्रणेता शरद जोशी ने खड़े किये. भारत विरूद्ध इंडिया का नारा देते हुए उन्होंने भी देश के शिक्षाशास्त्रीयों से पूछा कि जो शिक्षानीति ग्रामीण भारत को खोखला कर रही है, उसकी जीवन शक्ति को क्षीण कर रही है, उसे यह देश कब बदलेगा? अपनी पुस्तक स्वतंत्रता क्यों नष्ट हुई? द्वारा शरद जोशी ने देश को चेताया कि हमारी शिक्षानीति हमारे परंपरागत उद्योगों, खेती और व्यापार की दुश्मन बनी हुई है, वह समाज में श्रम करने वालों को हीन दर्जा देती है और सरकारी बाबूओं को माई बाप सरकार बनाने पर तुली हुई है. देश के स्कूल कॉलेजों से निकले डाक्टर और वकील गाँव के भोले भाले ग्रामीणो को लूट रहे है. देश के पढ़ेलिखे युवा बाप दादा के जमाने की खेतीबाड़ी बेचकर प्राप्त पैसे से किसी शिक्षण महर्षि के दास बनने को तैयार है. नतीजतन देश के गाँव के गाँव उजड़ते चले जा रहे है और शहर बदबूदार बस्तियों से अटे जा रहे है. आजाद भारत की समाजवादी सरकार ने देश को जो शिक्षा पद्धति दी उसने हमारी ग्रामीण अर्थव्यवस्था की रीढ़ ही तोड़कर रख दी है. देश के परंपरागत उद्योग केवल अनपढ़ या कम पढ़े लिखे मुस्लिमों के भरोसे चल रहे है. देश की शिक्षा संस्थाएँ या तो कांस्टेबल तैयार कर रही है या कारकून. शुद्ध प्रतिभा का कोई चमत्कार यहाँ संभव नहीं है. देश के उद्योग और व्यापार से पहले भी उनका कोई रिश्ता नहीं था, भविष्य में तो उनका अपना अस्तित्व समाप्त होने के कगार पर है. कुछ विशिष्ट और मँहगे कॉलेज, सदा चमकते पश्चिम की जरूरतों को पूरा करने वाले पाठ्यक्रमों के भरोसे इस देश को कब तक बचा सकेंगे? और वह भी कितनी महँगी किंमत पर?

**बरसों के बाद देश की शिक्षा नीति पर उतने ही गंभीर सवाल शेतकरी संघटन के प्रणेता शरद जोशी ने खड़े किये. भारत विरूद्ध इंडिया का नारा देते हुए उन्होंने भी देश के शिक्षाशास्त्रीयों से पूछा कि जो शिक्षानीति ग्रामीण भारत को खोखला कर रही है, उसकी जीवन शक्ति को क्षीण कर रही है, उसे यह देश कब बदलेगा? अपनी पुस्तक स्वतंत्रता क्यों नष्ट हुई? द्वारा शरद जोशी ने देश को चेताया कि हमारी शिक्षानीति हमारे परंपरागत उद्योगों, खेती और व्यापार की दुश्मन बनी हुई है, वह समाज में श्रम करने वालों को हीन दर्जा देती है और सरकारी बाबूओं को माई बाप सरकार बनाने पर तुली हुई है.**



शिक्षा किसी भी देश के शरीर में बहते रक्त के समान होती है. शरीर का कोई अंग यदि विकलांग हो तो शरीर चल सकता है किंतु रक्त ही यदि दूषित या संक्रामक बिमारियों के किटाणुओं से युक्त हो तो शरीर कैसे बचेगा? वह आपके फेफ़ड़ो और मस्तिष्क को भी कुंद्द या मृत कर देगा. आज इस देश की स्थिति दूषित रक्त दिये हुए मरीज से ज्यादा अलग नहीं है. हमारे परिवार खतरे में है, समाज को चलायमान रखनेवाली सामाजिक, धार्मिक और सांस्कृतिक संस्थाओं के पास नेतृत्व नहीं है. और तो और, हमारी कार्यपालिका, विधायिका और न्यायपालिका खतरे में है. कहीं कोई नेतृत्व नहीं है, बस नौकर ही नौकर हावी है. सर्वग्राही भ्रष्टाचार का भस्मासुर मानो सभी नैतिक मूल्यों का भस्म किये दे रहा है. महान नेतृत्व जिस रास्ते से तैयार हो सकता था उन सभी रास्तों पर औसत सोच के लोगों का कब्जा है. हमारी शिक्षा नीति हमारी महान विरासत का आईना नहीं है. वह हमें

केवल एक उत्पाद समझती है और वह उत्पाद भी भारतीय बाजार में बिकने योग्य नहीं, बल्कि पश्चिम के बाजार के उपयुक्त. ऐसे माहौल में नैतिक मूल्यों की शिक्षा के लिये हम फिर से हमारे परिवारों की ओर ताँक सकते है. हम राजाजी की शिक्षानीति को अमल में लाकर देश का पुर्ननिर्माण कर सकते है.

यह कैसे हो सकता है?

**प्राथमिक शिक्षा**

देश में प्राथमिक शिक्षा को संपूर्ण रूप से असंघठित कर दिया जाए. ना तो इसका कोई पाठ्यक्रम हो, ना ही कोई शेक्षणिक वर्ष हो. ऐसा कोई भी युवक, जो स्नातक हो चुका हो, वह मामूली प्रशिक्षण हासील कर के स्वयं का विद्यालय शुरू कर सके ऐसी व्यवस्था कर दी जाए. ऐसे तमाम छोटे छोटे विद्यालय, नगरपरिषद या तालुका स्तर पर रजिस्टर्ड कर दिये जाए ताकि उनके शिक्षकों को बीच बीच में ज्ञानदान के नये नये तरीको से परिचित कराया जा सके. इन शिक्षकों का निकालने का या नियुक्त करने का किसी को कोई अधिकार न हो. जो भी विद्यार्थी शासकीय सहायता से उनके यहाँ पढ़ना चाहता हो, उसका खर्च शासन ने एक निश्चित दर पर वहन कर लेना चाहिये. ये नये दौर के और नयी तकनीकि से ज्ञानदान करनेवाले गुरूकुल बने. प्रत्येक गुरूकुल का अपना शेक्षणिक पाठ्यक्रम, अपने तरीके और अपने शैक्षणिक सत्र या सप्ताह हो. इसका मूल उद्देश्य शिक्षा देना न होकर शिक्षा की अभिरूची पैदा करना हो. पाँच वर्ष से नौ वर्ष के बच्चों को इसमें पढ़ाया जाए.

**माध्यमिक शिक्षा और उच्च माध्यमिक शिक्षा**

जैसा कि राजाजी ने सपना देखा था, समूची माध्यमिक और उच्च माध्यमिक शिक्षा सप्ताह में तीन दिन ही दी जाए. बाकी के दिनों में बच्चा अपने पालकों के पास रह सके, उनसे ही जीवन के बुनियादी उसूल सीख सके, उनके कारोबार, खेतीबाड़ी या व्यापार के संचालन में हाथभार लगा सके, ऐसी व्यवस्था हो. मेरे पिता ने जब मैं सातवीं में ही था, तभी मुझे बहीखाते सिखा दिये थे. जब मैं महाविद्यालय में पहुँचा तो पुस्तपालन और लेखाकर्म के प्रश्न मेरे लिये बाँए हाथ का खेल थे. वे संपत्ति के सौदे करते समय मुझे साथ में रखते. इसका सबसे बढ़ा फायदा मुझे यह हुआ कि मैं अपने सारे जीवन में संपत्ति के किसी भी व्यवहार में कमजोर नहीं पड़ा. मैंने अपने सारे जीवन में जितना अर्थशास्त्र घर में सीखा उसका चौथाई भी महाविद्यालय में नहीं सीख पाया. जबकि मेरे पिता केवल चौथी कक्षा तक ही शिक्षित थे. हमारे घरेलु व्यवसाय या कारोबार किसी चलती फिरती प्रयोगशाला से कम नहीं होते. इससे बच्चे मेहनती भी होते है और श्रम को समाज में प्रतिष्ठा भी मिलती है. बाकी के चार दिनों में बच्चे नयी नयी अभिरूचियों की कक्षाओं में जाकर जीवन के अनेक अंगों को समृद्ध कर सकते है. लुप्त हो चुका भारतीय कला, नृत्य और संगीत का वैभव इस ढंग से फिर से हासील किया जा सकता है. इससे बच्चे स्वस्थ भी होंगे और भावनिक रूप से मजबूत भी. सबसे बढ़ी बात, वे रिश्तों के बीच में रहकर रिश्तें निभाना सीख जाते है. वे छोटे बड़े तनावों से उभरना सीख जाते है.

**उच्च शिक्षा**

वैसे भी देश के महाविद्यालयों में पढाई कम राजनीति ज्यादा होती है, इन्हें एक मार्गदर्शन या सुविधा केंद्र के रूप में तब्दील कर दिया जाए. अधिकतर कोर्सेस की कक्षाएँ प्रातःकालीन या सांध्यकालीन हो. शिक्षक, शिक्षक कम सलाहकार ज्यादा हो. नयी तकनीकि और कंम्पयूटर क्रांति के इस जमाने में सारा ज्ञान आप माऊस की एक क्लिक पर घर बैठे हासील कर सकते है. महाविद्यालय और शिक्षकों का काम बस वह ज्ञान एक विशिष्ट वेब पेज पर उपलब्ध करा देना हो, जिसे विद्यार्थी जब चाहे कभी भी पहुँचकर हासील कर ले. क्लासरूम शिक्षा जैसी कोई चीज वैसे भी बची नहीं है, बस अब उसका अधिकृत अंतिम संस्कार कर दिया जाये. इस एक कदम से हमारे युवाओं का शोषण रोका जा सकता है. देश के सारे दवाखाने, न्यायालय, शापिंग माल्स, नाट्यग्रह और ऐसे अनेक क्षेत्र ज्ञानदान के प्रायोगिक क्षेत्र होते ही है. जिसकी जिस क्षेत्र में दिलचस्पी हो, उस क्षेत्र में प्रविष्ठ होने की उसे छूट मिले. उसे जो भी डिग्री आप देना चाहते है उसके वास्तविक कार्य के स्तर को ध्यान में रखकर दें. एक वकील ए क्वालिटी का वकील है या बी क्वालिटी का, इसका फैसला न्यायालय में होने दे, लॉ कॉलेज में नहीं. वह कितना महान डॉक्टर है, इसका भी फैसला दवाखानों में उसके करतब से जोड़िये, उसकी डिग्री से नहीं. मेरिट के किसी भी नंबर का तब तक कोई महत्व ना हो जब तक वास्तविक कार्य पेश ना हुआ हो.

ऐसे दौर में जब विज्ञान के चमत्कारों ने इंसान की आयु को बेहद बढ़ा दिया है, परिवार संस्था की कभी नहीं थी इतनी जरूरत भविष्य में पड़ने वाली है. धीमे धीमे देश में जवान लोगों की संख्या कम और वरिष्ठों की बढ़ने वाली है. यदि आज हमने शिक्षा नीति में इस मानवीय आपदा को विचारणीय नहीं माना तो हम सभी के जीवन में बहुत लंबा चलने वाला एक प्रलयकाल आनेवाला है. हम सभी समृद्धि के शिखर पर होकर भी एक सर्वथा गरीमाहीन अंत की ओर धकेल दिये जायेंगे. ऐसे दौर में हमारे पारिवारिक मूल्य ही हमारा सबसे सुरक्षित बीमा है.

हमारे बच्चे हमारे सपने है. वे ब्रम्हांड के चमकते नक्षत्र या सितारे बने इसके लिये आजाद भारत के इतिहास की सबसे बड़ी शिक्षा क्रांति की आज देश को जरूरत है. हमारे बच्चों को आज ऐसी शिक्षा की जरूरत है, जो भारतीय जीवन के अनेकानेक अंगों में नया रक्तसंचार कर सके, जो उन्हें रिश्तों के ताने बाने बुनने और उन्हें संभालने का सामर्थ्य दें, न कि उनसे बचने के रास्ते सुझाए. जो उनके मस्तिष्क को नये नये सपनों और विज्ञान कल्पनाओं का जन्मस्थान बना दे, जो उन्हें संवेदनशील बनाए और इस विश्व में जहाँ कहीं भी जो जो उत्तम, उदात्त, महान और मधुरतम है, उसे पाने की लालसा और पात्रता प्रदान करें. जो शिक्षा उनकी आँखों में केवल और केवल सत्य की खोज की जुनून पैदा कर दे. जो उनकी प्रतिभा को सभी प्रकार की गुलामियों और रूग्ण धारणाओं से मुक्त कर उनके कानों में स्वतंत्रता का जयघोष नाद कर दे.

**- ॲड. दिनेश शर्मा**
पुलगाँव, जि. वर्धा महाराष्ट्र.
मो. ९३२६८४१९२४
dgsharma07@gmail.com

■■

# आर्थिक एकाधिकारशाहीच्या गर्भाशयातच माफियाराजची निर्मिती

-ॲड. सुभाष खंडागळे

प्रमुख विरोधी पक्ष भाजपने 'माफिया राज' हटाव हा नारा देऊन कार्यक्रम जाहीर केला. माफिया राजची निर्मिती झालीच कशी? त्याचे मूळ काय? त्यावर उपाय काय? या बाबत कार्यक्रमात काही स्पष्ट होत नाही. माफिया राजसाठी उभी केलेली संरचना, त्याचे स्वरूप, त्यातील घटक, त्या संरचनेचे अधिकार काय आहेत? अशा संरचनेचे (व्यवस्थेचे) नागरिकांच्या मूलभूत हक्काशी काय नाते आहेत. माफिया राजची प्रकरणे आर्थिक व्यवहाराशी निगडित आहेत. त्यामुळे माफियांची निर्मिती आणि त्यातल्या त्यात आर्थिक स्वातंत्र्याशी असलेला सबंध कसा आहे? देशातील मूळ व्यवसाय शेती आणि आर्थिक स्वतंत्र्य इत्यादींचा भाजपच्या कार्यक्रमातून काहीच स्पष्ट होत नाही.

**भूखंड माफिया**

इंग्रज राजवटीत लष्करी तळ, रस्ते, लोहमार्ग, सरकारी नोकरासाठी घरे इत्यादीसाठी जमिनीची गरज होती. त्यासाठी भूअर्जन कायदा इंग्रजांनी बनविला. देश स्वतंत्र झाल्यानंतर त्या कायद्याची व्यापकता वाढवून सरकारी कारखाने, सहकारी संस्था, खासगी कारखाने काढण्यासाठी याचा वापर सर्रास सुरू झाला. या कायद्याच्या अंमलबजावणीची व्यापकता वाढविण्याठी सीलिंग कायद्या बनविला. देशातील महानगरे, मध्यम शहरे, लहान शहरे येथे भूखंड माफियांचा सुळसुळाट झाला. इंदिरा गांधींच्या काळामध्ये महानगरासाठी नागरी कमाल जमीन धारणा कायदा अमलात आणला होता. समाजवादी धोरणानुसार जमीन मालकीवर निर्बंध घालण्यात आले. कमाल मर्यादेपेक्षा जास्त जमीन आढळल्यास सरकार सर्वसामान्यांसाठी घरे बांधण्यासाठी जमीन संपादित करेल असे कायद्यात अपेक्षित होते. या कायद्यानुसार देशभर महानगरातील शेतमालकाच्या जमिनी ताब्यात घेतल्या. सर्व सामान्यांसाठी घरे किती बांधली हा संशोधनाचा विषय आहे. पुढे याच जमिनी सरकारने बिल्डर्सना मातीमोल किमतीत दिल्या. येथेच बिल्डर्स, सरकारी अधिकारी व राजकारणी यांची युती झाली. यातून पुढे भूखंड घोटाळ्यांची मालिकाच तयार झाली. आदर्श घोटाळा हे एक त्यातलेच उदाहरण आहे. पुढे तर बिल्डर्स स्वत:च राजकारणात उतरले. वरवर बघता नागरी कमाल जमीन धारणा कायद्यामध्ये वाईट असे काहीच भासत नव्हते. सर्वसामान्यांसाठी हा कायदा आहे असे म्हणून त्या काळात इंदिरा गांधी देवी वाटू लागल्या; पण इंदिरा गांधींची खरी मेख ही वेगळीच होती. त्याचा अनुभव कायद्याची अंमलबजावणी करण्यामध्ये दिसून आला. जमिनी ताब्यात घेतल्यानंतर सरकार जमिनीचे मालक झाले. कुणाची जमीन घ्यायची, कुणाचा अपवाद करायचा, त्या जमिनीचा वापर काय करावयाचा, त्या कुणाला द्यावयाचा याचे विशेषाधिकार त्या खात्याच्या मंत्र्याला आणि मुख्यमंत्र्याला देण्यात आले. त्यामुळे त्या कायद्याचा धाक दाखवून भलत्याच सवलती आणि फायदे मिळविण्याचा सपाटा राजकारणी आणि सरकारी अधिकाऱ्यांनी लावला मोठ्या प्रमाणावर घरे निर्माण होणे तर दूरच, उलट जमिनीची कृत्रिम टंचाई निर्माण करून घरांच्या किमती गगनाला भिडल्या. जवळजवळ देशातील सर्वच शहरात अशीच परिस्थिती आहे आणि विशेष म्हणजे सर्वच अधिकृत मान्यता प्राप्त राजकीय पुढाऱ्यांचे यामध्ये हितसबंध गुंतलेले आहे. राज ठाकरेंचा मनसेचा पायाच यावर उभा आहे, असे भूखंड माफिया युतीच्या राजवटीतसुध्दा होते.

दुसरा प्रकार म्हणजे सार्वजनिक कामासाठी किंवा उद्योगधंद्याला चालना मिळावी म्हणून जमीन मिळविण्याची आवश्यकता भासते. अशा वेळी सरकारने देशभर जमिनी संपादन केल्या. सरकार जमिनीचे मालक झाले. शहराभोवती औद्योगिक वसाहती (एमआयडीसी) उभ्या केल्या. त्यावर थोडेच प्रकल्प चालू आहेत. बहुतेक प्रकल्प बंद पडले. त्या प्रकल्पाच्या जमिनी परत सरकारने ताब्यात घेण्याचा सपाटा सुरू केला. त्या परत घेतलेल्या जमिनी पुन्हा बिल्डर्सच्या घशात दिल्या. या व्यवहारात करोडो रुपयांचा अंधारातील व्यवहार बिल्डर्स, राजकारणी, सरकारी अधिकारी यांच्यामध्ये झाला. अशा घटना देशभरातील शहरामध्ये झाला. श्रीमती सोनीया गांधींचे जावई रॉबर्ट वधेरा यांनी अशा जमिनीच्या व्यवहारात बरीच गुंतवणूक केली आहे. त्यांची एका मोठ्या उद्योग समूहात भागीदारी आहे. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री श्रीमती मायावती यांचीसुध्दा अशीच दुकानदारी चालू आहे.

तिसरा प्रकार म्हणजे ज्यांच्या खासगी जमिनी आहेत त्या शेतजमिनीचे बिगर शेतीत रूपांतर करताना कोणता भाग ग्रीन झोनमध्ये ठेवायचा, किती ठेवायचा, त्यामध्ये किती जमीन सार्वजनिक कामासाठी सोडायची याचे विशेषाधिकार त्या खात्याच्या मंत्र्यांना व मुख्यमंत्र्यांना आहेत. यामध्ये दरवर्षी कोटी रुपयांचा व्यवहार हा सरकारी अधिकारी, राजकीय पुढारी व बिल्डर्स यामध्ये गुपचूप अंधारात होते. याबाबतचे महसूल कायदे व नियम यामध्ये पारदर्शकता व नियामक रचना असे काहीच नाही.

असे का घडले? मालमत्ता बाळगणे हा नागरिकांचा मूलभूत हक्क मूळ संविधानात होता. १८ जून १९५१ ला पहिली घटना दुरुस्ती करून हा मूलभूत हक्कच काढून टाकला. सिलींग कायदा, भूअर्जन कायदा, महसूल कायद्यामधील काही तरतुदी हे सर्व कायदे नागरिकांचा मूलभूत हक्क काढून घेणारे कायदे आहेत. हे कायदे करून सरकारच जमिनीचे मालक झाले. या कायद्याची अंमलबजावणी करणारी सरकारी नोकरशाहीची यंत्रणा आणि मंत्र्यांना हस्तक्षेप करण्याचे विशेषाधिकार यामुळे भूखंड माफिया तयार झाले. शेतकऱ्यांचा मालमत्ता बाळगण्याचा अधिकार काढून घेण्याच्या घटना दुरुस्तीला सर्वोच्च न्यायालयाने २४ एप्रिल १९७३ला केशवानंद भारती खटल्यामध्ये मान्यता दिली नसती तर माफियाराजची निर्मिती झाली नसती. नागरिकाला मालमत्ता बाळगण्याचा हक्क काढून घेणे हे मूळ भूखंड माफिया निर्मितीचे आहे. भाजप, सेना, मनसे, मायावतीचा पक्ष नागरिकांचा मालमत्ता बाळगण्याचा मुलभूत हक्क यासाठी काही करतील असे काही दिसत नाही. भ्रष्टाचार निमूर्लन मोहिमेचे अण्णा हजारे यांनी नागरिकांच्या मालमत्ता बाळगण्याचा मूलभूत हक्काबद्दल कधी उपोषणाला बसले असे कधी ऐकले नाही. यात बळी मात्र शेतकऱ्याचा गेला.

**खत माफिया**

देशातील खत कारखाने हे पूर्णपणे केंद्रसरकारच्या रसायन व खत मंत्रालय यांच्या नियंत्रणाखाली आहेत. केंद्र सरकारला हा अधिकार जीवनाश्यक वस्तूंचा कायदा-१९५६ च्या कलम ३ नुसार प्राप्त झाला. त्यामुळे कारखान्याची जागा, लागणारी साधनसामग्री, तंत्रज्ञान, जुळवाजुळवी हे सर्व नियंत्रण मंत्रालयाचे असते. त्यामुळे कारखान्याला मंजुरात मिळविणे राजकीय उच्च पदावरील पुढऱ्यांचा एक चांगला खेळ खेळण्याचा आवडता छंद आहे. त्यासाठी कारखानदाराला करोडो रुपयांच्या पाण्याने राजकीय उच्चपदस्थ पुढाऱ्यांचे हात ओले करावे लागतात. त्यातल्या त्यात जगामध्ये नवीन तंत्रज्ञान आले असेल तर त्यानुरुप मशीनची रचना करण्याचे तंत्रज्ञान स्वीकारणे आदीसाठी परवानगी काढावी लागते. त्यासाठी पुढाऱ्यांचे हात ओले करावे लागतात. कारखानदार मग

हा सर्व खर्च भरून काढण्यासाठी खत उत्पादनखर्च अव्वाच्या सव्वा दाखवतात. असे दाखवून निदान २० टक्के नफा दाखवतात. कारखानदार आपला कारखाना तोट्यात कधीच चालवत नाही. कारण तो उद्योग आहे. युरिया, स्फुरदयुक्त खत, पॉलॉशयुक्त खत असे प्रकार आहेत. खतांचा पिकांच्या पोषणानुसार कोणते खत कसे वापरावे हे शेतकऱ्यांना अनुभवाने चांगले माहिती आहे. असे असताना युरियाची गरज किती लागेल, स्फुरदयुक्त तथा पालाशयुक्त खताची गरज किती हे सर्व ठरवाठरव मंत्रालयातील अधिकारी व बाबू ठरवितात.

त्यानंतर खताच्या वितरणावर व म्हणजे बाजारपेठेवर राज्याच्या कृषी खात्याचे नियंत्रण असते. खते, कीटकनाशके शेतकऱ्यांना कर्ज घेण्यासाठी काय काय करावे लागते यांची एक स्वतंत्र कादंबरी होईल. मंजूर झालेले कर्ज नगदी स्वरूपात न देता शेतकऱ्यांना कार्ड दिली जातात. जे कार्डधारक असतात त्यांना स्वस्त दरात खते दिली जातात. बऱ्याच वेळा ज्या खताची आवश्यकता नसते असे बरेच शेतकरी ते कार्ड थोडे पैसे घेऊन दुसऱ्याला देऊन टाकतात. त्या कार्डावर खत घेऊन व्यापार करणारे खत माफिया गावोगावी तयार होतात. पुसद तालुक्यात आदिवासी शेतकरी सह. सोसायट्या आहे. यातील ६० ते ७० टक्के शेतकरी शेतीच करीत नाही. त्यांना अनुदानाच्या रुपात खत वाटप केले जाते. ज्यांना कार्ड आहेत; पण शेती करत नाही, अशा शेतकऱ्यांकडून कार्ड घेऊन तालुक्यातील राजकीय पुढारी ते अनुदानाचे खत स्वतःच हडप करतात.

दुसरा प्रकार म्हणजे खताच्या बाजारपेठेवर सरकारच्या कृषी खात्याचे नियंत्रण असते. भाव निश्चित केलेले असतात. बाजारपेठेच्या हस्तक्षेपामुळे खताची कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते. अशा वेळी निश्चित केलेल्या किमतीपेक्षा अवाच्या सव्वा भावाने गरजू शेतकऱ्यांना खते घेण्यास भाग पडते. कृत्रिम खताच्या टंचाईचा खेळ हा दरवर्षी चालू असतो. त्यासाठी आंदोलने होतात. या बाबत गमतीचा भाग म्हणजे खताच्या नावाखाली जी काही सबसिडी असते ती सर्व खत कारखानदाराला दिली जाते. खताचे उत्पादन व खताची बाजारपेठ यामध्ये कारखानदार आणि व्यापारी यांचा भरमसाट फायदा होतो. बळी गेला तो शेतकरी. खताच्या या व्यवहारांत गावापासून ते वरपर्यंत असे खत माफिया तयार झाले आहेत. याचे मूळ काय? शेतीला ज्या ज्या निविष्ठा लागतात त्या निविष्ठा उत्पादकाला उत्पादन कोठे काढावे, किती काढावे, केव्हा काढावे, किती साठवून ठेवावे, केव्हा व कोठे विकावे, किती किमतीत विकावे असे स्वातंत्र्य नाही. या उद्योगात स्पर्धा नाही. हा खताचा उद्योग व त्याची बाजारपेठ यावर सरकारची एकाधिकारशाही आहे. ही एकाधिकारशाही ही आर्थिक स्वातंत्र्य काढून घेणारी आहे. खताच्या समस्याचे मूळ हे आहे. जिवनावश्यक वस्तूचा कायदा - १९५६ आणि औद्योगिक विकास नियंत्रण कायदा-१९५१ या दोन कायद्यांच्या आधारे संरचना उभी केली ती व्यवस्था हे समस्याचे मूळ आहे. हे कायदे काळे कायदे आहेत व आर्थिक स्वातंत्र्य काढूण घेणारे आहेत.

**रेशनमाफिया आणि इंधन तेल माफिया**

सार्वजनिक वितरण व्यवस्था हा केंद्र आणि राज्य सरकारांचा सामाईक विषय आहे. दोन्हीकडील सरकारी यंत्रणेतील सरकारी नोकरशाही, नागरी पुरवठा विभाग मंत्रालय, जिल्ह्यातील पुरवठा निरीक्षक, अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयाचा नागरी पुरवठा विभाग, विभागीय आयुक्त, मंत्रालपर्यंतचे विविध घटक, मंत्र्यापर्यंतचे लोकप्रतिनिधी ही सर्व फौज त्यानंतर सरकारने नियुक्त केलेल्या राज्य दक्षता समिती, विभागीय दक्षता समित्या, जिल्हा दक्षता समित्या, नगर दक्षता समित्या, ग्राम दक्षता समित्या ही दुसरी फौज या दक्षता समित्यांमधील सदस्यांची निवड सत्ताधारी पक्षाच्या शिफारशीवरून केली जाते. या नियुक्त्या काही फुकटची समाजसेवा करण्यासाठी केल्या जात नाही. तर पक्षाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना उत्पन्न मिळविण्यासाठी सोय म्हणून केली जाते. खुल्या बाजारातील अन्नधान्याचे आणि रेशनवर मिळणाऱ्या अन्नधान्याचे भाव यामध्ये बरीच तफावत असते. केंद्रीय पातळीवरून राष्ट्रीय खाद्यान्न मंडळाचे यावर नियंत्रण असते त्यामधील अधिकारी व कर्मचारी यांची फौज या कामाला लावली जाते. खुल्या बाजारात गव्हाचा भाव १५ रु. किलो असेल तर ५ रु. किलो दराने रेशनचा गहू मिळत असेल तर अशा तफावतीमुळेच गोदामातून निघणाऱ्या धान्याला पाय फुटतात. त्यातून पाय फुटतात. या यंत्रणेतील शेवटचा दुवा असतो तो रेशन दुकानदार बोगस रेशनकार्ड बनवून तो आपला कोटा वाढवून घेतो. गोदामातून धान्य बाहेर निघताना या सर्व यंत्रणेतील सर्व व्यक्तिशी सबंध येतो. हे सर्व आपला हात मारून घेतात. म्हणून १०० पोती जर गोदामातून बाहेर निघाले तर त्यातील ६० ते ७० पोती यांची मध्येच गळती होते. त्याचा अंधारातील फायदा हा कारोडो रुपयांचा असतो आणि विशेष म्हणजे वितरणासाठी लागणारा प्रति क्विंटल खर्च हा वेगळाच दर वर्षी अशा रीतीने ही यंत्रणा हजारो कोटी रुपये खाऊन टाकते. विशेष म्हणजे हे सर्व गरिबांच्या कल्याणाच्या नावाने हा व्यवहार चालतो.

इंधन तेलाची गरज ही ८० टक्के आयातीद्वारे भागविली जाते. अनुदानाच्या रुपाने सरकार, सरकारी तेल कंपन्यांना मदत करते. त्यामुळे कमी किमतीत इंधन तेल कंपन्याना शक्य होते. या कंपन्या पेट्रोल व डिझेल पंपांना गरजेप्रमाणे वाटप करते. खाजगी कंपन्यांना सरकारी कंपन्यांशी स्पर्धा करणे शक्य नसते. स्पर्धा नसल्यामुळे या क्षेत्रात सरकारची एकाधिकारशाही तयार झाली आहे. रॉकेल मात्र धान्य वितरण व्यवस्था जी आहे त्याच्यामार्फत वितरीत केले जाते. डिझेलचे भाव रॉकेलचे रेशनिंगद्वारे मिळणारे भाव यामध्ये बरीच तफावत आहे. डिझेलमध्ये रॉकेल मिसळून त्याद्वारे ट्रक, टॅक्सी, ॲटो इत्यादी वाहने सर्रास चालविली जातात. यातूनच रॉकेल माफियाची निर्मिती झाली. यामध्ये सर्वच मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे हितसबंध गुंतलेले आहेत. या माफियांच्या भरवशावर त्यांचा पक्ष चालतो. डिझेलमध्ये इथेनॉल मिसळून वापरण्याची बंदी जर नसती तर आयातीवरील ३० ते ४० टक्के बोजा कमी झाला असता. इथेनॉलच्या निर्मितीला व वापराला खुलेपणा जर ठेवला तर इंधन माफियाचा मृत्यू केव्हाच झाला असता.

आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे नागरिकांचा मालमत्ता मिळविण्याचा हक्क, उत्पादन करण्याचा हक्क, साठवणूक करण्याचा हक्क, मालावर तथा वस्तूवर प्रक्रिया करण्याचा हक्क हे आर्थिक स्वातंत्र्य शेतकी समाजाचे काढून घेतले. त्यामुळे शेतीला लागणाऱ्या निविष्ठा व शेतीवून तयार होणारा माल यावर सरकारची एकाधिकारशाही आहे. यातूनच माफियाराजची निर्मीती झाली. नेहरू आणि इंदिरा गांधी यांनी शेतकी समाजाचे आर्थिक स्वातंत्र्य काढून घेणारे काळे कायदे घटना दुरूस्त्या करून केले व भ्रष्ट राज्य कारभाराची इमारत उभी केली ही चौकट मोडून काढण्याची संधी विरोधी पक्षांना मिळाली होती; पण त्यांनी काहीच केले नाही. उलट त्यांनासुध्दा भ्रष्ट राज्यकारभाराच्या लाभाची चटक लागली. माफियाराज हटविण्यासाठी ही चौकटच मोडून टाकावी लागेल. मुळावर घाव घालण्याचे काम शेतकरी संघटना करीत आहे हीच लोकशाहीची आस असणाऱ्यांसाठी एक आशा शिल्लक आहे. आर्थिक स्वातंत्र्य काढून घेणारे काळे कायदे (परिशिष्ट - ९ मधील कायदे) यावर आधारलेल्या चौकटीचे काय? असा सवाल जनता राजकीय पक्षांना विचारल्याशिवाय राहणार नाही.

स्वच्छ चारित्र्य ठेवावे, प्रामाणिक असावे, दारू पिणारा नसावा, चांगली आणि सज्जन माणसे राजकारणात यावी, अशी गांधीछाप तुतारी वाजवूण माफिया राज हटणार नाही.

**ॲड. सुभाष खंडागळे**

नवचंडिका ॲटोमोबाईल्स, श्रीरामपूर, पुसदर-४४५२१५,

जि. यवतमाळ. मो. ९८५००१४०३९

adv.khandagale@gmail.com

■■

# मध्यस्थ महत्त्वाख्यान



**शे.भ.प.** (शेती भक्त परायण)
**-'थंडा' महाराज देगलूरकर**

**नारदांना आपल्या केवळ इन्फॉर्मेशन अव्हेलिबिलीटीचा विषाद वाटला त्यांनी मनाशीच विचार केला, की केवळ हे असून चालणार नाही तर बेनेफिशिअल इन्फॉर्मेशन अव्हेलिबिलीटी माहिती असणे गरजेचे आहे. या बीआयएमधून त्यांना मग हवी तशी बातमी खेळवता येणे शक्य होणार होते. हे घडण्यासाठी त्यांनाही एखादी आंतरराष्ट्रीय वाहिनीची मालकी प्राप्त करणे गरजेचे होते. त्यासाठी त्यांना हवी होती एखादी मीडिया मेडिएटर. या मीडिया मेडिएटरची गरज वाटण्याची निकड त्यांना वाटली कारण सद्यसमयी संपूर्ण मानवजात देह सोन्याचा अन् कर्ण कथलाचा हे रूप घेऊन वावरत असून उद्याच्या काल्पनिक कीर्तीने आजच जे काही खायला मिळेल ते खात आहे ज्याला पाहून वराहाची घाण खाण्याची सवयसुद्धा फिकी पडेल.**

**बुद्धीने ज्ञानाने, नियमांनी**
**शक्य होय न नीतिने ।**
**ऐसे कर्तृत्व माझे,**
**सर्व शक्य करी दामाने।।**

कलियुगाच्या मध्यम चरणी एके दिवशी नारदमुनी सत्यलोकात गेले. नारद हे महान मीडियाकिंग होते. सृष्टीचे फाऊंडर मेंबर तथा प्रमोटर अँड बिल्डर ब्रह्मदेव हे त्यांचे पिताश्री असल्याने ते तिन्ही लोकांना आपलीच प्रॉपर्टी समजत आणि घराणेशाहीची सुरुवात स्वतःपासून झाली हे डिक्लेअर करत. ब्रह्मदेवाचे जे दोन पार्टनर होते त्यात लॉर्ड विष्णू आणि लॉर्ड शंकरा हेसुद्धा होते. या तिन्ही ओनर्सनी या सृष्टीवर आपला माग सिक्वेन्शिअल राईट ठेवून दिला होता. या सिक्वेन्शिअल मालकी हक्कांमध्ये सृष्टीची मालकी लॉर्ड ब्रह्मदेवाकडे तर तिच्या सुस्थितीची मालकी लॉर्ड विष्णूकडे होती. या सुस्थितीकरणाच्या कार्यामध्ये वसुंधरेवरील अराजकामध्ये एखादेवेळी अवतार वगैरे घेऊन टाकण्याचे फुटकळ कर्मही त्यांना करावे लागे. लॉर्ड शंकरा मात्र आपल्या वातानुकूलित माऊंट हाऊसमध्ये आराम करत बसत. कोणत्याही फायनान्शिअल वर्षात ते फक्त श्रावण नामक महिन्यात आपले शक्तिप्रदर्शन करत. भक्त मेळावे घेत आणि पुन्हा आपल्या 'कैलास' या माऊंट हाऊसमध्ये जाऊन एखादेवेळी फारच अतिक्रमण झाले तर जागे होत असत.

त्या दिवशी नारद फारच रागात होते. रागारागात ते आपल्या वडिलांच्या बन बेडरूम फ्लॅटजवळ पोचले तेव्हा त्यांना सिक्युरिटीने अडवले आणि विचारले, 'अ‍ॅपॉईंटमेंट घेतली आहे काय?'

नारद म्हणाले, 'वडिलांच्या भेटीसाठी कधी अ‍ॅपॉईंटमेंट लागते काय?'

'तसे नाही, पण आता आपल्या डॅडीश्रींनी पीए नेमला आहे. त्यांनी आम्हाला नेमले आहे. त्यांच्या आदेशानुसार विदाऊट प्रॉयर अ‍ॅपॉईंटमेंट नो वन शुड ट्राय टू मीट ऑनरेबल (ओन्ली) लॉर्ड देवा!'

नारद चरफडले. अश्वमुख असलेल्या व्यक्तिगत सहायकाकडे अर्थात पीएकडे गेले. पीए महोदय राखीवातील राखीव हसले. म्हणाले, 'वेलकम सर, गो इनसाईड. अ‍ॅज यू आर लॉर्डस् सन. सॉरी फॉर ट्रबल, बट धीस इज न्यू सिस्टिम अ‍ॅडॉप्टेड फ्रॉम नेचर्स वन पार्ट दॅट इज अर्थ.'

नारदमुनींनी आपली वीणा बाजूला रागारागात ठेवली. त्या वीणेकडे पाहिले तर ती त्यांना सॅक्सोफोनसारखी दिसली. कसाबसा त्यांनी आपल्याला आलेला राग आवरला आणि त्या पीएला विचारले, 'ही सिस्टिम कोणती? याची काय गरज आहे?'

नारदाच्या या प्रश्नावर ब्रह्मदेवाच्या पीएने जे उत्तर दिले ते सविस्तर देण्याआधी थंडा महाराजांचा एक अभंग ऐकावा-

**थंडा म्हणे अवघा जिंकावा संसार**
**मध्यस्थ साचार साहेबांचा ।।**

ब्रह्मदेवालाही आपल्यासाठी पीए का नेमावा लागला त्या मागे कारणीभूत होते ते विकृतीनाम सवंत्सर! या संवत्सरात घडले असे, की ब्रह्मदेवनिर्मित असलेली जी मानवजात होती त्या मानवजातीला जनलज्जा, स्वप्रतारणा, विषाणूभय, मृत्युसंकेत, पत्नीनिष्ठा, पुत्रोन्नती, परिसर प्रगती या साऱ्या घाणेरड्या दुर्गुणातून मुक्ती मिळाली होती. याच संवत्सरात अतिबुद्धिमंतांची बुद्धी स्वतःच्या व्यक्तिगत सहायकाच्या सल्ल्यावर गहाण राहिलेली त्यांनी पाहिलेली होती आणि त्या संवत्सराअंती त्यांना जो फटका ऐकायला मिळाला होता, त्यातले बोल त्यांना मान्य झाले होते. त्या फटक्यातले बोल होते-

**चिटकवाट वहिवाट असावी,**
**पोपटमार्गा सोडू नको**
**नोटांभोवती ऐस आपला,**
**उगाच सज्जन राहू नको**

संपूर्ण मानवजात या कागदरूपी चलनाभोवती व्याकूळ पाहून त्यांनी त्या चलनातले मर्म शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांच्या लक्षात आले, की सर्व वैषयिक सुखांना कारक असे हे चलन असून या सुखकारक साधनासाठी केवळ मध्यस्थ ही जातच कामाची आहे. या जातीचा फायदा घेतला, की सुखोपभोग घेता येतात आणि

म्हणता येते, की 'सर्व समयी स्वस्थ बसावे, मध्यस्थाचेच ऐकत जावे.' हा मध्यस्थ म्हणजे चालता फिरता देवावतार असतो जो प्रसन्न झाला, की देणाऱ्याचे घेऊन ठेवतो आणि घेणाऱ्याची अतिउचित सोय पाहतो. मध्यस्थाचा हा फायदा देवांना जेव्हा कळाला तेव्हा त्यांना खंत वाटली ती मराठी माणसांच्या विचारपद्धतीची. ज्या विचारपद्धतीत भडवेगिरी, दलाली या शब्दांना त्यांनी आडत रूप दिलेले होते आणि मध्यस्थांना हेटाळणीने तुच्छ लेखले होते. ब्रह्मदेवांनी जेव्हा सृष्टी निर्मितीपासूनचा डाटा तपासून पाहिला तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले, की संपूर्ण मानवजातीला मध्यस्थिचे इतके वेड असते, की जीवापाड वाढवलेल्या लेकीसाठीचे स्थळसुद्धा कोणातरी मध्यस्थानेच सुचवलेले असले तर पोरीचे बाप त्या स्थळाला मान्य करतात. एवढेच काय तर पुढे स्वपत्नीशी चर्चा करायलासुद्धा एखादा मध्यस्थ लागण्याची शक्यता त्यांना त्यांच्या दिव्यदृष्टीसमोर जेव्हा दिसली तेव्हा ते स्वतःच धन्य होऊन गेले. मध्यस्थाची उपयुक्तता तपासताना त्यांना हेसुद्धा आढळले, की एखाद्याने परपत्नीशी परस्पर उचित कर्म केले अणि त्या उचित कर्माची परिणती तर कर्मफलात झाली तर ही मध्यस्थ मंडळी त्या कर्मास 'हे माझेच कर्म' असे म्हणणे न्यायव्यवस्थेसमोर मान्य करून टाकतात. ब्रह्मदेवाला तेव्हा कोठे त्या म्हणीचा अर्थ कळला ज्यात असे म्हटल्या गेले होते की,

**दुसऱ्याचा असावा खांदा**
**तिसऱ्याने करावा वांधा**
**चौथ्याने धरावा नेम**
**पाचव्याने वाजवावा गेम**
**फोटोला मात्र राहावे तयार**
**आपण आपुले !!**

हे फक्त करायचे असते म्हणे जेव्हा या छायाचित्रातून एखाद्याची सुसंस्कृत, सुजाण, सुविद्य, सदाचारी अशी छबी निघणार असेल तर! दुहेरी जगण्याचा हा फायदा केवळ मध्यस्थानेच होत असल्याने अशा दुहेरी व्यक्तिमत्त्वाला सर्वांनाच फसवण्याची कला येते. यात असा व्यक्ती म्हणे आपल्या पत्नीसमोर मर्यादा भार्योत्तमाचे सोंग आणतो तर अशी भार्या अतिमर्यादा पतीउत्तमा असते. हे सारे पाहून देवाधिपतींना हर्ष वाटला तो कल्पनातीत होता. सृष्टीकर्त्याने विचार असा केला, की समाज चालतो तो सामान्य आणि अतिसामान्य या घटकांवर. यांच्यावर नियंत्रण असते ते असामान्यांचे. साऱ्या असामान्यांना जेव्हा विकृतीचे सुंदर सादरीकरण आवडते तेव्हा तेव्हा त्या सादरीकरणाची सोय एखाद्या मध्यस्थानेच केलेली असते. खरा मध्यस्थ हा आडवी सोय, उभी सोय, तिरपी सोय करण्यात एक्स्पर्ट असावा एवढेच काय ते पथ्य असते. मध्यस्थाकडून होणारे फायदे जसजसे ब्रह्मदेवाना आकलन होत गेले तेव्हा ते तडक शेषशायी देवराजाकडे पोचले आणि म्हणाले, की आपण आम्हाला आमच्यासाठी एखाद्या मध्यस्थ पाहून द्यावा. देवराज हसले आणि म्हणाले, 'वटपौर्णिमेऐवजी रबरपौर्णिमा पाळली जाण्याचा येणारा काळ आहे. वटवृक्षाच्या पारंब्यांऐवजी आता वंशसातत्य वा वंशखंडन मानवाच्या हाती गेले आहे. प्रतिसृष्टी महाराष्ट्रात झाली आहे तर अंतराळ दाक्षिणात्यांनी विकलं आहे. पाताळात कर्नाटकी उत्खनन चालू आहे, वायूच्या चौकटी येतच आहे तर जळाला प्लॅस्टिकबंद केलेलं आहे, आता तुमची आमची गरजच काय आहे? कशाला मग पीए हवा. पीए लागतो केव्हा तर जेव्हा व्यक्तीला देवरूप येते तेव्हा. आपल्याला मात्र आता आधी मानवरूप घ्यावे लागेल. आपली उपयुक्तता आणि उपद्रवता आधी सिद्ध करावी लागेल. मग कोठे आपल्या रुटलेवलच्या ग्रामपंचायतीत स्थान मिळेल. तिथे ग्रामविकासाच्या सर्व योजना प्राप्त करून देणारा मध्यस्थ म्हणून गावचा दलाल हे नाव तालुक्यात प्राप्त करावे लागेल. ती पातळी ओलांडली, की जिल्हा, राज्य, देश मग आंतरराष्ट्रीय नामवंत कॅरी अँड फॉरवर्ड एजन्ट व्हावे लागेल. यासाठी हसन अली, चंद्रास्वामी, खशोगी, रासपुतीन, रेड्डी बंधू, हवाला, श्रीजी हे सुकर्म करणारे जे सारे महाभाग आहेत त्यांच्या बुद्धीचा अभ्यास करावा लागेल, यात फार वेळ जाईल तेव्हा आपल्याकडे जो घर का भेदी म्हणून प्रसिद्ध असा आत्मा आहे, ज्याने तत्कालिन वर्तमानात चांगले काही करावे म्हणून भावाचेच रहस्य ओपन केले ज्यातून भविष्य चांगले होईल ही त्याला अपेक्षा होती त्या बिभीषणाला स्वीस बँकेच्या अध्यक्षाच्या मेंदूत सोडणे योग्य ठरेल. तरीही तुम्हाला मी एक पीए नामक मध्यस्थ अ‍ॅलॉट करतोय. नारदमुनींनी ब्रह्मदेवाचे मनोगत त्यांच्या मध्यस्थाच्या मुखातून ऐकले आणि ते धन्य झाले. मध्यस्थाची एवढी उपयुक्तता पाहून त्यांना स्वतःची लाज वाटली. कारण त्यांना असे वाटे, की त्रैलोक्यवार्ता देणारी वृत्तदेवता त्यांनाच प्रसन्न आहे. खरे तर ते रोजच तिन्हीत्रिकाळ म्हणत असत, की देवी त्रैलोकवार्ता कथये कथये स्वाहाः! नारदांना आपल्या केवळ इन्फॉर्मेशन अव्हेलिबिलीटीचा विषाद वाटला त्यांनी मनाशीच विचार केला, की केवळ हे असून चालणार नाही तर बेनेफिशिअल इन्फॉर्मेशन अव्हेलिबिलीटी माहिती असणे गरजेचे आहे. या बीआयएमधून त्यांना मग हवी तशी बातमी खेळवता येणे शक्य होणार होते. हे घडण्यासाठी त्यांनाही एखादी आंतरराष्ट्रीय वाहिनीची मालकी प्राप्त करणे गरजेचे होते. त्यासाठी त्यांना हवी होती एखादी मीडिया मेडिएटर. या मीडिया मेडिएटरची गरज वाटण्याची निकड त्यांना वाटली कारण सद्यसमयी संपूर्ण मानवजात देह सोन्याचा अन् कर्ण कथलाचा हे रूप घेऊन वावरत असून उद्याच्या काल्पनिक कीर्तीने आजच जे काही खायला मिळेल ते खात आहे ज्याला पाहून वराहाची घाण खाण्याची सवयसुद्धा फिकी पडेल. नारदमुनींनाही जेव्हा हे दिव्य ज्ञान प्राप्त झाले तेव्हा ती तिथी शुक्ल पक्षाच्या फाल्गुन मासातल्या अमावस्येची होती आणि वर्षअखेरच्या या लोभत्वशा तिथीला नारदांनी जो अभंग म्हणून मध्यस्थ महत्त्व स्वहस्ते लिहून ठेवले ते येणेप्रमाणे :

**येत नसेल काही तेव्हा फुका सोंग घ्यावे ।**
**जे म्हणणे श्रेष्ठांचे तेच खरे म्हणावे... ।।**
**प्रथम मागावा तुकडा मग ओरपावी भाकर ।**
**जो असतो मालक त्यालाच करावे चाकर ।।**
**करूनी लफडे मोठे, विकून टाकावी भूमी ।**
**छाया करावी विशाल म्हणजे नसते काही कमी ।।**
**असे जगूनी रोज जाळावे या सृष्टीला ।**
**जगावा कुणी माघारी हे स्वप्न हवे कशाला? ।।**

**- शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**
**मु. पो.** thandamaharaj@gmail.com

■■

# महागाई आणि महागाई भत्ता

ॲड. कांचन कोतवाल

''अहो ऐकलंत काय? केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना सहा टक्के महागाई भत्ता वाढवून मिळालाय...''

''मग आमचं राज्य सरकार मागं थोडंच राहील. तेदेखील महागाई भत्त्यात वाढ देतीलच.''

''बाबा... मला वर्ल्ड कप फायनल बघायला मुंबईला जायचंय.'' चिरंजीवांनी संधी साधली.

''अरे पण आत्ताच तर तुला नागपूरच्या मॅचसाठी पैसे दिले होते नां... विचार आजोबांना ... आमच्या काळात असले महागडे शौक कोणी करत नव्हते.''

''बाबा, अहो आजोबांना कशाला मध्ये घालताय... त्याकाळी एवढाल्ले पगार मिळत नव्हते आणि एवढाल्ले महागाई भत्तेसुद्धा मिळत नव्हते.''

''अरे सहाशेचं तिकीट पाच हजारात विकत घेतलंस तू. रांगेत का राहिला नाहीस?''

''जामठ्याच्या शेतकऱ्याच्या पोरांनी रांगेत उभे राहून तिकीटं काढली कारण त्यांच्या खिशाला परवडत नव्हतं; पण मला मिळाली नाहीत म्हणून मी ब्लॅकमध्ये घेतलं.''

''मग आता वर्ल्ड कप फायनलचं तिकीट कितीमध्ये मिळणार?''

''मी तिकीट मॅनेज केलं आहे. जास्त नाही फक्त दहा हजार लागतील.''

''अरे पण अजून वाढीव माहागाई भत्ता मिळालेला नाही...''

''अहो पोराची हौस आहे.... आणि सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर जे अरिअर्स मिळालेत ते कशासाठी ठेवलेत?'' सौभाग्यवतीने पोराची बाजू लावून धरली.

''बरं बाबा... जाशील तू फायनल बघायला.''

पोरांचा हा संवाद आतल्या खोलीत बसलेले म्हातारे कान ऐकत होते. त्यांच्या डोळ्यात तरळणाऱ्या पाण्यात अनेक प्रश्न गटांगळ्या खाताना दिसत होते.

''सुनबाई... तुझा वाचून झाला असेल तर मला पेपर देतेस काय?''

सुनबाईने म्हाताऱ्याकडे न पाहताच चिरंजीवांच्यामार्फत पेपर त्यांच्याकडे पोचविला. थरथरत्या हातांनी तो पेपर घेतला बातमीवरून नजर फिरविताना विचारचक्र सहज फिरू लागले...

''अरे देशाच्या तिजोरीवर किती भार टाकणार आहात तुम्ही? या महागाई भत्त्यात वाढ झाल्यामुळे वार्षिक पाच हजार सातशे पंधरा कोटी नव्वद लाख रुपये... अरे बापरे... अगोदर ४५ टक्के मिळणारा महागाई भत्ता आता ५१ टक्के मिळणार... अरे बापरे...''

''एकीकडे आपल्या देशातील शेतकरी आत्महत्या करतो आहे. शेतमालाला योग्य भाव मिळत नाही म्हणून रडतोय... तर दुसरीकडे महागाई वाढली अशी ओरड करून महागाई भत्त्यात वाढ करून दिली जात आहे... काहीतरी चुकते आहे... ही म्हातारी कुठे दिसत नाही...? तिच्यासोबत चर्चा करावी असं वाटतं...''

''अगं चलतेस का देवळात...?'' म्हातारी लगेच निघाली. म्हातारीसोबत हळूहळू रस्त्याने जाताना विषय काढला.

''हा महागाई भत्ता वाटते सरकार... पण हा पैसा चैनीसाठी खर्च होताना दिसतो... गरजेसाठी खर्च होताना दिसत नाही...''

''मी म्हणते आपल्याला काय करायचे आहे त्याच्याशी...? शेती विकून पोरांना सरकारी नोकरीत लावले ना...? आता त्यांचा फायदा बघायचा.''

''तसं नाही गं... शेतकरी आत्महत्या करतात योग्य भाव मिळत नाही म्हणून... आणि इकडे हे महागाई भत्ते मिळवितात महागाई वाढली म्हणून...''

''तुमचं शेतकरी प्रेम पुन्हा उफाळून आलं का? अहो विसरा आता... आपण आता शेतकरी नाही. एका सरकारी नोकराचे आईवडील आहोत.''

''तसं नाही पण... काही उपाय करायला...''

''मला सांगा ही महागाई कोण वाढवतंय...? कशी वाढवतय? याचा कोणी विचार करतय का? आधी तो विचार करा आणि मग उपाय शोधा.''

''बापरे म्हणजे तू हा विचार केला आहेस तर...''

म्हातारी थोडी बावचळली; पण लगेच सावरून म्हणाली,

''कैरी आली बघा बाजारात. छान पन्हं करीन आज तुमच्यासाठी.''

''अगं विषयांतर करू नकोस ना...''

''हे बघा, मला यातलं काही कळत नाही; पण तरीही आम्ही बायकादेखील बराच विचार करतो या महागाईबाबत.''

''मग तूच सांग ना कोण वाढवतंय ही महागाई?''

''जाऊ द्या. तुम्ही हसाल माझ्यावर...''

''नाही हसणार... कोण वाढवतय ही महागाई?''

''सरकार वाढवते ही महागाई.''

म्हातारा हसतो. ''बघा हं... मी अगोदरचं सांगितलं होतं तुम्ही हसाल म्हणून.''

''तसं नाही गं अनपेक्षितपणे तू हा बॉंब टाकलास म्हणून थोडा दचकलो... एवढंच. बरं सांग खरंच तुला वाटतय की ही महागाई सरकारच वाढवते आहे?''

''होय. माझं तसं ठाम मत आहे.''

''ठीक आहे कोण वाढवतय ही महागाई याचं उत्तर दिलंस. आता कशी वाढते ही महागाई ते सांग.''

''महागाई भत्ते आणि पगारवाढ देऊन...''

''आता मात्र हद्द झाली.'' हसू आवरत ''अगं, महागाई सहन करण्यासाठी मदत म्हणून भत्ते आणि पगारवाढ केली जाते. महागाई वाढविण्यासाठी नाही. तू म्हणजे अगदी वर्ल्डकपचे चौके आणि छक्के मारते आहेस.''

''तेवढं कळतं हो मला... पण मला सांगा, भाजीत तिखटमीठ टाकल्याने ती चवदार होते म्हणून जर वाजवीपेक्षा अधिक टाकल्या गेलं तर भाजी बिघडते ना...''

''आता तुझी भाजी कुठे आली मध्येच.''

''आम्हा बायकांची मेली भाषाच तशी त्याला कोण काय करणार? डॉक्टरांच्या भाषेत सांगायचे झाले तर, एखादे औषध रोगावर उपाय म्हणून देत असलो तरी त्याच औषधाचा जास्त डोस हे विष ठरते. एका झोपेच्या गोळीने शांत झोप आली म्हणून जास्त खाल्ल्या तर... विषच

होईल ना... अगदी तसंच बरं का...''

''अगं पण औषध म्हणजे...''

''तुम्ही इतर शेतकऱ्यांना सांगायचे ना, की वाजवीपेक्षा जास्त खत जमिनीत टाकल्यानेसुद्धा जमिनीचे नुकसान होते पिकाचे नुकसान होते.''

''ते बरोबर आहे गं... पण महागाई भत्ते आणि पगारवाढ देऊन सरकार महागाई कशी वाढवते ते सांग.''

''सांगते ना... महागाईची झळ सोसता यावी म्हणून हा महागाई भत्ता मिळतो ना... जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी महागाई भत्ता मिळतो ना... पण तो त्या जीवनावश्यक वस्तूंच्या रूपात मिळत नाही. तो मिळतो पैशांच्या रूपात. म्हणजे ज्या कारणासाठी तो मिळाला त्याच कारणासाठी तो वापरला जातो असे नाही.''

''बरोबर बोललीस महागाई भत्ते चैनीसाठी अधिक वापरले जातात.''

''आज मी पेपरमध्ये वाचलं सहा टक्के महागाई भत्ते दिल्याने सरकारचे दरवर्षी पाच हजार सातशे सोळा कोटी रुपये कर्मचारी लोकांकडे अधिकचे येणार. मग ते खुळखुळणार... आणि मग ते पैसे बाजारात येणार... आणि मग... तुमचा नातू जसे ते उडवतो तसे खर्च होणार... आता बाजारात जास्त प्रमाणात पैसे आले तरी महागाई वाढतेच की...''

''बाजारात जास्त पैसे आल्याने महागाई वाढते? कशी वाढते?''

''गिऱ्हाईकांच्या खिशाचा अंदाज घेऊन व्यापारी नफा कमावतात. नदीकाठावरचे पेरूवाले बघा... सायकलवाला गिऱ्हाईक आला तर कमी भाव आणि महागड्या गाडीवाल्या गिऱ्हाईकांसाठी अधिक भाव घेतात ना! अहो, आपल्या कामवाल्या बाईनेसुद्धा पगारवाढ मागून घेतली. म्हणाली, तुम्हाला सहावा वेतन आयोग लागेल तसा आमचा पगार पण वाढवा... अहो आपण मागे नेरूळला आपल्या जावयाकडे गेलो होतो ना तेव्हा तुम्ही मासळी घ्यायला पनवेलच्या बाजारात का गेलात? सांगा...''

''का म्हणजे.... अगं, एक हजार रुपये जोडी पापलेट सिवुडला होता तोच पापलेट पनवेलच्या बाजारात पाचशे रुपये जोडी मिळाला...''

''का? इतका फरक का?''

''अगं, सिवुडला सर्व श्रीमंत लोकांची वस्ती म्हणून तिथला बाजार महाग असतो.''

''म्हणजेच जेव्हा गिऱ्हाईकांच्या खिशात रक्कम जास्त तेव्हा महागाई वाढते... दिवाळीचा बोनस मिळाला, की बाजारात गर्दी होते... एरवी काटकसर करणारा गिऱ्हाईक व्यापाऱ्यासोबत घासघीस न करता खरेदी करताना दिसतो. पगारातून खर्च करताना मात्र काटकसर केली जाते खरं की नाही?''

''बरोबर आहे तुझे. या कर्मचारी लोकांना रग्गड पगार मिळतो तरीदेखील महागाईची ओरड तेच करताना दिसतात.. आणि सर्वसामान्य नागरिकांचे मात्र या महागाईने हाल होतात. गरजेपेक्षा जास्त पैसा हातात आला की चैन सुचते त्यांना... खरंय तुझं.''

''पगारवाढ देऊन सरकार का तिजोरी रिकामी करते मला कळत नाही. अहो, आपल्या देशावर विदेशी कर्ज आहे ना, मग ते फेडायच्या आधी तिजोरी रिकामी करण्याचा उद्योग का केला जातो. आम्हा बायकांना अंथरूण पाहून पाय पसरायला शिकवले जाते. काटकसरीने संसार कसा करायचा ते शिकवले जाते. मग देशाचा संसार चालवणारे असे विचित्रपणे का वागतात मला कळत नाही.''

''अगं आपला देश लोकप्रतिनिधी चालवतात.''

''कोण म्हणतं लोकप्रतिनिधी चालवतात?'' म्हातारीने पुन्हा चौकार हाणला.

''म्हणजे आमदार आहेत, खासदार आहेत, मंत्री आहेत...''

''ते कर्मचारी आहेत... लोकप्रतिनिधी त्यांना म्हणता येणार नाही.''

''अगं तुझ्या म्हटल्याने काही होणार आहे काय? ते लोकप्रतिनिधीच आहेत.''

''मला सांगा त्यांना पगार मिळतो ना?''

''होय पगार मिळतो.... आमदारांना, खासदारांना, मंत्री लोकांना सर्वांना पगार मिळतो. महागाई भत्तादेखील मिळतो. पेंशनदेखील मिळते त्यांना.''

''होय ना... मग मला सांगा ते कर्मचारीच झाले ना? तुम्हाला सांगते, हा कर्मचारी वर्ग आहे ना हा खूप हुशार आहे. त्यांच्या महागाई भत्ते आणि पगारवाढ देण्याच्या विरोधात येणाऱ्या सर्वांना त्यांनी त्यांच्यात सामावून घेतलंय, फितूर केलंय... म्हणजे काय, विरोध होणारच नाही.'' म्हातारीने सिक्सर हाणला.

''अगं काय बोलतेस तू?''

''मी बरोबरच बोलते आहे. अगोदर मिळत होते का त्यांना हे पगार, पेंशन आणि भत्ते? सांगा ना? या लबाड कर्मचाऱ्यांनी हे पगार, पेंशन आणि भत्ते यांचं ताट समोर करून या लोकप्रतिनिधींना आपल्या गटात सामावून घेतलं... आणि मंग काय तुम्हीपण खा आणि आम्हालापण द्या. असंच सगळं सुरू झालंय बघा.''

''आपल्या देशातील न्यायव्यवस्था ही सर्वांत मोठी आहे.''

''न्यायाधीश हेदेखील माणसेच ना? अहो त्यांना देखील वाढवून हवेच आहेत हे पगार, पेंशन आणि भत्ते...'' म्हातारीचा तळतळाट... ''मला मेलीला किती कळतं ठाऊक नाही... पण मला वाटतं जणू ही डाकूंची टोळी आपल्या देशाची तिजोरी राजरोसपणे लुटते आहे आणि जनता या लुटीचा तमाशा पाहत आहे.''

''अगं पुरे... पुरे... देवळात पोचलो आपण... आणि लोकं बघतायत आपल्याकडे...''

म्हातारीने एक तीक्ष्ण कटाक्ष टाकला. तिच्या मर्यादा तिला ठाऊक होत्या. दोघांनी देवाला नमस्कार केला. म्हातारीने अथर्वशीर्ष म्हणणे सुरू केले. म्हातारा सुन्न होऊन पायरीशी बसला. त्याचे विचार थांबतच नव्हते...

''महागाई भत्ते आणि पगारवाढ देऊन हे लोकप्रतिनिधी कर्मचाऱ्यांसोबत स्वतःचादेखील फायदा बघत आहेत... आयोग म्हणजे पुन्हा कर्मचारीच... त्यांनी भरघोस पगारवाढ दिली म्हणजे स्वतःचाच पगार वाढविला ना? म्हातारी या सर्वांना डाकू म्हणते... वेडीच आहे... हे राज्य आहे बळिराजाचं? की या डाकूंचं? देशाच्या तिजोरीचं रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते हे कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी... हे कुंपणंच शेत खात आहे... आता जाग रे बळिराजा...

**ॲड. कांचन कोतवाल**

कृषी कॉलनी, गणेशपूर, भंडारा. मो. ९४२२१३००५६

advkotwalkv@rediffmail.com

# चांदवड येथे शेतकरी संघटनेची जिल्हा बैठक

**चांदवड (निवृत्ती कर्डक यांजकडून)** : येथे दि. २९ मार्च २०११ रोजी शासकीय विश्रामगृहात शेतकरी संघटनेची जिल्हा बैठक पार पडली. बैठकीसाठी माजी आमदार वामनराव चटप, माजी आमदार सौ. सरोजताई काशीकर, ॲड. अनंत उमरीकर, रामचंद्र बापू पाटील, अध्यक्ष रवि देवांग यांनी मार्गदर्शन केले.

सरकारने शेतकऱ्यांना उणे सबसिडीद्वारे आजपर्यंत लुटले आहे. शेतकऱ्यांना दिलेली सर्व कर्जे अनैतिक व बेकायदेशीर आहेत. आम्ही सरकारचे काही देणे लागत नाही. उलट उणे बहात्तर सबसिडीद्वारे सरकारने जगाच्या पोशिंद्याला लुटण्याचे पाप केले आहे. सरकारकडून आम्हाला घेणे आहे. त्या रकमेची एकरकमी फेड सरकारकडून होणे शक्य नाही. तुम्ही जे हे उणे सबसिडीद्वारे लुटण्याचे पाप केले आहे ते पोशिंद्यांना पेन्शनच्या रूपाने परत देऊन पापातून सरकारने मुक्त व्हावे, असे सरोजताई काशीकर यांनी आपल्या भाषणात सांगितले.

ॲड. अनंत उमरीकर यांनी 'कर्जमुक्ती' संदर्भात सविस्तर विवेचन केले. शेतकऱ्यांची कर्जे बेकायदेशीर व अनैतिक आहेत, हे रिझर्व्ह बँकेचे आदेश, बँकांनी अंमलबजावणीत केलेला हलगर्जीपणा, न्यायालयाचा उदासिनपणा हे सोदाहरण पटवून दिले.

२१ मे २०११ रोजी शेतकरी संघटनेची मुलूख मैदानी तोफ असलेले माधवराव खंडेराव मोरे यांचा ७५ वा वाढदिवस आहे. ते कर्जमुक्ती टप्पा क्र. ३ म्हणून पिंपळगाव (बसवंत) येथे साजरा करण्याचे ठरविले आहे. त्याबाबत निधी संकलन, तालुका बैठक, बॅनर, याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्ष रवि देवांग यांनी राजकीय, सामाजिक परिस्थितीचा आढावा घेऊन २१ मे २०११ ला पिंपळगाव (बसवंत) येथील कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी २२ एप्रिल २०११ रोजी शेतकरी संघटना, महिला आघाडी, स्वतंत्र भारत पक्ष यांची संयुक्त कार्यकारिणी बैठक पिंपळगाव येथे आयोजित केली आहे, असे सांगितले. १० नोव्हेंबर २०११ रोजी चांदवड येथे राज्यव्यापी महिला मेळावा आयोजित करण्याचे ठरले. मेळाव्यात पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुका लढवण्याबाबत सविस्तर चर्चा होणार आहे.

रामचंद्र बापू पाटील यांनी सर्व शेतकऱ्यांची सर्व कर्जे सरसकट माफ झाली पाहिजेत. या मागणीसाठी दिल्ली येथे रिझर्व्ह बँक गव्हर्नर व सुप्रिम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश व पंतप्रधान यांना भेटून कर्जमुक्ती व पोशिंद्यांना पेन्शन या मागण्यांचे निवेदन देण्याचे ठरले. २१ मे २०११ च्या पिंपळगावच्या कर्जमुक्ती मेळाव्याचे प्रचार समिती अध्यक्षपदी देविदास पवार, संतु पा. झांबरे, रामनाथ ढिकले, शंकर पूरकर यांची नियुक्ती करण्यात आली व स्वागताध्यक्ष रामचंद्रबापू पाटील यांची नियुक्ती केली.

बैठकीसाठी अर्जुन तात्या बोराडे, भाऊसाहेब गायकवाड, रामनाथ ढिकले, अनिस पटेल, तुकाराम निरगुडे, स्मिता गुरव, निर्मला जगझाप, पुरुषोत्तम बारगळ, शिवाजीराव राजोळे, निवृत्ती गारे, के. डी. मोरे यांनी चर्चेत भाग घेतला.

# शेतकरी संघटक स्थिर निधी



श्री. दिनकर डोहे



ॲड. दिनेश शर्मा

| | |
|---|---|
| ॲड. दिनेश शर्मा | रु. ५००० |
| श्री. दिनकर डोहे (राजुरा) | रु. १५०० |
| श्री. जे. जी. कोष्टी (मा. रवि देवांग यांचे वडील)- | रु. २५०० |
| यापूर्वी जमा निधी | रु. ३२,००० |
| स्थिर निधी एकूण रक्कम = | रु. ४१,००० |

सर्व देणगीदारांचे मन:पूर्वक आभार.

स्थिर निधीसाठी जास्तीत जास्त साहाय्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**-कार्यकारी संपादक**

# लताबाई जनार्दन रंधे पाटील यांचे निधन



**औरंगाबाद** - दावरवाडी, ता. पैठण येथील रहिवाशी लताबाई जनार्दन पाटील यांचे १९ मार्च २०१० रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ४५ वर्षे होते. त्या स्वतंत्र भारत पक्षाच्या सक्रीय कार्यकर्त्या होत्या. शेतकरी संघटनेच्या विविध आंदोलनात त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या पश्चात पती, मुले, मुली असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्काराप्रसंगी शेतकरी संघटना बळिराज्य मराठवाडा अध्यक्ष कैलास तवार, स्व.भा.प.चे शहराध्यक्ष शेख रशीद, जनाबाई सुरमारे, रशीद मौलाना, मच्छिंद्र टेलर, पैठण शहराध्यक्ष आहेर आण्णा तसेच शेतकरी संघटना, स्वतंत्र भारत पक्षाचे असंख्य कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संयुक्त कार्यकारिणीची बैठक

**प्रिय मित्र,**

**स. न. वि. वि.**

शुक्रवार दि. २२ एप्रिल २०११ रोजी पिंपळगाव (बसवंत), ता. निफाड, जि. नाशिक येथे शेतकरी संघटना, शेतकरी महिला आघाडी, शेतकरी युवा आघाडी आणि स्वतंत्र भारत पक्ष यांच्या संयुक्त कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीस सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे ही विनंती.

**विषयपत्रिकाः**

१) देशातील वाढता भ्रष्टाचार, घोटाळे याविरुद्ध समविचारी संघटना आणि त्यांची धोरणे यांसंबंधी विचार विनिमय.

२) कर्जमुक्ती आंदोलन टप्पा क्र. ३ : २१ मे २०११ रोजी पिंपळगाव (बसवंत) येथे होणाऱ्या शेतकरी मेळाव्याची तयारी.

३) १० नोव्हेंबर २०११ : चांदवड अधिवेशन रौप्य महोत्सवी महिला मेळावा.

४) स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक.

५) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय.

कळावे.

आपले,

| | | |
|---|---|---|
| **रवि देवांग**<br>अध्यक्ष, शेतकरी संघटना | **वामनराव चटप,**<br>अध्यक्ष, स्वभाप (महाराष्ट्र) | **सौ. जयश्री पाटील,**<br>अध्यक्ष, शेतकरी महिला आघाडी |
| **अनिल घनवट,**<br>अध्यक्ष, शेतकरी युवा आघाडी | **ॲड. दिनेश शर्मा**<br>अध्यक्ष युवा आघाडी (स्वभाप) | **सौ. सरोजताई काशीकर**<br>अध्यक्षा, स्वभाप महिला आघाडी |

स्थानिक व्यवस्थापन

**रामचंद्र बापू पाटील, संतू पाटील झांबरे, देवीदास अण्णा पवार,**
**सौ. स्मिता गुरव, सौ. निर्मला जगझाप, शंकर पूरकर, निवृत्ती गारे**

**संपर्कः**

**अर्जुन तात्या बोराडे** - ९४०४६८६५१०, **तुकाराम निरगुडे** - ९८५०७५१११५

**स्थळ** -स्वयंवर मंगल कार्यालय, मुंबई आग्रा बायपास रोड, मु. पो. पिंपळगाव (बसवंत)

**दिनांक** - शुक्रवार २२ एप्रिल २०११ **वेळ :** सकाळी १२ वाजता.